# माणूस

## आझमगढ विशेषांक

शनिवार । २७ मे १९७८ । सव्वा रुपया



**माणूस**

* * *

**यापुढील**

**दोन**

**विशेषांक**

* * *

**एक :**

**वर्षारंभ विशेषांक**

तपशील : मलपृष्ठ २

* * *

**दोन :**

**बरसात विशेषांक**

तपशील : मलपृष्ठ १

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक बावन्न
२७ मे १९७८
मूल्य १·२५ पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤


# कनाडिया आणि दसनापुरा

श्री. ग. मा.

बेलछी पाठोपाठ मध्यप्रदेशात कनाडिया येथे हरिजनांवरील अत्याचाराचे एक प्रकरण उद्‌भवले होते. नवीन आलेल्या जनता-राजवटी कशा हरिजनविरोधी आहेत हे दाखविण्यासाठी बेलछीप्रमाणेच याही कनाडिया प्रकरणाचा त्या वेळी भरपूर उपयोग करून घेतला गेला. हे कनाडिया प्रकरण उद्‌भवले कसे व का व त्याचा शेवट काय झाला? या उद्‌भवामध्ये जनता राजवटीचा वाटा किती आणि तत्पूर्वीच्या इंदिरा आणीबाणीचा वारसा किती? भारत बौद्ध संघातर्फे 'धर्मज्योती' या नावाची मासिक-पत्रिका निघत असते. या पत्रिकेच्या ३० एप्रिलच्या अंकात या प्रकरणी थोडी माहिती आलेली आहे. त्यावरून असे दिसते—

कनाडिया हे गाव मध्यप्रदेशातील रतलाम जिल्ह्यात आहे. आणीबाणी-काळात येथील रूपा व रामलाल या दोन हरिजनांना सरकारतर्फे जमिनी मिळाल्या; परंतु हे जमीनवाटप नियमाला सोडून व अन्यायकारक आहे असा त्यावर काही जणांचा आक्षेप होता. आणीबाणी असल्याने कुणी काहीच हालचाल केली नाही, करू शकतही नव्हते. विरोध सुप्तावस्थेत राहिला. आणीबाणी उठली, निवडणुकातून नवे सरकार आले आणि दबून राहिलेल्या विरोधाने उसळी मारली. रूपा आणि रामलाल यांनी मिळालेली जमीन कसली होती. पिके उभी होती. या पिकात जमीनवाटपाला विरोध असणाऱ्यांनी गुरे घातली. ही घटना ३ ऑगस्ट १९७७ ला घडली. त्यातून दुसऱ्या दिवशी दंगल उसळली. दंगलीत चार हरिजन मरण पावले. लगेच धरपकड झाली व ३९ जणांवर सरकारतर्फे खटले भरण्यात आले. गेल्या महिन्यात या खटल्यांचे निकालही जाहीर झाले. ३९ आरोपींपैकी ३८ जणांना जन्मठेपी व एकाला दोन वर्षे तुरुंगवास अशा शिक्षा झालेल्या आहेत. जमीनवाटप नियमाला सोडून होते असेही निकालपत्रात म्हटलेले आहे. वाटप चुकीचे झाले तरी हरिजनांचा त्यांत काहीच दोष नव्हता. त्यांना सरकारतर्फे जमिनी मिळाल्या, त्यांनी त्या पिकविल्या. ज्यांच्यावर या चुकीच्या जमीनवाटपामुळे अन्याय झाला त्यांनी कायदा हातात घेतल्यामुळे हे प्रकरण उद्‌भवले व त्याचा आता असा शेवट लागलेला आहे.

यातून दोन-तीन प्रश्न उद्‌भवतात. पहिला प्रश्न वृत्तपत्रांच्या नीतीबाबतचा. प्रकरण घडले तेव्हा वृत्तपत्रांनी ते एकतर्फी रंगविले. जनता शासन कसे हरिजन व दलित विरोधी आहे हे त्यातून दाखविण्याचा प्रयत्न केला. इंदिरा गांधींनी, विरोधी पक्षांनी हे करणे समजू शकते. वृत्तपत्रांनी तरी आणीबाणीत झालेले चुकीचे जमीनवाटप हे दंगलीचे मूळ कारण आहे ही गोष्ट उजेडात आणायला नको होती का? एकच बाजू रंगविणे हे वृत्तपत्रांचे कार्य असू शकत नाही. ते प्रचारपत्रांचे कार्य आहे. सुरुवातीला सगळे धागेदोरे पुढे येत नसतीलही; परंतु ज्यांनी एक बाजू रंगविली त्यांनी लवकरात लवकर दुसरी बाजूही लोकांसमोर ठेवण्याची काळजी घ्यायला हवी. राजकारणात जसा लाटांचा प्रभाव दिसतो तसा वृत्तपत्रांच्या क्षेत्रातही जाणवू लागला आहे. निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाल्यावर बरीचशी वृत्तपत्रे एकदम इंदिरा गांधींची खरीखोटी बाजूही उचलून धरू लागली आणि त्यातून अशा घटनांच्या एकतर्फी रंगवारंगवीची प्रवृत्ती वाढीस लागली. यामुळे राजकीय पक्षांप्रमाणेच वृत्तपत्रांची विश्वसनीयताही कमी होईल, लोक सवय म्हणून वृत्तपत्रे वाचतील आणि विसरून जातील. हा धोका या क्षेत्रांतील मंडळींनी पुरेसा ध्यानात घेतलेला दिसत नाही. आणीबाणीतील लोटांगणामुळे आपल्या वृत्तपत्रांवरील लोकांचा विश्वास उडालेलाच आहे; पण तो लोटांगणवाद

सार्वत्रिक होता म्हणून क्षमापात्र ठरेल, कदाचित विसरला जाईल; पण सातत्याने एकांगी, भडक व उथळ प्रचार करण्यातच आपली बडीबडी वृत्तपत्रे समाधान मानू लागली तर त्यांच्यावरचा उरलासुरला विश्वासही कायम राहणे अवघड आहे. पुण्यात 'केसरी' ने कनाडिया प्रकरण त्या वेळी इंदूरच्या 'नई दुनिया' वरून उचलले-रंगविले. त्यानंतर आजतागायत या घटनेची 'केसरी' ला पुन्हा दखल घ्यावीशी वाटली नाही. इतरांनीही 'मालमसाला' म्हणून या प्रकरणाकडे पाहिले. अशी प्रकरणे पुन्हा उद्‌भवू नयेत या दृष्टीने प्रकरणाचा योग्य तो शोधबोध मांडून लोकशिक्षण केले नाही आणि असे लोकशिक्षण ही वृत्तपत्रे करणार नसतील तर त्यांना समाजाने तरी विशेष स्थान, सवलती वगैरे का द्याव्यात? आणि त्यांना तरी मागण्याचा, मिळविण्याचा अधिकार कसा पोचतो?

## आणीबाणीतील अधिकारशाही

कनाडिया प्रकरणावरून आणखीही एक गोष्ट स्पष्ट होते. आणीबाणी, दडपशाही हा काही गरिबांना न्याय आणि संधी प्राप्त करून देण्याचा भरवशाचा मार्ग नाही. आणीबाणी नसती तर कनाडियामधील जमीनवाटपाबाबतचा असंतोष–राग अन्य मार्गांनी व्यक्त होऊ शकला असता. तो दडपला गेल्याने गैरमार्गाने उफाळून वर आला व चार हरिजनांना नाहक प्राणांना मुकावे लागले. आणीबाणीमुळे लहानमोठ्या सरकारी नोकरांच्या हाती खूप सत्ता आली. त्यांना जाब विचारू शकणारी शक्ती उरली नाही. या सत्तेचा योग्य वापर अगदीच कुठे झाला नसेल असे नाही; परंतु आपापल्या स्वार्थासाठी, बढतीसाठी, वरिष्ठांना खूष करण्यासाठी ही सत्ता नको तितकी वापरली गेली हेही आता स्पष्ट होऊन चुकलेले आहे. केरळमधील राजनप्रकरण, दिल्लीतील तुर्कमानगेट यांसारखी प्रकरणे प्रांतोप्रांती घडलेली आहेत व नोकरशाहीच्या हातात सर्व सत्ता केंद्रित न होऊ देणे हा यावरील उपाय आहे. आणीबाणीचा फायदा घेऊन चुकीचे जमीनवाटप दडपून करणाऱ्या कनाडिया प्रकरणातील सरकारी अधिकाऱ्यांनाही वास्तविक शिक्षा का होऊ नये? चार हरिजनांचे प्राण जाण्यास पर्यायाने हे संबंधित सरकारी नोकरही जबाबदार आहेतच. त्यांचीही चौकशी व्हायला हवी आणि ते दोषी आढळल्यास त्यांनाही योग्य त्या शिक्षा व्हाव्यात. भूदानचळवळीपासून आपल्याकडे जमीनवाटपाचे कार्यक्रम सुरू आहेत. कम्युनिस्ट आणि काँग्रेस राजवटीत राज्याराज्यांतून या कार्यक्रमांची बरीवाईट अंमलबजावणी आजवर होत आलेली आहे. मद्दा किचकट आणि गुंतागुंतीचे असे हे काम आहे आणि ते नीट सुरळीत पार पाडायचे तर नक्षलवादी चळवळीसकट आजवरच्या वरील सर्व अनुभवांचा त्यासाठी उपयोग करून घेतला जायला हवा. आणीबाणी पुकारली, राष्ट्रपतींनी वटहुकुमावर सही केली, वीस कलमीचे नगारे वाजले की कुठलाही अधिकारी, कुठेही चुटकीसारखे हे जमीनवाटप हाती घेऊन यशस्वी करून दाखवू शकतो असे समजणे अज्ञानाचे आहे. गावकऱ्यांचा सहभाग हा या कार्यक्रमाच्या यशासाठी एक अगदी प्राथमिक पूर्वशर्त आहे. यासाठी लोकशिक्षण, चळवळ, सत्तेचे पाठबळ या सर्व आघाड्या हलवाव्या लागतात. अशी काहीही पूर्वतयारी कनाडिया येथे झालेली नसताना अधिकाऱ्यांनी जमीनवाटप करून टाकले आणि असंतोषाचा एक सुरुंग पेरून ठेवला. आणीबाणी उठल्यावर दुसरे एखादे किंवा अगदी इंदिरा गांधींचे शासनदेखील तेथे असते तरी हा सुरुंग केव्हा ना केव्हा उडालाच असता. याचा अर्थ जातिश्रेष्ठत्वाचा अहंकार, त्यातून निर्माण होणारी वैमनस्ये कनाडियात नव्हती–नाहीत असा नाही; पण हरिजनांना – गरिबांना जमिनी मिळू देऊ नयेत असाही खास बनाव होता असे दिसत नाही आणि खरोखरच अन्यायाने कुणाच्या तरी जमिनी कुणाला तरी दिल्या गेल्या असतील तर विरोध असण्यात गैर तरी काय आहे? पूर्वतयारीशिवाय जिथे जिथे जमीनवाटप कार्यक्रम हाती घेतले गेले तिथे तिथे विरोधाची अशी काही प्रकरणे उद्‌भवतच असतात आणि वातावरण साफ आणि मोकळे असले तर त्यांचा निचराही होत राहतो. आणीबाणीमुळे असा निचरा कनाडिया येथे वेळच्या वेळी झाला नाही. परिणाम मात्र गरीब हरिजनांना, कनाडियातील चाळीसएक कुटुंबांना आणि जनता राजवटीला भोगावा लागला!

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे...

मध्यप्रदेशातील जनताशासन हरिजनविरोधी असते तर न्यायदान इतक्या तडकाफडकी कसे होऊ शकले असते? त्यात दिरंगाई घडवून आणण्याचे प्रयत्न कोणीच कसे केले नाहीत? आरोपींनाही इतक्या कठोर शिक्षा फर्मावण्याचे धाडस न्यायमूर्ती कसे दाखवू शकले? आपल्याकडे बावडाप्रकरण गाजले. निकालासाठी किती वेळ लागतो, दडपणे कसकशी येतात, किती पातळ्यांवर हस्तक्षेपाचे प्रयत्न सुरू असतात; शेवटी निकाल लागून आरोपींना शिक्षा झाल्या तरी आरोपी राजकीय कार्यासाठी बाहेर कसे हिंडू–फिरू शकतात या सर्व गोष्टींचा आपल्याला परिचय आहेच. 'पाच पिढ्यांची' काँग्रेस तिथे अजूनही सत्तेवर आहे अशा आपल्यासारख्या 'पुरोगामी' म्हणून गाजावाजा झालेल्या राज्यात हे घडू शकते तर मध्यप्रदेश काय, बोलूनचालून मागासलेला, परंपराग्रस्त! तेथील न्यायदान नेहमीच वरिष्ठ जातीजमातींच्या बाजूकडे नको तितके झुकलेले असणार. वरिष्ठ जातीजमातींचे प्राबल्य असणाऱ्या अशा परंपराग्रस्त व सरंमजामदारी युगात अजूनही वावरणाऱ्या राज्यात जनता-शासन येणे म्हणजे विरोधकांच्या दृष्टीने गंडस्योपरी पीटिका! गळवावरचा फोड! तरीपण न्यायदानाचे काम आठनऊ महिन्यांत विनाविक्षेप पूर्ण झाले आणि वरिष्ठ जातीजमातींतल्या आरोपींना कठोरातल्या कठोर शिक्षा सुनावल्या गेल्या. सर्व आरोपी वरिष्ठ जातीजमातींतले असावेत असे येथे गृहीत धरलेले आहे. आपल्याकडे दुसऱ्या कारणांसाठी गाजलेल्या मानवत खूनखटल्यातील शिक्षा तरी इतक्या भयंकर होत्या का? ३९ पैकी ३८ आरोपींना जन्मठेप! ३९ वा आरोपी रतनलाल हा घटनास्थळी हजरच नसल्याचे निष्पन्न झाल्याने तो फक्त कमी शिक्षेवर (दोन वर्षे कैद) सुटू शकला. कनाडिया हे इतर गावांसारखेच लहान किंवा मध्यम गाव असणार. अशा गावातील ३८ कर्ती माणसे जन्मठेपीवर जाणे याचा अर्थ गावच हवकणे, मोडून पडणे, विस्कळित होणे असा होतो. हा अर्थ स्पष्ट असूनही न्यायदानावर त्याचा कसलाही परिणाम होत नाही, न्यायदान कठोर निःपक्षपातीपणे होऊ शकते हे चालू राजकीय संदर्भात विशेष महत्त्वाचे आहे.

## कर्नाटकातील परिस्थिती

इंदिराशासन चालू असलेल्या कर्नाटक राज्यातील एक घटना येथे नोंदण्यासारखी आहे. जिल्हा तुमकुर, तालुका कुनिगल, गावाचे नाव दसनापुरा. चिक्कथिमय्या या एका हरिजनाला जमिनीच्या प्रश्नावरून तुकडे करून ठार मारण्यात आले व प्रेताचे तुकडे त्याच्याच झोपडीत टाकून झोपडी पेटवून देण्यात आली. घटना घडली ५–६ एप्रिलला. अजून देवराज अरस यांचे इंदिराशासन थंड आहे! वृत्तपत्रांनी बेलछी–कनाडियासारखा आवाज अद्याप उठविलेला नाही. कनाडिया प्रकरणी जमिनीबाबत निदान वाद तरी होता. वाटपाबाबत गोंधळ होता. तशी कोणतीही परिस्थिती दसनापुरा येथे नव्हती. तरीपण चिक्कथिमय्याचा मृत्यू घडला आणि अजून तरी सारे कसे शांत शांत आहे! जिज्ञासूंनी अधिक माहितीसाठी Economic and Political Weekly या साप्ताहिकाचा ताजा ६ मेचा अंक पहावा. हे साप्ताहिक भारदस्त व डाव्या विचारसरणीचे म्हणून प्रसिद्ध आहे. चिक्कथिमय्याला कसे मारले–जाळले व शासन कसे निष्क्रिय होते व नेहमीच असते हे सांगून समारोपादाखल वरील अंकी स्तंभलेखक लिहितो : But such inaction on the part of the administration is not at all unique. To cite an instance, Venkataiah, a harijan, has 7 acres and 7 1/2 guntas of inam land in the locality; but for the last seven years, he has not been allowed to enter the land by the upper caste landlords, though there is a clear order from the assistant Commissioner, Tumkur Sub-division, restraining these upper caste landlords from interfering with Venkataiah. There have been many instances when Venkataiah, his wife and children have been attacked and driven out by the local upper caste landlords, when they attempted to till the land. All the petitions and complaints made by Venkataiah to the police and revenue authorities have brought him no remedy; upper caste landlords continue to cultivate the land which properly belongs to this harijan.

No wonder therefore that the uppercaste landlords in this area feel that they can get away even with hacking a harijan to pieces and converting his own house into a funeral pyre.' ( P. 751 )

'In this area' हे तीन शब्द लक्षणीय आहेत. ज्या जमिनींबाबत कसलाही वादतंटा नाही, निर्विवादपणे ज्या जमिनींवर हरिजनांची–दलितांची मालकी कायद्याने प्रस्थापित आहे अशा जमिनीही देवराज अरस यांच्या चालू 'पुरोगामी' राजवटीत, त्यामागील आणीबाणीत किंवा त्याही पूर्वीपासून हरिजनांना-गरिबांना 'in this area' लाभू–कसू–पिकवू दिल्या जात नाहीत. एका दसनापुरा गावापुरती ही स्थिती मर्यादित नाही. आसपासचा सर्वच भाग असा विषमताग्रस्त आहे. तरी वृत्तपत्रांनी, राजकीय पक्षांनी हे व असली त्या भागात घडणारी लहानमोठी अत्याचारप्रकरणे गेल्या वर्षभरात तरी कधी वेशीवर टांगल्याची ठळक नोंद नाही. बेलछीला एक न्याय, कनाडियाला दुसरा न्याय, कर्नाटकाला सर्व न्यायअन्याय माफ असा भेदभाव निदान वृत्तपत्रांनी तरी करायला नको. हरिजनांवरील अत्याचार हा एक विषय तरी पक्षीय राजकारणापासून सर्वांनी दूर ठेवायला हवा. राजकीय पक्ष–विशेषत: इंदिरा गांधी या विषयाचे भांडवल करीत असतील तर त्यांनाही हटकणे, त्यांच्या प्रचारातला सत्यांश तेवढाच लोकांसमोर ठेवणे हे जबाबदार वृत्तपत्रसृष्टीचे अगदी प्राथमिक कर्तव्य आहे. अशी जबाबदारी जे मानीत नसतील त्यांच्या स्वातंत्र्याची किंमत समाजाने तरी का ठेवावी? किती ठेवावी? □




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये




अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी....




वाघबच्चे फाकडे, भ्रांत तुम्हा का पडे ?

# मुक्ताफळे

## □ चला लग्नाला चला !

लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला.

लग्नाची घाई, वांगी आली लई
फोडणीला तेल नाही, काय करू बाई ?
चला लग्नाला चला !

स्वर्णसिंग, करणसिंग
त्यांच्या गुडघ्याला बाशिंग
बोलण्याच्या मिषात,
हात घालती खिशात
चला लग्नाला चला !

सांगलीचे पाटील, त्यांना मोहिते दाटील
खाती कोण वाटील ?
लग्नाची हळद, पवारांना नाही उसंत
चला लग्नाला चला !

धोटयांचे जंबू, हे नवे 'अंबू'
उंटाने फाडला नवारीचा तंबू
चला लग्नाला चला !

चार जमल्या आयाबाया,
मध्ये होती 'बाई'
वडे नाही तळले, तो वाढायची घाई
चला लग्नाला चला !

कसे झाले कार्य ? अहो, हे काय विचारता ? झक्क झाले. तुम्ही नाही आलात ? सगळे आले होते. पं, अलेगेसन, पूर्बी मुकर्जी, सिद्धार्थ शंकर रे, श्यामधर मिश्र, नेकराम शर्मा, प्रियरंजन दास मुन्शी आणि साहेब ! साहेबांचे भाषण फक्कड झाले, हातातून सत्ता गेल्याचे दुःख कसे लपवावे हे साहेबांनी फार छान सांगितले. जळामाजी मासा ! रडे कैसा ? म्हणजे मासा कधी तुम्ही रडताना पाहिला आहे का ? म्हणजे तो कधी रडत नाही असे नाही; पण त्याचे अश्रू पाण्यात दिसणार कसे ? अश्रूंचे पाण्याशी विलिनीकरण म्हणा किंवा ऐक्य म्हणा ते झालेले असते. म्हणून साहेबांनी भाषणात सांगितले –

'पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मासे व्हायला हवे. पाण्यात जसा मासा रहातो तसे कार्यकर्त्यांनी जनतेत मिसळले पाहिजे !'

आता साहेबांना हे कुणी सांगितले ? तर माओ–त्से–तुंगने ! माओने कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांना जो उपदेश केला तो साहेबांनी कॉंग्रेस कार्यकर्त्यांना केला. सत्ता गेली, जाऊ दे ! इंदिरा गेली, जाऊ दे ! आमदार फुटले – फुटू देत. निवडणुकीत डिपॉझिट गेले – जाऊ दे. अश्रू लपविले पाहिजेत हे महत्त्वाचे आहे.

यशवंतरावांनी हे सांगितले मात्र, सगळे कार्यकर्ते एकदम मासे झाले. पहाता पहाता तिथे मासळी–बाजार झाला ! बंगाली माशांनी मुंबईच्या माशांना गुद्दे मारले – ओरबाडले ! चक्क लठ्ठालठ्ठी ! विलिनीकरणवाले ऐक्यवाल्यांना मारू लागले. ऐक्यवाले विलिनीकरणवाल्यांना शिव्या देऊ लागले. शेवटी वसंतरावदादा पाटील धावत गेले. मोठ्याने ओरडले –

'मारामारी थांबविता की मी संन्यास घेऊ ? —'

महाराष्ट्रातले मंत्रिमंडळ कोसळणार हे लक्षात येताच सूज्ञपणे मारामारी थांबविण्यात आली.

वस्तुतः शुभकार्यानंतर गोंधळ घालण्याची आपली परंपराच आहे. पत्रकारांना ती माहीत नसावी हे आश्चर्य होय. मासळीबाजाराचे अत्यंत खोडसाळ वर्णन वृत्तपत्रांनी छापले. दादा रागावले ! रागावणारच. खरं म्हणजे गोंधळाचा कार्यक्रम अद्याप संपलेला नाही. गोंधळ हा देवीच्या उपासनेचा लौकिक पातळीवरचा नाटयात्मक विधी आहे. रंजकता हे याचे वैशिष्टय. रंजनातून उद्‌बोधन होतच असते. या गोंधळाचे आवंतण आहे–

विलिनीमाते गोंधळा ये ।
ऐक्याच्या माते गोंधळा ये ।
संतोषीमाते गोंधळा ये ।
संजयमाते गोंधळा ये ।।

देवीच्या आगमनाखेरीज तिचे भुत्ये आता स्वस्थ बसणार नाहीत. गावोगाव हे भुत्ये गोंधळ घालीत फिरणार–

उदे – उदे इंदिरे उदे !

आणि हे घडेपर्यंत साहेबाचे बहुरूपी दर दोन–तीन महिन्यांनी कार्य काढणार–

लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला !

—म्यानबा

# विवेकनिष्ठा आणि मानवतावाद

व्ही. बी. कर्णिक

देशामध्ये हुकुमशाही प्रवृत्ती वाढू लागली आहे अशी ओरड आता सगळीकडून ऐकू येऊ लागली आहे. ओरड करणारांचा मुख्य रोख आहे तो इंदिरा गांधी यांच्याकडे. इंदिरा गांधी यांनी एक प्रभावी शक्ती म्हणून राजकारणात पुन्हा प्रवेश केला असून गेल्या तीन–चार महिन्यांतील त्यांची घोडदौड विस्मयजनक स्वरूपाची आहे हे कुणालाही कबूल करावे लागेल.

१९७७ मधील निवडणुकीतील पराभवानंतर आणि विशेषेकरून आणीबाणीतील अत्याचारांबद्दल, त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली तिच्यावरून, इंदिरा गांधींचे राजकीय आयुष्य आता संपले असा निष्कर्ष सर्व राजकीय निरीक्षकांनी काढला होता; पण तो निष्कर्ष चुकीचा होता आणि इंदिरा गांधी या आजदेखील एक जिती–जागती राजकीय शक्ती आहे हे आता सिद्ध झाले आहे.

१९७७ मधील निवडणुकीच्या निकालांबद्दल जे ठोकताळे बांधण्यात आले ते चुकीचे होते म्हणून निष्कर्ष चुकीचा ठरला. लोकशाहीचा विजय म्हणून त्या वेळी निकालाचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले होते. लोकशाहीवरील प्रेमामुळे व निष्ठेमुळे लोकांनी इंदिरा गांधींच्या व काँग्रेसच्याविरुद्ध मते दिली असा त्या वेळी प्रचार झाला आणि तो राजकीय विचारवंतांनीही विनातक्रार स्वीकारला; पण तो प्रचार चुकीचा होता. जनतेने इंदिरा गांधींना व काँग्रेसला झिडकारले ते लोकशाहीवरील प्रेमामुळे किंवा निष्ठेमुळे नव्हे तर आणीबाणीच्या काळातील अत्याचारांबद्दलच्या संतापामुळे. विशेषतः कुटुंबनियोजनक्षेत्रात जे अत्याचार घडले त्यांनी लोक संतापले आणि त्यांनी उत्तर भारतात इंदिरा गांधींवर अभूतपूर्व असा पराभव लादला, हे त्या वेळी न उमगलेले सत्य आता डोळ्यांपुढे येऊ लागले आहे. लोकांचा संताप तात्कालिक होता. काळ उलटला तसा तो कमी होऊ लागला आणि त्याचा फायदा आता इंदिरा गांधींना मिळू लागला आहे.

इंदिरा गांधी या केवळ एक व्यक्ती नसून त्या एक प्रवृत्तीही आहेत. व्यक्ती म्हणून लोकांना भुरळ पडेल असे अनेक गुण त्यांच्या ठिकाणी आहेत. मोठ्या बापाची लेक हे कुणीही काढू न शकणारे बिरुद त्यांना सदोदित मिरवता येते. महात्मा गांधींच्या पुण्याईवरही त्यांना वारसा सांगता येतो. बांगलादेश युद्धातील विजय ही त्यांच्या राजकीय आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. त्या विजयामुळे संमोहित होऊन आजचे त्यांचे कठोर टीकाकार व देशाचे परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना मुक्त कंठाने स्तुतिसुमने वाहिली होती. राष्ट्रनिष्ठेला आवाहन करून त्या जशी राष्ट्रनिष्ठांची मने जिंकू शकतात तसेच सामाजिक न्यायाचे प्रदर्शन करून त्या सर्वसामान्य जनतेलाही भुलवू शकतात. १९६९ मध्ये काँग्रेसमधील अंतर्गत भांडणांच्या वेळी बँकांचे राष्ट्रीयीकरण हा त्यांनी योजलेला उपाय व आणीबाणीच्या काळात त्यांनी पुरस्कारिलेला वीस कलमी कार्यक्रम ही त्या गोष्टींची ठळक उदाहरणे आहेत.

प्रवृत्ती या नात्याने इंदिरा गांधी भारतीय परंपरेत चपखल बसतात. भारतीय परंपरा विभूतिपूजेची आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास नसलेले भारतीय नेहमीच अलौकिक कर्तृत्वाच्या व्यक्तीच्या शोधात असतात. तिलाच ते विभूती मानतात आणि आपल्या उद्धाराचा भार तिच्यावर टाकून ते मोकळे होतात. विभूती भक्ताला जे हवे असेल ते देण्याचे अभिवचन देतात. मुसलमानांना हिंदूंपासून संरक्षण हवे आहे, अस्पृश्यांना स्पृश्यांपासून व गरिबांना श्रीमंतांपासून संरक्षण हवे आहे. इंदिरा गांधी ते देण्याचे भरघोस अभिवचन देतात. म्हणून ते वर्ग मोठ्या संख्येने त्यांच्याभोवती गोळा होऊ लागले आहेत. प्रत्यक्षात ते मिळते की नाही हे पहायला कुणी थांबत नाही. एकदा आवई उठली की सर्वजण ती खरी मानून तिच्यामागे धावत जातात. शिवाय जे हवे ते घडले नाही तर विभूतीला दोष लावण्याऐवजी माझेच काही तरी चुकले म्हणून स्वतःलाच दोष लावण्याची हिंदू प्रवृत्ती आहेच ना! या प्रवृत्तीमुळेच समाजामधे शेकडो संत-महंत निर्माण झाले असूनही त्यांचा व्यवहार सुखेनैव चालू आहे. समाजात जर हे घडते तर त्याचाच एक भाग असलेल्या राजकारणात ते घडले तर कुणासही नवल वाटू नये.

स्वतंत्र बुद्धीने विचार करणे हे गेल्या हजार वर्षांतील भारतीय परंपरेत बसत नाही. परंपरेत महत्त्व आहे ते ग्रंथप्रामाण्याला. अनुकूल अर्थ मिळावा म्हणून शब्दांची वाटेल तशी ओढाताण केली जाईल; पण बुद्धीला पटते ते स्वीकारा असे कुणीही म्हणणार नाही. रूढींनाही महत्त्व आहे; पण सर्व रूढी जुन्या परंपरागत समाजांची मूल्ये जोपासणाऱ्या विसाव्या शतकातील इहवादी व उत्कर्षेच्छु समाजाच्या आशाआकांक्षांशी जुळतील असे त्यामधे फारच थोडे आढळते. म्हणून ग्रंथप्रामाण्यावर, जुन्या विचारांवर व

रूढींवर बुद्धिवादी दृष्टिकोनातून हल्ला होणे फार अगत्याचे होते. ते झाले नाही म्हणून प्रगतीच्या मार्गातील जुन्या विचारांचा व परंपरांचा अडथळा अद्याप कायम आहे. कायम आहे एवढेच नव्हे तर अनेक आनुषंगिक कारणांमुळे तो दिवसेंदिवस अधिक दृढमूल होत चालला आहे.

अलीकडील काळात तर जुन्या परंपरा, जुन्या चालीरीती व संस्था आणि जुने विचार यांना नवी मान्यता व प्रतिष्ठा मिळवून देण्याचे प्रयत्न जोरात सुरू झाले आहेत. ते यशस्वी झाले तर देशाचे पाऊल पुढे पडणार नाही आणि देशामध्ये लोकशाहीसारख्या नवीन संस्था मूळ धरणार नाहीत. लोकशाही ही गेल्या दीडदोनशे वर्षांत वाढलेली नवीन संस्था व जीवनाची पद्धत आहे. तिचे स्वतःचे असे नवे स्वातंत्र्य व समतावादी तत्त्वज्ञान आहे. ते तत्त्वज्ञान समाजामध्ये रूढ होईल त्याच वेळी लोकशाही चिरस्थाई होईल. स्वातंत्र्य आणि समता यांच्या बरोबरीने त्या तत्त्वज्ञानात विवेकनिष्ठा आणि मानवतावाद यांचाही समावेश होतो.

लोकशाहीचे हे तत्त्वज्ञान जनमानसात रुजलेले नाही म्हणूनच इंदिरा गांधींना सर्व लोकशाहीचे हक्क गुंडाळून ठेवणारी आणीबाणी पुकारता आली आणि आणीबाणीतील अत्याचारांनंतरही त्या पुन्हा उजळ माथ्याने लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी उभ्या ठाकल्या आहेत. लोकशाहीवरील हे अरिष्ट इंदिरा गांधींना शिव्या देऊन अगर न्यायमूर्ती शहा आयोगाच्या निर्णयांचा प्रचार करून टाळता येणार नाही. शहा आयोगाचे विष इंदिरा गांधींनी पचवून टाकले आहे आणि अत्याचारांच्या कथांमुळे सामान्य जनांमध्ये त्यांच्याबद्दल घृणा निर्माण होत नाही; उलट एक प्रकारची सहानुभूती आणि भीतियुक्त आदर निर्माण होतो. म्हणून प्रचलित राजकारणाच्या दृष्टीने शहा आयोगाची व तत्सम इतर आयोगांची उपयुक्तता आता संपली आहे. इतिहास स्पष्ट आणि साधार असावा या दृष्टीने त्यांची जी उपयुक्तता असेल ती वेगळी.

हुकुमशाहीचा धोका केवळ एका व्यक्तीमुळे निर्माण झालेला नसून तो आजच्या देशाच्या परिस्थितीत अनुस्यूत आहे. औद्योगिकदृष्ट्या अप्रगत अशा देशात औद्योगिक व आर्थिक प्रगती हुकुमशाही मार्गाने लवकर साधता येते असा पुष्कळांचा समज आहे. समर्थनासाठी म्हणून बहुशः ते साम्यवादी देशाकडे बोट दाखवितात. हा समज, खरा वा खोटा, आपल्या देशातही मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. म्हणूनच आज देशाला खंबीर नेतृत्वाची गरज आहे. लोकशाहीचे चोचले आपल्याला परवडणार नाहीत, ही भाषा बऱ्याच ठिकाणी ऐकू येते. आणीबाणीच्या वीस महिन्यांच्या अनुभवानंतरही अद्याप अनेकांचा भ्रमनिरास झालेला नाही. म्हणून जलद आर्थिक प्रगतीच्या नावाने इंदिरा गांधी किंवा दुसरा एखादा पुढारी हुकुमशाहीचा पुरस्कार करण्याची शक्यता डोळ्यांआड करता येणार नाही. अशा वेळी आर्थिक प्रगतीसाठी आम्ही स्वातंत्र्याची व लोकशाहीची किंमत द्यायला तयार नाही असे निर्धाराने सांगणारे किती जण निघतील हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांच्या संख्येवर आणि निष्ठेवर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

याचाच अर्थ हा की देशामध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. स्वतःच्या पायावर उभे राहून स्वश्रमाने आपले भवितव्य घडवू पाहणारी हजारो नि लाखो माणसे समाजात निर्माण झाली पाहिजेत. देव, दैव, कर्म अगर एखादा पुढारी यावर अवलंबून राहणे लाजिरवाणे आहे ही जाणीव समाजात पसरली पाहिजे. स्वावलंबन आणि सहकार देशामध्ये पसरला पाहिजे. ठिकठिकाणी समित्या निर्माण होऊन त्यांनी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कंबर कसली पाहिजे. स्वातंत्र्य आणि समता यांचा निनाद सर्वत्र घुमला पाहिजे. विवेकनिष्ठा ही समाजाची धारणा बनली पाहिजे आणि मानवतावाद ही त्याची प्रेरणा. असा समाज चुटकीसरशी निर्माण होणार नाही हे खरे; पण त्यासाठी जे प्रयत्न होतील त्यांतूनच हुकुमशाही रोखण्याची खरी जनशक्ती निर्माण होईल.

समाजाचा विकास आणि समाजाच्या घटक अशा ज्या व्यक्ती त्यांच्या मनांचा विकास यामधील अन्योन्य संबंधाची एम्. एन्. रॉय यांना उत्कट ओळख पटली होती. म्हणूनच राजकीय किंवा सामाजिक क्रांतीच्या यशासाठी मानसिक क्रांती हवी असा त्यांनी आग्रह धरला व प्रबोधनाची (orenaissance) चळवळ उभारली. लोकशाहीसारख्या आधुनिक संस्था मध्ययुगीन विचारांच्या दडपणाखाली चिरडून गेलेल्या मनांना यशस्वी रीतीने चालविता येणार नाहीत असे त्यांचे सांगणे होते; परंतु मानसिक किंवा बौद्धिक क्रांतीच्या या कार्याकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले. विसाव्या शतकातील विज्ञान, संस्था आणि सुखसोयी आपण स्वीकारल्या; पण आपली मने मात्र मध्ययुगीन किंवा त्याही पलीकडील विचारांच्या जंजाळात घुटमळत राहिली. आपल्या जीवनातील हे द्वैत आपण संपविले पाहिजे. विसाव्या शतकात मानाने जगण्यासाठी व त्या शतकातील समस्यांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी त्या शतकाला अनुरूप अशी विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी विचारसरणी आपण स्वीकारली पाहिजे. त्या विचारसरणीचा आपण लोकामध्ये प्रसार केला, तर लोकांना हुकुमशाही आणि लोकशाही यातील फरक चटकन कळेल आणि लोकशाहीच्या रक्षणाची जबाबदारी ते आपण होऊन स्वतःच्या शिरावर घेतील. इंदिरा गांधींच्या पुनरागमनामुळे निर्माण झालेला हुकुमशाहीचा धोका टाळण्याचा अशा तऱ्हेचे व्यापक लोकशिक्षण हाच एक मार्ग आहे. लोकशाही लोकांपर्यंत नेऊन पोचविली तरच ते तिचे रक्षण करतील आणि हुकुमशाहीच्या प्रचारकांच्या भूलथापांना व आश्वासनांना बळी पडणार नाहीत. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

## चक्रम्चक्री ( ३५ )

दीर्घस्मृति विश्वनाथ

# नाळ तुटलेले राजकारण

काय गुरुजी, चांगली फजिती झाली ना तुमची ?

' फजिती, ती कशी काय ?'

मागे ' माणूस 'ने ' रायबरेली विशेषांक ' काढला होता, तेव्हा इंदिराबाईंच्या राजकारणातल्या पुनरागमनाला तुम्ही ' परिणामशून्य ' म्हटले होते. आता आझमगढच्या पोटनिवडणुकीत बाईंनी जनताला चीत केल्यानंतर काय म्हणणे आहे तुमचे ? तरी मी सांगत होतो की, बाबांनो, डोण्ट राइट दॅट वूमन ऑफ. हां, जिद्दीची बाई आहे बरे ती !'

' हे पहा बाबुराव, तुम्ही असे कधी पूर्वी म्हणाल्याचे मला तर आठवत नाही. आता माझ्याविषयी म्हणाल, तर बाईंचे राजकारणातले पुनरागमन परिणामशून्यच होईल असे मी म्हणालो होतो खरे; पण तुम्ही तो लेख नीट वाचून पहाल तर तुमच्या ध्यानात येईल की, त्यात मी फक्त माझा विश्वास—किंवा श्रद्धा म्हणा—व्यक्त केला होता. बाईंचा राजकारणातला पुन्हा प्रवेश परिणामशून्य होईल हा काही माझ्या लेखाचा निष्कर्ष नव्हता किंवा अंदाजही नव्हता.'

' आता तुम्ही तसे म्हणणारच. कुण्या कुडमुडयाने आपले भाकित खोटे ठरल्याचे मान्य केलेय ? पण तुमच्या लेखाचे एक सोडून द्या; मला सांगा की, बाईंच्या विजयाचा हा वारू थांबणार तरी कुठे ? त्याला काही अटकाव होणार आहे की नाही ?'

'का हो, असे अगदी काकुळतीला आल्यागत का विचारताय् ?'

' इतके कसे तुम्ही सुस्त ? त्या बाईंनी आंध्र जिंकला, कर्नाटक पालथा घातला, महाराष्ट्र अर्ध्यावर मटकावला, गांधीजींच्या गुजरातेत पाय रोवला आणि आता जनता पक्षाच्या शक्तीचा जो गाभा अशा हिंदी भाषी प्रदेशातली अटीतटीची लोकसभेची पोटनिवडणूक तर जिंकलीच; पण तोंडी लावणे म्हणून विधानसभेच्या दोन जागाही मिळवल्या. इतके असून या जनता पक्षीयांची तुकतुकी, आत्मसंतुष्ट वृत्ती लड्डपणा यात काही फरक पडल्याचे आढळून येत नाही. आं, काय आहे काय हा प्रकार ?'

' अरे, पण तुम्ही मला का असे फैलावर घेताय् ? मी काही जनता पक्षाचा कार्यकर्ता नाही की साधा मेंबरदेखील नाही. मी आपला तुमच्यासारखाच एक साधा वर्तमानपत्रे वाचणारा माणूस आहे. आता जनता पक्षाविषयी मला आपुलकी वाटते आणि बाई म्हणजे राजकारणातला कॅन्सर आहे असे माझे मत आहे हे खरे; पण म्हणून जनतापार्टी निवडणुकीत हरली यामुळे डोके मात्र फिरले नाही माझे !'

' पुढचे सगळे पाठ आहे मला. तुम्ही हेच म्हणणार की नाही, की, पोटनिवडणुकीत विरोधी पक्षाला नेहमीच अनुकूलता असते. ७७ मार्चमध्ये जनता पक्ष लाटेवर स्वार होता, आता नेहमीचे राजकारण चालू झाले. त्यामुळे हार—जीत व्हायचीच. खरा पराभव जनता पक्षाचा नसून रेड्डी—स्वर्णसिंग—चव्हाण यांच्या कॉंग्रेसचा आहे. जनता पक्षात थोडीफार भांडणे आहेत की जी असायचीच. वर्तमानपत्रे जनताच्या विरुद्ध आहेत वगैरे वगैरे. थोडक्यात काय की, पराभव ही सामान्य गोष्ट आहे, त्यात काळजीचे कारण नाही. आम्हाला आता झोपू द्या !'

### खरी चिंतेची बाब

' साफ चुकलात तुम्ही ! मी असे मुळीच म्हणणार नव्हतो. जनता पक्ष पोटनिवडणूक हरला ही वस्तुस्थिती आहे. अमुक एक निवडणूक एखादा पक्ष का हरला हे नेमके कोणी सांगू शकणार नाही आणि पराभवाची नेमकी कारणे समजा कळली तरी ती दूर केल्याने पुढची निवडणूक जिंकता येईलच असेही नाही. तेव्हा आझमगढला बाई का विजयी झाल्या याचे चर्वितचर्वण करण्यात मला तर काही स्वारस्य वाटत वाटत नाही.'

'हे पहा विश्वनाथ, केवळ माझ्यावर मात करण्यासाठी आपले बोलणे फिरवू नका. ' जनतापार्टी निवडणुकीत हरली यामुळे डोके मात्र फिरले नाही माझे ' असे म्हटल्यानंतर मी मघा सांगितलेली रेकॉर्डच लावणार होतात की नाही तुम्ही ? खरे सांगा !'

' तेच सांगतोय् ना. जनता पक्ष हरला याचे मला मोठेसे दुःख वाटले नाही, याचे कारण असे की, त्याहून काळजीची अशी एक गोष्ट मला डाचत होती.'

' हे एक येरच आहे. कोणती ही चिंतेची बाब ?'

'असे पहा, आझमगढपूर्वी कर्नालची निवडणूक झाली. तीही अटीतटीची होती. त्यात जनता पक्ष पराभव पावेल अशी भावना सर्वत्र होती. जनता पक्षातले कित्येक नेते जनता पक्षाचा पराभव व्हावा असा नवस बोलून बसले आहेत, असेही ऐकिवात होते. टाइम्ससारखी वर्तमानपत्रे कोठले तरी सर्व्हे प्रसिद्ध करून शहरी भागातदेखील जनता पक्षाविरुद्ध जनमत गेले आहे असे बजावीत होती. इतके असून जनता पक्षाने ती निवडणूक जिंकली; पण त्यावरून कोणी असे म्हणाले नाही की, बाईंच्या पक्षाला उत्तर भारतात भवितव्य नाही. उलट बाईंचा पक्ष फक्त १८००० मतांनीच हरला असे कौतुक ! त्यानंतर आझमगढची निवडणूक बाईंच्या पक्षाने जिंकली. तावडतोब जनता पक्षाच्या भवितव्याविषयी काहूर. मायना असा की, प्रत्येक पोटनिवडणूक आली की, जनता पक्षाच्या नाकी सूत धरलेय् असे का मानले जातेय् ? या पोटनिवडणुका हा राजकीय पक्षाच्या जीवनातला दैनंदिन भाग आहे हे विसरून जाऊन प्रत्येक पोटनिवडणुकीत जनता पक्षाचे भवितव्य ठरणार आहे असा समज पसरत चालला आहे, ही खरी चिंतेची बाब आहे.'

' खरे आहे तुमचे म्हणणे. इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे लोकसभेतील बहुमत अगदी मामुली आहे; परंतु एक पोटनिवडणूक मजूरपक्ष

हरला म्हणून तो पक्ष राजकारणातून उठला असे कोणी म्हणत नाही. आपल्या इथे मात्र प्रत्येक निवडणूक आली की जनता पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आले असे वातावरण तयार होते. हे असे का व्हावे बरे?'

कारण जनता पक्ष हा लाटेतून मिळालेल्या विजयाचे अपत्य आहे. समजा की, ७७ च्या निवडणुका या साधारण निवडणुका असत्या म्हणजे आणीबाणीविषयीचे सार्वमत असे त्याचे स्वरूप नसते आणि काँग्रेसपक्ष जेमतेम बहुमत मिळवून केंद्रात सत्तेवर आला असता, तर जनता पक्ष अस्तित्वात राहिला असता का? त्यातले पक्ष फुटून निराळे झाले असते की नाही? लोकांना अशी भीती वाटते की, पराभवाचे दहा-पाच टोले ओळीने बसले तर जनता पक्षाच्या चिरफळ्या होतील, इतकेच नव्हे तर त्यातले कित्येक गट इंदिराबाईंना जाऊनही मिळतील. त्यामुळे प्रत्येक पोट-निवडणूक हा जनतापक्षाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे, अशी समजूत बळावत चालली आहे.

## वर्तमानपत्रे आणि जनता पक्ष

पण मी म्हणतो की बरोबर हीच विचार-सरणी बाईंच्या पक्षाला का लावीत नाही? दहा-पाच पराभव बाईंच्या पक्षाने खाल्ले की तो पक्ष तरी टिकणार आहे का? दर पोट-निवडणूक हा जनता पक्षाच्या जीवनमरणाचा प्रश्न व्हावा आणि बाईंच्या पक्षाच्या जीवन-मरणाचा प्रश्न होऊ नये, हा फरक का?

नेमका प्रश्न विचारलात. याचं उत्तर दुहेरी आहे. पहिले असे पहा की, बाईंचा पक्ष समजा निवडणूक हरला, तरी त्यांच्या भोवतीचे भुत्ये तो सोडून परत जाणार कुठे? जनता पक्ष त्यांना आपल्यात घेणार नाही नि चव्हाण काँग्रेसमध्ये लढाऊ वृत्ती नाही. बाईंबरोबर निदान जिद्दीने निवडणुका लढविल्याचे समाधान तरी आहे. त्यामुळे निवडणूक हरल्याने बाई काही गमावणार आहेत असं नाही. याउलट निवडणूक जिंकली तर तेवढीच चोराला लंगोटी! दुसरे कारण दिसते ते जास्त आशादायक आहे. ते असे की, वर्तमानपत्री जगाला अजून जनता पक्षाच्या भवितव्याशी आपले भवितव्य निगडित आहे असे वाटते. जनता पक्षाचे अस्तित्व वर्तमानपत्रांच्या आणि राजकारणात आपले लागेबांधे आहेत असे समजणाऱ्या समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणून प्रत्येक निवडणूक ही कसोटीची समजली जाते. बाईंचा पक्ष निवडून येणे हे संकट आहे, त्यांचा पक्ष वाढणे म्हणजे प्लेगची साथ पसरणे आहे, असे अजून सुशिक्षितांत समजले जाते हा त्याचा अर्थ आहे. 'अतिस्नेहः पाप-शंकी' हाही थोडासा भाग जनता पक्षाविषयी वर्तमानपत्रे शंकाकुल होतात, त्यात आहे.

पण मग बाईंचा पक्ष निवडून येतो किंवा त्याला भरघोस मते पडतात त्याचे कारण काय? शिवाय, वर्तमानपत्रांना जर जनता पक्षाविषयी इतकी आपुलकी वाटते तर ती दर निवडणुकीनंतर त्या पक्षावर अशी हिरी-रीने तुटून का पडतात?

तुमच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. जनता पक्षाने निवडणूक जिंकावी असे सामान्य सुशिक्षित नागरिकाला नि वर्तमान-पत्रांना वाटते हे खरे. बाईंनी निवडणूक जिंकणे ही धोक्याची गोष्ट आहे, हेही सर्व-जण मनोमन जाणतात; पण जनता पक्ष निवडणूक जिंकायला लायक पक्ष नाही अशीही प्रत्येकाची खात्री आहे. आपल्या क्रिकेट टीम-विषयी नाही का असेच होत? आपली टीम मॅचमध्ये हरावी असे कोणाला वाटेल? पण त्याचबरोबर विजय मिळाला तर नशिबाने, टीमच्या चांगल्या खेळामुळे नव्हे असाच भाव सगळ्यांच्या बोलण्या-लिहिण्याचा असतो की नाही? टीम मॅचमध्ये हरली तर 'आम्ही म्हणतच होतो असे' असे सगळे कलमबहा-द्दर हिरीरीने सांगतातच ना?

बरं पण बाईंची चलती कशामुळे आहे? त्यांच्या गैरकारभाराची, हुकुमशाही वृत्तीची इतकी उदाहरणे रोज डोळ्यांपुढे येत अस-ताना लोकांनी त्यांना निवडून द्यावे ही आश्चर्याची गोष्ट नाही का? बरं, जनता सरकारचा कारभार कितीही ढिला आहे असे मानले तरी परिस्थिती बाईंच्या कारकीर्दीत म्हणजे ७३–७४ साली जशी हाताबाहेर गेली होती, तशीही गेलेली नाही. किंमती स्थिर आहेत, वस्तू बाजारात मिळतायत्. कोणत्याच बाबतीत ७३ सालापेक्षा स्थिती वाईट आहे, असे म्हणता येणार नाही. इतके असून बाईंना मते पडतात ती कशी?

## इंदिराबाई आणि जमाव

यासाठी बाईंची जमावावरची पकड लक्षात घेतली पाहिजे. सामान्य माणसाला शत्रुघ्न सिन्हा किंवा राजेश खन्ना यांच्या-विषयी जे आकर्षण वाटते त्यात आणि बाईंविषयी वाटणाऱ्या आकर्षणात फार साम्य आहे. सामान्य माणसाला अभिनयाचे बारकावे समजत नाहीत. शत्रुघ्न सिन्हा इतर नटांपेक्षा जास्त चांगला आहे की नाही याच्या धासाधिशीत तो पडत नाही. तो सिनेमात जी कामे करतो तो केवळ खोटेपणा आहे हे तो जाणतो, सिनेमात शत्रुघ्न चांगला-वाईट कसाही वागला तरी त्यामुळे आपल्या दैनिक उसाभरीत काही फरक पडणार नाही हेही त्याला माहीत आहे; पण इतके असून त्याला शत्रुघ्न आवडतो. त्याचे सिनेमे तो आवर्जून पाहतो. आंध्र-फंडासाठी तो फिरत असेल तर त्या नटावर माणूस नोटा उधळतो. हे सगळे कशासाठी? तर शत्रुघ्न हा आपल्यापेक्षा निराळ्या कोटीतला मनुष्य आहे, तो एक जबरदस्त पुरुष आहे, त्याचे गुण आणि दोष हे दोन्ही आपल्या आवाक्याबाहेरचे आहेत—आपल्याला स्तंभित करणारे आहेत—अशी स्वयंभू जाणीव सामान्य माणसाला वाटते. त्यामुळे अशा 'लोकोत्तर' मनुष्याशी संबंध असावा अशी इच्छा वाटते. म्हणून खिशात पैसे नसताना उसने घेऊन माणूस शत्रुघ्नाच्या सिनेमाला जातो आणि बाईंना मत देतो!

या तुमच्या म्हणण्यात मला तरी नवीन असे काही दिसत नाही. बाईंचे नेतृत्व वैभूतिक (Chanismatic) आहे असे लोक नेहमीच म्हणत आलेत. तेच तुम्ही जरा निराळ्या आणि हेटाळणीच्या शब्दात सांगितलेत इतकेच.

तसे नाही. बाईंचे नेतृत्व वैभूतिक आहे, असे मला वाटत नाही. तसे असते तर जनतेला त्यागाचे, कष्ट करण्याचे आवाहन त्या करू शकल्या असत्या. गांधीजींचे नेतृत्व वैभूतिक होते. कारण लोकांना सहसा पटणार नाहीत अशा गोष्टी ते लोकांकडून स्वेच्छेने करवून घेऊ शकत. बाईंचे नेतृत्व हे प्रेरक नाही तर पेंग आणणारे आहे. जनतेने काही करण्याची जरूर नाही. सगळे माझ्या हाती सोपवा. माझ्या करामतीने मी सगळी-कडे आबादी-आबाद करून सोडीन हे बाईंचे

आश्वासन आहे. हिंदी सिनेमात तरी हेच घडते. नायकाने काही कष्ट न करता केवळ त्याच्या करामतीमुळे प्रेयसी, पैसा आणि प्रतिष्ठा यांचा लाभ त्याला घडतो. म्हणूनच मी म्हणतो की, सिनेमासृष्टीची किंवा चित्रपट-नायकाची जमावावरची पकड आणि बाईंचे मते गोळा करण्याचे कसब यात फार साम्य आहे.

पण इथे सिनेमानट आणि राजकीय नेता यांच्यातला मुख्य फरक तुम्ही नजरेआड करीत आहात. राजकीय नेत्याच्या कर्तृत्वाने लोकांच्या जीवनात परिवर्तन घडून यावे अशी अपेक्षा असते. सिनेमानटाकडून तशी अपेक्षा असत नाही. बाईंनी भलेही समृद्धीचे आश्वासन दिलेले असो, त्या ते पुरे करू शकत नाहीत याची खात्री तर आता पटली आहे ना? मग हे आकर्षण का?

त्याचे असे आहे की, लोक आता राजकारण्यांच्या उलट-सुलट उड्यांतून समृद्धी येईलच असे मानीतच नाहीत. गेली तीस वर्षे नाना हिकमती लढविल्या गेल्या. मोठे कारखाने झाले, हरितक्रांती झाली, राष्ट्रीयीकरणे झाली, योजना झाल्या, शिक्षणातले प्रयोग झाले, सहकार झाला, सगळे झाले. आपली प्रगती काय गतीने आणि कितपत व्हायची याचा पुरा अंदाज जनतेला आला आहे. त्यामुळे एकूण राजकारणाकडेच तटस्थतेने आणि काहीशा कुत्सितपणे लोक पाहतात. म्हणून तर राजकारण हा एक सातत्याने चाललेला प्रवाह आहे ही कल्पना सोडून लाटांचे राजकारण खेळले जाऊ लागलेले आहे. परिणाम असा आहे की; शिखरस्थ राजकारणाकडे चित्रपट पाहावा इतक्या अलिप्ततेने लोक पाहतात. आता या चित्रपटात स्टार-व्हॅल्यू बाईंना आहे, म्हणून मते त्यांना मिळतात.

## नाळ तुटलेले राजकारण

म्हणजे बाईंची चलती थांबवायची असेल तर राजकारणाविषयीचे लोकातले औदासीन्य घालविले पाहिजे.

कसे बोललात? पण लोकांचे राजकारणाविषयीचे औदासीन्य घालवायचे याचा अर्थ बाई आपल्या घराशी भाडोत्री लोकांचे मेळे भरवायच्या तसे करायचे असा मात्र नाही. सामान्य माणसाला हा विश्वास वाटला पाहिजे की, आपण कोणी तरी आहोत, राजकारणात आपला अर्थपूर्ण सहभाग असू शकतो, आपण आपल्या थोडक्या कुवतीनुसार का होईना; पण सार्वजनिक कार्यात भाग घेऊ शकतो. कोणा लोकोत्तर नेत्याच्या हातातले बाहुले होऊन राहणे एवढेच आपल्या नशिबी नाही हे केव्हा होईल? तर राजकीय पक्ष लोकशाही तत्त्वांवर संघटित होतील तेव्हा. आज इंदिरा कॉंग्रेस, कॉंग्रेस किंवा जनता या तीन प्रमुख पक्षांपैकी एकही अशा रीतीने संघटित पक्ष नाही. सर्व अॅड-हॉक कारभार आहे. त्यामुळे उमेदवार लादले जातात, पूर्वपुण्याईवर आता निष्प्रभ असलेले नेते पक्षाध्यक्ष होतात, वारा येईल तशी धोरणे बदलतात, उच्च स्तरापासून तळाच्या कार्यकर्त्यापर्यंत विचारांचे आणि माहितीचे दळणवळण राहत नाही. सारांश, सारी बजबजपुरी माजते.

पण पक्ष असे संघटित झाले तरी बाईंसारख्या जबरदस्ताचे वर्चस्व राहणारच.

राहील ना; पण हे वर्चस्व एका थरापासून त्याच्या खालच्या थराकडे असे पाझरत येईल आणि मग जनतेपर्यंत पोचेल. त्यामुळे जनतेपासून वरपर्यंत उलटे दडपणही राहू शकेल. बाईंच्या बाबतीत काय आहे की, बाई आणि जमाव यांच्या दरम्यान 'टेलीपॅथिक वन् वे कम्युनिकेशन' आहे. तो प्रकार नाहीसा होईल. मागे मी ज्युडिथ बाऊन या बाईने 'गांधीज् राईझ टु पॉवर' म्हणून पुस्तक लिहिले आहे. ते वाचीत होतो. तिने म्हटले आहे की, गांधींनी प्रांतोप्रांती सब्‌कॉंट्रॅक्टर्स नेमून त्यांच्याकरवी चळवळीचा प्रसार केला. हे 'सब्‌कॉंट्रॅक्टर्स' राजकारणाला आवश्यक आहेत.

पण अशा पार्टी बॉसेसना खडे चारून तर बाई सर्वोच्च नेत्या झाल्या ना?

पार्टी बॉसेस वेगळे आणि सब्‌कॉंट्रॅक्टर्स वेगळे. सब्‌कॉंट्रॅक्टर्स हे जनता आणि राजकारण यातला दुवा आहेत. अखेर राजकारणाचे पोषण जनतेकडून होणार आहे. त्यात नवे विचार, नव्या कल्पना जनतेकडून येणार आहेत. खऱ्या उलथा-पालथी आणि परिवर्तने ही जनतेत व्हायला हवीत आणि तिचे पडसाद राजकारणात उमटले पाहिजेत. राजकारणात धक्के द्यायचे नि त्यामुळे जनतेत हालचालींचा आभास निर्माण करायचा ही फसवणूक आहे. □


NEW TITLES RECEIVED

| | |
|---|---|
| 1. Portrait of Parliament – ( Reflection & recollection 1952–77 ) – Hiren Mukerjee | Rs. 35–00 |
| 2. Murder of the Mahtma – ( Court cases from a Judge's Notebook ) – G. D. Khosla | „ 10–50 |
| 3. East wind rain – ( Bestseller – A novel of intigue & suspense ) – Richard N. Nash | „ 15–75 |
| 4. Recoil – ( Bestseller ) – Brian Garfield | „ 12–00 |
| 5. How did sex begin ? – R. Brash | „ 00–65 |

मराठी

| | |
|---|---|
| १. ब्लफ मास्टर – ( गुन्हेगार कथा ) – अशोक परांजपे | रु. १८–०० |
| २. नरपशू – ( सत्यघटनेवरील कथासंग्रह ) – प्रभाकर दिघे | „ २०–०० |
| ३. त्या रामप्रहरी ! – जेम्स हॅडले चेस | „ १०–०० |
| ४. मांडव – ( कथासंग्रह ) – योगिनी जोगळेकर | „ १०–०० |

- पुस्तकांच्या किंमती फार भडकल्या आहेत ! पुस्तके विकत घेण्यापेक्षा एखाद्या चांगल्या वाचनालयाचे सभासद व्हा व पैसे वाचवा !!
- 'फिनिक्स' एक आगळे, एक वेगळे वाचनालय !!!

THE PHOENIX LIBRARY

727, Opp. Sadashiv Post, Pune–411 030

उन्हाळ्याच्या सुट्टीत परगावचे लोकांकरिता प्रवेशफीमध्ये भरपूर सवलत !!

# महाराणीबाग कोठी नंबर २

आमदार विनायकराव पाटील
निफाड


आज दिल्लीसाठी निघणे आवश्यक होते. माहीत नव्हते केव्हाची तिकिटे मिळतील. एका मित्राला तिकिटे काढायला सांगितले होते; परंतु ए. आय. सी. सी.चे अधिवेशन असले की विमानाची तिकिटेही एस्. टी. सारखी दुर्मिळ होतात. मुंबईला पोचल्यावर समजले की तिकिट तेरा तारखेच्या सकाळी सहा-तीसच्या उड्डाणाचे आहे म्हणून. म्हणजे पहाटे चारलाच उठणे आले. पहाटे उठायचे फार जिवावर येते !

विमानात बसल्याबरोबर लक्षात आले की, सभोवताली सगळी मराठी कुटुंबे बसली होती. अगदी नाशिक–पुणे आरामगाडीत बसल्यासारखे वाटत होते. हळूच चौकशी केली तेव्हा समजले, राजा पाटील यांच्या काश्मीर-सहलीची गर्दी आहे. सहलीला निघालेल्या कुटुंबातील प्रमुख हा त्याच्याबरोबर आलेल्या माणसांना विमानाची माहिती समजावून सांगत होता. हात वर करून कुठले बटण दाबले म्हणजे हवाई सुंदरी येते, कुठले दाबले म्हणजे दिवे लागतात अन् कुठल्यामुळे थंड हवा वाहू लागते हे समजावून झाल्यावर सगळे कुटुंबीय त्याची प्रात्यक्षिके करीत होते. अर्धा तास सर्व मंडळींनी तऱ्हेतऱ्हेची बटणे अनेकदा चालू–बंद करून पाहिली. नंतर मंडळी स्थिरावली. मनात विचार येत होता आपण बरेच लवकर निघालो आहोत. दिल्लीत दोन दिवस मिळतील. करणार काय ? कारण दिल्लीत जे मित्र आहेत ते सर्व आपल्या 'इंदिरा गांधींबरोबर न जाण्याची भूमिका 'वाले आहेत व जे माहीत त्यांना माझ्यासारख्यांनी सांगून काही परिणाम होणार नव्हता. एकंदरीत काय, वेळ रिकामा !

म्हटलें चला, गुड्डुकडे जाऊ, वेळ मजेत जाईल ! गुड्डू म्हणजे प्रेमानंद पटनाईक. विजू पटनाइकांचा मुलगा. याची दोस्ती म्हणजे एक मजेदार किस्सा आहे. दिल्लीतील एका कारखानदाराच्या मुलाच्या लग्नानिमित्त झालेल्या गाण्याच्या कार्यक्रमात याची–माझी गाठ पडली. कार्यक्रमाला मी वगळता सर्व लोक सूट किंवा बंद गळ्याच्या कोटात आले होते. सोबत सजलेल्या त्यांच्या बायका ! गावच्या धोब्यानं भरपूर नीळ घालून धुतलेल्या पायजमा–झब्ब्यात मीच एकटा होतो. कार्यक्रमाला सुरुवात झाली. मी सगळ्या श्रोत्यांमध्ये उठून दिसत होतो. एखाद्या लग्नाच्या पंक्तीमध्ये कळकट कपडे घातलेला आचारी नवऱ्यामुलाशेजारी बसावा तसा माझा अवतार दिसत होता. गायिका हैद्राबादच्या होत्या. पहिल्या एक–दोन गजल झाल्यावर यजमानांनी माईकवरून घोषणा केली की कोणाला व्यक्तिगत फर्माइश करायची असेल तर करावी. मी हात वर केला. गाणाऱ्या बाईंच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली. आता हा कळकट बावा काय सांगतोय ? मी गालिबसाहेबांची एक गजल फर्मावली –

'इष्कमें गैरतें जसबातने रोने न दिया।
वरना क्या बात थी किस बातने रोने न दिया '

बाईंनी विनंती केली, 'जरा आपण संपूर्ण गजल म्हणून दाखवाल



डावीकडून – ना. शरद पवार, खासदार सौगत राय, आ. विनायकराव पाटील, प्रियरंजनदास मुनशी, खा. उन्नीकृष्णन्, खा. वायलर रवी, खा. दिनेश गोस्वामी (आसाम).

तर बरे होईल !' विनंती कसली ? हा माझा धडधडीत अपमान होता, चांगले कपडे नाहीत म्हणून ! मी ताड्कन उठलो व सांगितले, 'बाईसाहेब, आपल्याला जर ही गजल पाठ नसेल तर मी एकदा सांगून काही आपण ती गाऊ शकणार नाही आणि आपण गाणार असाल तर त्याचा अर्थ आपल्याला गजल माहिती आहे. आपण फक्त माझी परीक्षा घेता आहात.' बाईंच्या लक्षात आले की हा या मैफलीत नवखा वाटत असला तरी मैफिली याला नवीन नाहीत. त्यांनी गायला सुरुवात केली. कमालीचा आवाज लागला. मुळातच गजल भन्नाट ! बाई गायल्याही मनापासून. सर्व श्रोत्यांनी प्रचंड दाद देऊन पसंती दर्शवली. गजल संपली आणि मी उभा राहिलो. बाईंना सांगितले की, 'गाताना आपण ही कडवी गायला विसरलात !' आणि मी ती त्यांना म्हणून दाखविली. सर्व श्रोत्यांनी दाद दिली आणि आणखी फर्माइश आपणच करा असा गिल्ला केला. बाईंनी माफी मागितली. नंतर रात्रभर माझी फर्माइश सुरू होती आणि मी स्वतः एकदोन गजलनंतर काही शेर माइकवर म्हणत असे. पब्लिक खूष होते. कार्यक्रम संपल्यानंतर बऱ्याच लोकांनी माझे अभिनंदन केले. त्यात मोहम्मद युनुस हेही होते. इंदिरा गांधींचे त्या वेळचे निकटतम सहकारी त्यांनी स्वतः ओढीत असलेल्या चिरूटचा डबा मला भेट दिला. मी चिरूट ओढीत नसलो तरी डबा ठेवून घेतला. म्हटले असू द्या ! ओढून पाहू ! दुसऱ्या एका गृहस्थांनी आपली ओळख करून दिली. 'मी प्रेम पटनाईक !' मी म्हटले, 'या आडनावाचा एकच माणूस मला माहिती आहे आणि ते म्हणजे विजू पटनाईक !' त्याने लगेच उत्तर दिले, 'मी त्यांचा मुलगा.' मी सहज विचारले, 'सध्या त्यांचे काहीच ऐकू येत नाही. कुठे असतात ?' प्रेम थंडपणे मला म्हणाला, 'जेलमध्ये !' आणीबाणीत त्यांनाही अटक झाली होती हे मी विसरलो होतो. तो म्हणाला, 'घरी येता ?' आम्ही निघालो. रस्त्यात तो त्याच्या वडिलांना अटक होणे कसे गरजेचे होते हे सांगत होता. 'बरे झाले ! आता तरी त्यांना विश्रांती मिळेल. भेटणारे लोक कमी होतील. दिनक्रमात नियमितपणा येईल. त्यांचे आयुष्य वाढवण्यासाठी इंदिरा गांधींनी एक प्रकारे मदतच केली, नाही का ?' या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नव्हते. कारण प्रेम खोटे बोलत होता. मी काँग्रेसवाला आहे म्हणून तो हे म्हणतोय असे मला वाटले. त्याचा चेहरा उदास झाला होता अन् डोळे भरून आले होते. मी म्हटले, 'चलता है पटनाईकसाहब !' तो म्हणाला, 'कृपा करून मला साहेब म्हणू नकोस. माझ्या घरचे लोक मला गुड्डू म्हणतात. तूही मला गुड्डूच म्हणत जा!' त्या दिवशी माझे दिल्लीतले चंबूगबाळे जे पटनाइकांच्या घरी पडले ते कायमचेच !

विमानावरून थेट गुड्डूच्या घरी गेलो.

महाराणी बाग, कोठी नं. २

मी ए. आय्. सी. सी. च्या अधिवेशनाकरिता आलो आहे हे त्याने

ओळखले म. प्र. काँग्रेसच्या बैठकीत मी घेतलेली भूमिका त्याला माहिती होती. तो म्हणाला, 'मॅडमसे लड़ने आये हो?' मी म्हटले, 'लढणारे आणीबाणीतच लढले. आता लढणे हा शब्दप्रयोग बरोबर होणार नाही. फक्त त्यांच्याबरोबर काम करायचे नाही व या प्रवृत्तीला आपापल्या परीने, आपल्या मित्रांसोबत तोंड द्यायचे.'

एकदा भूमिका निश्चित घेतल्यानंतर अनेक प्रांतातले या विचाराचे आम्ही मित्र एकत्र आलो होतो. केरळचे अँन्थनी, उन्नीकृष्णन्, वायलर रवी, बंगालचे सौगत रॉय, प्रियरंजनदास मुनशी, उत्तरेतील शंकरदयाळ सिंग, चंद्रजित यादव, आर. के. मिश्रा, गुजरातचे कांतिलाल घिया, आसामचे दिनेश गोस्वामी, काश्मीरचे भीमसिंग व इतर अनेक प्रांतांतील लोक काँग्रेसचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एकत्र बसायचे ठरले व बसलोही. महाराष्ट्रातील या विचारांचे मुख्य प्रवर्तक श्री. शरद पवार व श्री. आबासाहेब कुलकर्णीही होते. साठी उलटली तरी आबासाहेबांची धडपड कुणाही तरुणाला लाजवील अशी असते. सर्व प्रांतांतील निवडक एकशेपन्नास लोक हजर होते. प्रथमच एक गोष्ट स्पष्ट करण्यात आली की, ज्यांचा इंदिरा गांधीं-बरोबर जायचे नाही असा ठाम निर्धार आहे अशाच लोकांची ही बैठक आहे. हे गृहीत धरूनच पुढील कार्यक्रम सुरू झाला. प्रत्येकजण आपापले विचार मांडू लागला. पोटतिडकीने व खंबीरपणे आपले विचार सर्वजण मांडीत आहेत असे पाहून बरे वाटले. कारण आझम-गडच्या विजयानंतर बरेच लोक पळतील असे वाटले होते; पण त्याचा उत्तरेतल्या कार्यकर्त्यांवर काहीच परिणाम दिसत नव्हता. आझमगडच्या विजयाने दिपले होते महाराष्ट्रातील नेते. त्यांना घाई झाली आहे इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्याची. तसे आझमगडचा निकाल हे निमित्त होते. त्यांना महाराष्ट्रातील सरकार सांभाळण्यासाठी इं. काँग्रेसची युती सोयीची वाटत होती हे खरे. नाही तर त्यांनी इंदिरा गांधींना विधानसभेच्या निवडणुकीत एवढ्या सणकून शिव्या घातल्या नसत्या. निकालानंतर संयुक्त मंत्रिमंडळ झाल्याबरोबर समस्त मंडळींना साक्षात्कार झाला की फक्त इंदिरा गांधीच या देशाला नेतृत्व देऊ शकतील. अरे! देऊही शकतील व दिलेले आहेही. प्रश्न आहे आपण त्यातला खोटेपणा, हुकुमशाही प्रवृत्ती, स्वतःच्या मुलाच्या ताब्यात देश देण्यासाठी चाललेली अश्लाघ्य घाई, आणीबाणीतील अत्याचार लक्षात आल्यावरही त्यांच्याबरोबर जायचे की नाही याचा! त्या आझमगड व इतर काही पोटनिवडणुका जिंकल्या; आणखीही जिंकतील! केवळ विजय मिळाले म्हणून त्यांची प्रवृत्ती बदलत नाही, त्यातून एखादे तत्त्वज्ञान सिद्ध होत नाही. लोकप्रियता म्हणजेच लोकशाही नाही! पण यांना सांगणार कोण? दिसला विजय की पळाले पाय लावून. त्यातही ज्यांनी अनेक वर्षे सत्ता भोगली आहे ते जास्त अधीर. सत्तेचे रौप्यमहोत्सव साजरे केलेल्यां-चाच भरणा पळणाऱ्यांमध्ये अधिक! त्या मानाने श्रीमती प्रभा राव व रामराव आदिक हे शंभरपटींनी बरे. त्यांना महाराष्ट्रात कोण सत्तेवर येईल हे माहीत नसताना त्यांनी निदान धाडस तरी केले. आमची मंडळी त्या वेळी बाई कशा हुकुमशहा आहेत, देशाचे व काँग्रेस संघटनेचे त्यांनी कसे नुकसान केले आहे हे सभांमधून सांग-ण्यात गर्क होती व इं. काँग्रेसचे जवळजवळ राष्ट्रीय काँग्रेसइतकेच लोक निवडून आल्याबरोबर रेकॉर्ड बदलली— व : देशाला इंदिरा गांधीच नेतृत्व देऊ शकतील. गरिबांच्या आणि मागासवर्गीयांच्या त्याच एकमेव नेत्या आहेत. आपण त्यांच्याबरोबर काम करणे ही राष्ट्राची व काळाची गरज आहे!' कमाल आहे या लोकांची! हेच उद्गार निवडणुकीआधी काढले असते तर मला त्यांच्याविषयी आदर वाटला असता. चुकीचे किंवा बरोबर हे काळ ठरवील; परंतु निदान प्रामाणिक उद्गार आहेत असे तरी वाटले असते. आता यशापयशाचे हिशेब व स्वतःची राजकीय सोय याला ही माणसे तत्त्वाच्या चौकटी शोधीत फिरत आहेत असे वाटले आणि देशाच्या ज्या भागात श्रीमती गांधींचे प्राबल्य आहे, ज्या लोकांना प्रत्यक्ष पराभवाला तोंड द्यावे लागत आहे ते लोक खंबीर! मीटिंगमध्ये बऱ्याच लोकांनी इंदिरा गांधींच्याबरोबर जाणे का नको ते सांगितले. शेवटी आबासाहेब कुलकर्णी बोलायला उठले. ते म्हणाले, 'तुम्ही सर्वजण म्हणता आहात ते खरे आहे. आपल्याला स्वतंत्र अस्तित्व टिकवायचे हेही खरेच; पण हे सर्व पुढचे कार्यक्रम आहेत. महत्त्वाचा प्रश्न आहे उद्या अधिवेशनात आपला ठराव कसा मंजूर करून घ्यायचा? कारण ठिकठिकाणाहून दोन्ही काँग्रेस एक व्हाव्यात याचा दबाव आणण्याकरिता माणसे मुद्दाम आणली गेली आहेत व महाराष्ट्रातून काही बसेस भरून लोक आणले गेले आहेत. अधिवेशनात गोंधळ होण्याचा संभव आहे. तेव्हा उद्या कसे तोंड द्यायचे ते बोला!' प्रश्न अनेक वर्षांच्या अनुभवातून आलेला होता; पण आम्ही काय करू शकणार होतो? आम्ही लोक आणले नव्हते, आणू शकणार नव्हतो. आमच्याजवळ पैसे नव्हते. आम्ही म्हणालो, 'आम्ही आमचे विचार मांडू. बघू या काय होते ते!'

## चंद्रजित यादवांच्या घरी

रात्री चंद्रजित यादवांच्याकडे जायचे ठरले. गप्पा मारणे एवढाच कार्यक्रम. आझमगडचे उमेदवार स्वतः चंद्रजित यादव असल्यामुळे माहिती भरपूर मिळेल ही अपेक्षा. जरा वेळ हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर गाडी मूळ पदावर आली. आझमगडचा पराभव! चंद्रजित म्हणाले, 'काय करणार! मी स्वतः उमेदवार म्हणून भरपूर काम केले. सभांना लोकही चांगले जमत असत; पण शेवटी शेवटी वातावरण बिघडत गेले. रामनरेश यादव हे मुख्यमंत्री. आझमगड जिल्ह्यातील प्रशासनातील अधिकारी व इतर सर्व प्रमुख जागी यादव असल्या-मुळे सर्व यादव एका बाजूला व यादवेतर जाती एका बाजूला असा सामना झाला. त्यात जनता उमेदवार व राष्ट्रीय काँग्रेसचा उमेदवार दोघेही यादव. त्यामुळे वातावरण आणखीनच बिघडले. बरे, या मत-दारसंघात यादव मतदार एक लाख पन्नास हजार. जनता उमेदवार जर पडला तर माझे मुख्यमंत्रिपद काढून घेणार आहेत असे रामनरेश सांगत होते व यादवांकडे स्वातंत्र्यानंतर प्रथमच आलेले मुख्यमंत्रिपद आपण जाऊ देणार आहात काय? असा सवालही यादवांना ते खाजगीत करीत. बहुतेकांना ते पटलेले असावे. शेवटच्या दोन दिवसांत जनसंघाच्या कार्यकर्त्यांनी, 'काँग्रेसच्या चंद्रजित यादवांनी माघार घेतली असून त्यांनी जनता उमेदवाराला मते द्या असे आवा-हन केले आहे' असे सांगितले. वेळ थोडा राहिलेला व मी एवढ्या मोठ्या मतदारसंघात किती लोकांना सांगू शकणार होतो? हे वेटे अर्धी चड्डीवाले सर्व खेड्यात एका दिवसात जाऊन पोचले. मोहसिना

कडवई या मुस्लिम उमेदवार व या मतदारसंघात एक लाख पस्तीस हजार मुस्लिम उमेदवार, हे सगळे एकत्र आले. बरे, इंदिराबाईंनी प्रचारदौऱ्यात इतका खोटा प्रचार केला की त्याला काही सीमा नाही!' -मी म्हणालो, 'खोटा म्हणजे कसा? काही उदाहरणे सांगू शकाल?' चंद्रजित म्हणाले, त्या भाषणात सांगत असत की, 'चंद्रजित यादवांना राजकारणात मी पुढे आणले, मी मंत्री केले आणि आता बघा अडचणीच्या वेळेला कसा मला सोडून पळाला!' आता बोला! शिवाय त्या सगळ्या जाहीर सभांत सांगत की, 'आझमगड इतके मागासलेले आहे. इथे कारखानदारी नाही, चांगले रस्ते नाहीत, तरुणांना रोजगार नाहीत हे मला त्या वेळचे तुमचे खासदार चंद्रजित यादव यांनी कधीच सांगितले नाही. नाही तर मी केव्हाच सुधारणा केल्या असत्या! हा तुमचा प्रतिनिधी तुमच्या अडचणींची साधी माहिती किंवा निरोपही मला देऊ शकला नाही. अशा प्रतिनिधीला तुम्ही पुन्हा निवडून देणार आहात का? आता मला हे करावेसे वाटते तर आता माझ्याकडे सत्ता नाही!' काय भन्नाट कल्पना आहे! खोटे बोलावे तर असे. चंद्रजित म्हणाले, 'अरे विनायक, हे तर काहीच नाही. शेवटच्या दोन दिवसांत तर प्रत्येक तालुक्यात जाऊन त्या सांगायच्या की, 'शेजारच्या तालुक्यात चंद्रजित प्रचार करीत असताना त्याच्या जीपने काही हरिजन महिलांना धडक दिली, काही आदिवासी चेंगरले; पण हा मग्रूर माणूस त्यांची प्रेतेसुद्धा न उचलता निघून गेला!' अहो, बघायला कोण जातंय? एवढी मोठी बाई खोटे बोलेलच कशी? बरे, उत्तरे द्यायला वेळही नव्हता. मतदान काही तासांवर येऊन ठेपलेले; साधने कमी, पैसे कमी. बाईने प्रचंड पैसा आणि साधने उभी केली होती. आपले काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आलेच नाहीत. फक्त यशवंतराव चव्हाण आणि डॉ. करणसिंग हेच आले. आपले लोक अजून घर सोडायलाच तयार नाहीत. बाईंनी देशातील सर्व अल्पसंख्यांक जातींचे नेते जमा केले होते.' एवढ्यात वसंतरावदादांचा फोन आला आणि चंद्रजित फोन घ्यायला आत गेले. मी मात्र इंदिराजींच्या निवडणूक जिंकण्याच्या तंत्रावर मोहित झालो होतो.

रात्रीचा एक वाजला होता. महाराणी बागेकडे निघालो. उद्या अधिवेशनाचा पहिला दिवस. म्हटले, बघू या काय होते ते!

### तालकटोरा मैदानावर

पंधरा मे. आज सकाळी नऊ वाजता अधिवेशन सुरू होणार होते. नऊच्या सुमारास तालकटोरा बागेत पोचलो. झेंडावंदनाची तयारी पूर्ण झाली होती. प्रथेप्रमाणे झेंडावंदनाने अधिवेशनाला सुरुवात होत असते. काँग्रेस सेवादलाचे युवक व युवती उन्हात उभ्या होत्या. मे महिन्यातले दिल्लीतले सकाळचे ऊनसुद्धा फार भयानक असते. आम्ही सावलीत उभे होतो. झेंडा फडकावल्यावर स्वर्णसिंगांनी भाषण सुरू केले. मला सेवादलाच्या सैनिकांची दया आली. कोण जाणे, बिचारे आधी केव्हापासून तेथे उन्हात उभे होते. सरदारसाहेबांनी सुरुवात केली. 'काँग्रेसला नव्वद वर्षांचा इतिहास आहे...' मी मनात म्हटले, हे सगळे आत हॉलमध्ये गेल्यावर सांगा को! बाहेर उन्हात कशाला सगळ्यांना पिळताय? मी मोठ्याने शेरा मारला, 'एखादी पोरगी फिट येऊन पडेल उन्हाने!' माझे वाक्य संपते न संपते तोच एक सेवादलाची मुलगी फिट येऊन कोसळलीच. लोक सहानुभूतीने तिच्याकडे पाहू लागले. काही कार्यकर्त्यांनी तिला उचलून सावलीत नेले. आमच्या कोपऱ्यात अशा गंभीर प्रसंगीही हशा पिकला. सरदार-साहेबांची नव्वद वर्षांची कहाणी सुरूच होती.

तालकटोरा मैदानातील स्टेडियम म्हणजे पाच हजार माणसे बसू शकतील अशी प्रशस्त जागा. शिवाय समोर दोन हजार खुर्च्या मांडल्या होत्या. आम्ही प्रवेश केला तेव्हा पाचशे लोक असावेत. अर्ध्या तासात सर्व दोन हजार खुर्च्या भरल्या व स्टेडिअमच्या पायऱ्यां-वर लोक बसले होते. मूळ राजकीय ठराव यशवंतराव चव्हाणांनी मांडावा असे अध्यक्षांनी सुचविल्यानंतर चव्हाण यांनी ठराव मांडला. ठरावात दोन्ही काँग्रेसचे विलिनीकरण नाही असे स्पष्ट केले होते. तसेच सर्व जुन्या काँग्रेसवाल्यांना वाटल्यास त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या झेंड्याखाली या पक्षात यावे. आमचा पक्ष कोठेही विलीन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. एवढा खुलासा झाल्यावर सबंध सभागृहाने टाळ्या वाजवून प्रचंड प्रतिसाद दिला. त्यानंतर ठरावाला पाठिंबा देण्यासाठी करणसिंग उठले. त्यांनी सुरुवातीलाच सभागृहा-वर ताबा मिळविला व प्रत्येक वाक्याला ते टाळ्या मिळवीत होते. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, 'जे स्वाभिमानशून्य असतील त्यांनी इंदिराजींकडे जावे. उगाच आम्हाला अडचणीत आणू नका. खंबीर उभे रहा. पुष्कळ वर्षे सत्ता भोगून झाली आहे. आता पक्षकार्याला वाहून घ्या!' सभागृह टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात प्रतिसाद देत होते. त्यांनी शेवटी महाराष्ट्र सरकारला व मुख्यमंत्र्यांना असा इशारा दिला, 'तुमच्या संयुक्त सरकारमुळे सबंध काँग्रेस पक्षाची अप्रतिष्ठा होत आहे. तेव्हा हे संयुक्त सरकार मोडा! एका राज्या-तील सरकार टिकविण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाची इभ्रत पणाला लावणे योग्य नव्हे.' सभागृहाने कडकडून टाळ्या दिल्या. म्हटले चला, ठरावही योग्यच झाला. सर्व सभागृहाचे मतही तसेच दिसते. आता कोणीच विरोध करीत नाही. तेव्हा आपण उगाचच आपले नाव देऊन भाषण ठोकीत बसू नये. त्यापेक्षा दिल्लीतील काही मित्रांच्या गाठी घ्याव्यात. सभागृहातून बाहेर पडलो. बाहेर दूर एका झाडाखाली पाणीपुरीवाला बसलेला होता. त्याच्यासमोर पांढऱ्या-शुभ्र कपड्यांतला पुढारी काही खात होता. भूक लागलीच होती म्हणून गेलो. जवळ जाऊन बघतो तर मा. ना. सुंदररावजी सोळंके, मंत्री, महाराष्ट्र राज्य हे पळसाच्या पानावर दहीवडा खाण्यात गुंतले होते! वडा संपला होता, दही ओरपण्याचा कार्यक्रम सुरू होता. मला पाहिल्यावर ते संकोचले. त्यांना काय करावे ते सुचेना. दह्या-सह पान फेकून देऊन त्यांनी हात धुतला. मला उपचार म्हणून विचारले, 'काय विनायकराव, खाणार का?' मी म्हणालो, 'मी असा उघड्यावरील पदार्थ खात नाही!' ते हसत हसत सभागृहात

**रात्रीचा एक वाजला होता. महाराणी बागेकडे निघालो.**

गले. ते नक्की गेले याची खात्री केल्यावर मी मांडी घालून पाणी-पुरीवाल्यासमोर बसलो आणि पोटभर दहिवडे खाल्ले! पाणीपुरी-वाल्याने हलकेच विचारले, 'साहब, वो शरमाके भाग गया वो कौन था?' मी त्याला झापले. म्हटले, 'तुला काय करायचे आहे? ते आमचे साहेब आहेत!' आता मला जेवायची गरजच उरली नव्हती. गाडीत बसलो व सध्या दिल्लीत स्थायिक झालेले माझे लहानपणचे दोस्त श्री. विलास, डॉ. जयमंगला, सौ. मीना या गोगटे मंडळींकडे गेलो. भेटून बरीच वर्षे झाली होती; पण सर्व आठवणी ताज्या होत्या. गोगटे–पाटील कुटुंबातील बातम्यांची देवाण–घेवाण करण्यात वेळ कसा गेला ते समजलेच नाही.

घरी परतलो. खोलीत गुड्डू बसला होता. त्याने विचारले, 'अरे, ऐन वेळी कुठे गेला होतास? मला अशी माहिती मिळाली आहे की, अधिवेशनात दुपारनंतर इंदिरावाद्यांनी गोंधळ घातला होता. त्याचे पर्यवसान कार्यकर्त्यांत मारामारी व खुर्च्या फेकाफेकीत झाले होते. बऱ्याच जणांना मार लागला होता.' आता दुःख व्यक्त करून काहीही फायदा नव्हता. आपण सर्व ठीक आहे असे गृहीत धरून परत गेलो हे चुकलेच. माझ्या उपस्थितीने हे टळणार होते असे नाही; परंतु मारामारीच्या वेळी आपण नव्हतो याची हळहळ वाटत होती. उद्या इमानदारीत अधिवेशनाला हजर रहायचे असे मनोमन ठरवून दुपारी नेमके काय गोंधळ झाले, कुणी कुणाला कसे मारले याची माहिती काढायला बाहेर पडलो.

## प्रियरंजनचे भाषण

१६ मे. सकाळी अधिवेशनाच्या जागी पोचलो. तिथे पन्नासएक तरुण व काही महिला निदर्शने करीत असलेल्या दिसल्या. हातांत फलक होते, 'गुंडाशाही नहीं चलेगी!' याच लोकांनी काल इंदिरा-वादी घोषणा करून इतरांची भाषणे बंद पाडण्याचा प्रयत्न केला होता व त्याचा परिणाम म्हणून बंगाल व केरळच्या युवकांकडून भरपूर मार खाल्ला होता. त्या माराच्या निषेधार्थ घोषणा चालू होत्या. पत्रकार व फोटोग्राफर्स त्यांची माहिती व फोटो घेत होते. आत जाऊन बसलो. वातावरणात अजिबात तणाव नव्हता. कारण काल भाषणे बंद पाडणाऱ्या व गडबड करणाऱ्या इंदिरावाद्यांच्या मानाने इतरांची संख्या व बळ जास्त असल्याने त्यांनी आज 'शांततामय निदर्शनांचा' मार्ग अवलंबिला होता. बाहेर निदर्शने करणारेही नंतर शांतपणे आत येऊन बसले. आज सर्वांत चांगले भाषण प्रियरंजन दास मुनशी यांचे झाले. त्याने सर्वांना ठोकून काढले. तो म्हणाला, 'आता ही ऐक्याची भाषणे कृपा करून बंद करा. ऐक्याची भाषणे करून आपल्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करू नका. अनेक लोक मनाने इंदिरावाले आहेत. ते फक्त इकडचे जास्तीत जास्त लोक घेऊन जाण्याचे श्रेय घेऊ इच्छितात. मी त्यांना विनंती करतो की, लवकर जा. जे खंबीर लोक रहातील त्यांच्या जिवावर हा पक्ष चालेल आणि लोकही त्यांच्यामागे येतील. यानंतर होणाऱ्या अधिवेशनात आपल्या कार्यक्रमाविषयीची चर्चा असेल. पुन्हा एकीकरण–विलिनीकरण असणार नाही. त्याचे आपण आजच दफन करणार आहोत. कालच श्री. सिद्धार्थ शंकर रे यांनी सांगितले की, आपण इंदिराजींबरोबर गेले पाहिजे. पराभवानंतर वर्षभर श्री. रे कोठे गेले होते? फक्त इंदिराजींची वकिली करण्यापुरते अधि-वेशनात यायचे, नंतर कार्यकर्त्यांना तोंडही दाखवायचे नाहीत. त्यांना आम्हाला शिकवायचा काहीही अधिकार नाही. त्यांच्या राजवटीत दहा हजार तरुण मुले विनाचौकशी तुरुंगात होती. त्यांच्याविषयी यांना काहीच वाटले नाही. आता चौकशी करून संजयला आत डांबले आहे तर यांना केवढी न्यायाची काळजी पडली आहे!' प्रिय-रंजन पुढे म्हणाले, 'श्रीमती गांधी यांना आम्ही आमची सगळी शक्ती दिली, त्यांची देशभर जाहिरात केली. त्यांच्यासाठी लाखोंच्या सभा भरविल्या. आम्हाला वाटत होते, त्या भारतमाता आहेत; परंतु त्यांच्या वागणुकीवरून हेच सिद्ध झाले आहे की, त्या फक्त संजयमाताच आहेत, भारतमाता नव्हेत. काही लोक म्हणतात की, दोन्ही काँग्रेस म्हणजे राम–लक्ष्मणाची जोडी आहे. आपण एकत्र आले पाहिजे. मी समजतो की, राम–रावणाची भूमिका एकत्र येणार कशी?' प्रिय-रंजनची बोलण्याची पद्धत छान आहे. तो कळकळीने बोलतो. नंतरचे वक्ते रटाळ बोलत होते. उत्तरेतील बहुतेक पुढारी फार पाल्हाळिक व राणा भीमदेवी थाटात बोलतात; परंतु आज सभागृह सोडायचे नाही असा निर्धार केला होता. न जाणो, मारामारी व्हायची व आपण पुन्हा गैरहजर.

कंटाळून मागे किसन वीरांच्याजवळ जाऊन बसलो. चंदनी अत्तराचा वास सभोवताली दरवळत होता. आबासाहेब वीर म्हणजे अत्तराचे शौकीन! उत्तम अत्तर जवळ बाळगतात. आज चंदन होते. मी म्हटले, 'आबा, मला अत्तर लावा.' वाटले आता खिशातून कुपी निघेल. थोडा वेळ गेला. म्हटले, निदान कानातला फाया तरी मिळेल! आणखी काही वेळाने त्यांनी कानाला बोट लावून माझ्या मनगटाला अत्तर लावल्यासारखे केले. मला संताप आला. मनात म्हटले बघून घेईन! काही सुधारणांसह ठराव संमत झाला. अधि-वेशन संपले. श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्याकडे आम्ही जेवायला गेलो. किसन वीर होतेच. जेवण्याआधी आपल्या अंगातला शर्ट काढून त्यांनी शेजारच्या खोलीत खुंटीवर टांगला. मी हात धुण्याचे निमित्त करून त्या खोलीत गेलो आणि शर्टाच्या खिशातली अत्तराची बाटली काढून घेतली. संध्याकाळी शरद पवारांना तीच बाटली भेट म्हणून दिली. दुसऱ्या दिवशी पवारांचा चंदनी वास येऊ लागल्यावर आबांच्या लक्षात आले, आपण विनायकला फाया दिला असता तर बाटली वाचली असती!

□

अधिवेशन संपले होते. सर्व लोक परत चालले होते. काही लोकांनी सतरा तारखेला सकाळी दहा वाजता एकत्र येण्याचे ठरविले. संध्याकाळ रिकामी होती. मी शरदरावांना म्हटले, 'काय करायचे?' तितक्यात खासदार आर. के. मिश्रा आले. ते शरदरावांना म्हणाले, 'अरुणा असफअल्ली आपल्याला भेटू इच्छितात. केव्हा व कसे भेटायचे?' आम्ही लगेच निघालो त्यांच्या Link House या कार्यालयाकडे. मला मजा वाटली. अरुणा असफअल्लीचे फक्त फोटोच मी जुन्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या घरी पाहिले होते. तेही त्यांच्या तरुण वयातले. स्वातंत्र्यवीरांच्या दहा-वीस फोटोतला एक. त्या आता कशा दिसत असतील, त्यांचे वय किती असेल असे अंदाज करीतच त्यांच्या ऑफिसात शिरलो. श्रीमती अली ठणठणीत

होत्या. पांढरे केस, पांढरी स्वच्छ साडी, वागण्यातली तडफ! आम्हाला म्हणाल्या, 'बरे केलेत पण आता कामाला लागा. मी इंदिराला तिच्या लहानपणापासून ओळखते. अतिशय जिद्दी आहे. तुम्हाला फार काम करावे लागेल. तुमचे नेते ढेपाळले आहेत. त्यांना देशभर फिरवा. नाही तर सगळाच आनंद आहे!' त्यांनी बेचाळीस-मधल्या महाराष्ट्रातल्या त्यांच्या बऱ्याच आठवणी सांगितल्या, अच्युतराव पटवर्धनांची चौकशी केली. पवारांना एक-दोन वैयक्तिक कामेही सांगितली. मला आनंद झाला होता, इतिहासाच्या पुस्तकात आढळलेली एक व्यक्ती समक्ष पाहत असल्याचा.

## इंदिराजी म्हणे बदलल्या!

आज सकाळी दहा वाजता काही निवडक कार्यकर्त्यांची बैठक सुरू झाली. बैठकीला राजबहादूर, आर. के. सिन्हा, चंद्रजित यादव, उन्नी कृष्णन्, वायलर रवी, सौगत रॉय, दिनेश गोस्वामी, शरद पवार, प्रियरंजन दासमुनशी व इतर दहा-वीस लोक होते. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपण प्रेशरग्रुप म्हणून काम करायचे ठरले व काही कार्यक्रम तयार करून ते कॉंग्रेस अध्यक्ष व लोकसभेतील पक्षनेते यशवंतराव चव्हाण यांना द्यायचे ठरले. त्यात महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेप्रमाणे इतर राज्यातही अशी योजना राबवावी म्हणून इतर सरकारांवर दडपण आणावे, दिल्लीतील बसभाडे व दुधाचे दर वाढले आहेत म्हणून त्याविरुद्ध आंदोलन उभारावे, हिंदी भाषा दक्षिणेतील लोकांवर लादण्यात येऊ नये यासाठी मोर्चे काढावेत, कांदा-निर्यात सुरू करावी म्हणून आंदोलन सुरू करावे असे अनेक मुद्दे होते. दुपारी आम्ही गप्पा मारीत बसलो. आसामचे खासदार गोस्वामी यांनी एक मजेदार किस्सा सांगितला. ते म्हणाले, 'अहो, हे दिल्लीचे लोक काय करतील याचा भरवसा नाही. आणीबाणीच्या काळात एक गृहस्थ मला भेटायला आले होते. त्यांनी त्यांचे व्हिजिटिंग कार्ड माझ्याकडे पाठविले होते. त्यावर लिहिले होते :

श्री. गुप्ता

Teacher of Rahul Gandhi!

माझी भरपूर करमणूक झाली. मी त्यांना भेट दिली. ते कार्ड मी अजून जपून ठेवले आहे, हे फक्त दिल्लीत घडू शकते, इतर प्रांतात नाही!' सौगत रॉय म्हणाला, 'अजूनही इंदिराबाई पूर्वीसारख्याच वागतात. कालच महाराष्ट्रातील काही नेते त्यांना भेटायला गेले होते त्या वेळी इंदिराबाईंनी त्यांना फार झापले. त्या म्हणाल्या, 'माझा उपयोग तुम्ही फक्त सत्ता मिळविण्यासाठीच करता. संजयला अटक झाली तर कुणीही निदर्शन केले नाही किंवा निषेध नोंदवला नाही!' सगळे चेहरे टाकून परत आले. अरे थोडे थांबा, हे अशा लाथा खाऊन परत येतील बघत रहाल! आपण खंबीर आहोत हे पाहून इं. कांग्रेसमध्ये जाणारे अनेक कार्यकर्ते थांबले आहेत. थोड्याच दिवसात गेलेले परत येतील! इंदिराच्या वागण्यात काहीही बदल नाही. त्यांनी न्यूयॉर्क टाइम्सला दिलेली मुलाखत तुम्ही वाचलीत का? आम्ही "नाही" म्हटले, ब्रीफकेसमधून अमेरिकन वकिलातीतून आणलेला न्यूयॉर्क टाइम्सचा अंक काढून तो वाचू लागला. मुलाखत भयानक होती. इंदिराजींचे असे म्हणणे होते की, या देशाला लोकशाही परवडणार नाही. इथे इमर्जन्सीसारखीच काही व्यवस्था पाहिजे! मी आणलेली आणीबाणी योग्यच होती. लोकशाही पद्धतीने हा देश चालू शकणारच नाही असे त्यांचे मत होते. सौगत रॉय म्हणाला 'बघा, आहे काही बदल?' गप्पा आटोपत्या घेतल्या. संध्याकाळी सहाच्या विमानाने परतायचे होते.

¤

विमानतळावर बडोदा डायनामाइट केसमधले आरोपी व सध्याचे खासदार वीरेन शहा भेटले. ते म्हणाले, 'परवा माझे पार्लमेंटमध्ये Law & Order भाषण आहे.' मजा आहे नाही?'

परवाच्या सरकारला डायनामाइट लावायला निघालेला माणूस आपण सरकारमध्ये आल्याबरोबर कायदा व सुव्यवस्थेचे धडे द्यायला लागला होता. राज्य आले म्हणून ठीक. एरवी गुन्हेगार म्हणून इतिहासात नोंद झाली असती. जिंकले की राज्यकर्ता, हरले की गुन्हेगार!

## सिकंदर बख्त

विमानात माझ्या शेजारी असलेल्या गृहस्थांची शरद पवारांनी ओळख करून दिली. सिकंदर बख्त. केंद्रीय मंत्री. शेजारीच सीट आणि दीड तासाचा प्रवास. मी त्यांना म्हणालो, 'बख्तसाहेब, नुकतेच शाही इमामांचे एक निवेदन वृत्तपत्रांनी छापले आहे. ते म्हणतात, 'जनता सरकार प्रतिगामी आहे आणि म्हणून नवीन पक्ष स्थापन करायचा त्यांचा इरादा आहे.' बख्त एकदम रागावले. म्हणाले, 'अहो, काय सांगायचे या इमामाचे? अगदी वाईट, कणा नसलेला माणूस आहे. त्याच्या असिस्टंटला पूर्वी पाकिस्तानी हेर म्हणून पकडले होते. इंदिराजींशी वाटाघाटी करून याने त्याला कसाबसा सोडवला. आणीबाणीच्या काळात नसबंदीला मुस्लिम धर्मात सुद्धा कसे स्थान आहे अशी आकाशवाणीवर भाषणे दिली. या भाषणांनंतर त्याच्या प्रार्थनेच्या वेळी कुणीही जमत नसे. आणीबाणीत तुर्कमानगेटच्या गोळीबारानंतर याने मशिदीत सभा घेतली आणि नसबंदीचा प्रचार केल्याबद्दल खुदा व मुस्लिमबंधूंची माफी मागितली. बस्! आमचे लोक सगळेच विसरले. जात्यंध लोकांना खूष करणे सोपे असते. वेडेवाकडे, कडवे बोलले की लोक लगेच 'जय' करतात; पण हिंदुस्थानातल्या मुस्लिम जातीयवादाला जिवंत ठेवायला हिंदूच कारणीभूत आहेत! हिंदूंचा जातीयवाद संपला की यांचाही संपेल. पाकिस्तानची स्थापना झाल्यानंतर नाही का तेथील मुस्लिम लीग संपुष्टात आली? आणि हा शाही इमाम हा खरा शाही इमाम नाहीच. त्याचे वडील आजारी असताना याने स्वतःला शाही इमाम म्हणून घोषित केले. अहो, हे घराणे राज्यकर्त्यांची पूजा (हुकूमत परस्त) करीत आलेले आहे. आणि हा निघाला! पक्ष काढायला!' मी म्हणालो, 'ते ठीक आहे. पण लोकसभेच्या निवडणुकीत त्याचा मुस्लिममतांसाठी आपणही जास्तीत जास्त उपयोग केला होतात. शिवाय मुस्लिम मतदार हे जनता पक्षापासून हळूहळू दूर जात आहेत असे मला वाटते. कारण परवा नाशिक येथे अखिल भारतीय उर्दू मुशायरा झाला होता. त्यात सर्व शायर त्यांच्या गजल व कवितांमधून जनता सरकारवर टीका करीत होते.'

पृष्ठ २० वर

आझमगढ निवडणुकीनंतर लेखकाने दिल्लीतील काही प्रमुख नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यावरून रेखाटले गेलेले हे राजकीय चित्र....

# प्रादेशिक सत्तांचा उदय

## जगन फडणीस

जनता पक्ष सत्तेवर येऊन वर्ष झाले नाही तोच वर्षभरात त्या पक्षाला पोटनिवडणुकीत चांगलाच हादरा बसला आहे. निरनिराळ्या राज्यांत झालेल्या विधानसभा व लोकसभेच्या मिळून पंधरा पोटनिवडणुका झाल्या. त्यांपैकी अकरा ठिकाणी जनता पक्षाचा पराभव झाला आहे. पोटनिवडणुकका सत्तारूढ पक्षाला नेहमीच महाग पडत आल्या आहेत. त्यामुळे बहुतेक ठिकाणी पोटनिवडणुकीमध्ये विरोधी पक्षाचे नेते विजयी होत आलेले आहेत. निवडणुकीत दिलेली वारेमाप आश्वासने मतदारांच्या अपेक्षा वाढवितात आणि नंतरच्या काळात या अपेक्षा पूर्ण होत नाहीत किंवा पूर्ण होण्यास विलंब लागतो. यामुळे लोकांची सत्तारूढ पक्षाविषयीची नाराजी वाढत जाते. या नाराजीचे प्रतिबिंब पोटनिवडणुकीत दिसून येते व विरोधी पक्षांना पोटनिवडणुकांत विजय मिळतो हे एक प्रमुख कारण व निवडणुकीत विरोधी पक्षाचा प्रचंड पराभव झालेला असतो. त्यामुळे पोटनिवडणुकीत मतदारांची सहानुभूती विरोधी पक्षाला लाभते, हेही कारण विरोधी पक्षाच्या विजयामागे असते. अर्थात हे कारण थोड्याच अंशांनी असते हे मान्यच केले पाहिजे.

पोटनिवडणुकीतील यशापयशाची ही कारणे असली तरी पोटनिवडणुकीचे निकाल इशाऱ्याप्रमाणे असतात हेही विसरून चालणार नाही. सत्तारूढ पक्षाने त्याची वेळीच दखल घेऊन आपल्या वर्तनात, कारभारात सुधारणा केली तर ते शहाण्या राज्यकर्त्यांचे लक्षण ठरेल! पंधरापैकी अकरा पोटनिवडणुका जनता पक्ष हरला. त्यातील बहुसंख्य जागा इंदिरा काँग्रेसने जिंकल्या. याचे भारतीय राजकारणावर कोणते परिणाम घडून येतील ?

### दक्षिणोत्तर फाळणी

मार्चमधील निवडणुकीत उत्तर भारतामध्ये काँग्रेसचे समूळ उच्चाटन झाले व काँग्रेसच्या जागी जनता पक्ष आला. दक्षिणेकडे काँग्रेस कायम राहिली आणि जनता पक्षाला तेथे स्थान राहिले नाही. या निकालामुळे देशाची दक्षिण-उत्तर अशी 'राजकीय फाळणी' झाली. ही फाळणी यापुढे अशीच राहील असे नव्हे तर ती अधिकाधिक पक्की होत जाईल. अखिल भारतीय राजकारणावर उत्तरेचा व त्यातही आकार, लोकसंख्या यामुळे उत्तर भारताचा प्रभाव असून हा प्रभावही कायम राहणार आहे. उत्तरेचा राजकीय प्रभाव कायम राहील तसे दक्षिणेचे राजकारणही मुख्य प्रवाहापासून वेगळे राहणार आहे. उत्तरेचा प्रभाव मानण्यास दक्षिण नेहमीच तयार होणार नसल्यामुळे उत्तरेतील प्रभावी पक्षाच्या विरोधातील पक्षाला दक्षिण जवळ करील. एकाच भागाच्या राजकीय प्रभावाखाली देशाचे इतर भाग राहणार नाहीत. त्यातच दक्षिणेची व उत्तरेची भाषा अगदीच भिन्न आहे. उत्तर हिंदीची आग्रही तर दक्षिणेचा तिला कडवा विरोध आहे. राजकीय प्रभाव, भाषेचा आग्रह यासारख्या बाबींमुळे दक्षिणेची अलगपणाची भावना वाढत जाईल. शिवाय देशाच्या पंतप्रधानपदी सदैव उत्तर भारतातील व्यक्ती राहण्यानेही या भावनेत भर पडणार आहे. (पूर्व पाकमध्ये हेच घटक बांगला देशच्या निर्मितीपूर्वी तेथील राजकारणाचे केंद्रबिंदू झाले होते. भाषेचा प्रश्न पूर्व पाकमध्ये प्रधान होता. त्यानंतर पश्चिम पाकने केलेल्या आर्थिक शोषणाची जाणीव झाली. भारतात दक्षिण-उत्तर राजकारणात आर्थिक शोषणाचा प्रश्न येणार नाही.) केंद्रीय मंत्रिमंडळात दक्षिणेचे काही मंत्री घेतल्याने सत्तेत दक्षिणेला सहभाग मिळाला यावर दक्षिणेकडील जनता भविष्यकाळात समाधान मानील असे मानायचे कारण नाही. आजपर्यंत अखिल भारतीय पक्ष सत्तेत होता. त्या पक्षाची–काँग्रेसची–पाळेमुळे दक्षिणेतही होती. त्यामुळे या कंगोऱ्यांना धार आली नव्हती. यापुढे ही स्थिती राहणार नाही. दक्षिण-उत्तर अशी 'राजकीय फाळणी' देशाच्या राजकारणात वाढत जाईल.

### अ. भा. पक्षांचा लोप

सध्याच्या राजकारणात खऱ्या अर्थाने अखिल भारतीय पातळीवरचा पक्षच अस्तित्वात नाही. जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आहे म्हणून त्याला अ. भा. पक्ष म्हणावयाचे असेल तर गोष्ट वेगळी! पण सबंध देशातील जनता, जनता पक्षाच्या मागे उभी राहिली नाही, त्याचप्रमाणे काँग्रेसच्या मागेही जनता गेली नाही. काँग्रेस एक होती तेव्हाची ही परिस्थिती आहे (मार्च १९७७). काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर आणखीनच वेगळी परिस्थती निर्माण झाली आहे. काँग्रेसच्या मागे असलेल्या जनतेचीही विभागणी झाली. जनता पक्षाला समाजाच्या सर्व घटकांचा पाठिंबा राहिलेला नाही. हरिजन–मागासलेले–अल्पसंख्य त्या पक्षापासून दूर गेले आहेत. समाजातील या घटकांचा पाठिंबा नाही असे पक्ष सत्ता मिळविण्याइतके यशस्वी झालेले नाहीत हा २५ वर्षांचा इतिहास आहे. त्यामुळे जनता पक्ष देशभर विजयी होईल असे मानता येत नाही. पोटनिवडणुकांच्या निकालांनी हेच दाखवून दिले आहे. हे वर्ग ज्या पक्षाबरोबर गेले तो पक्ष विजयी झाला.

दक्षिणेचा विचार करताना तेथे जनता पक्षाला स्थान नाही हे स्पष्ट होते. कांग्रेस फुटीमुळे कांग्रेसलाही दक्षिणेचा पूर्ण पाठिंबा आगामी काळात राहील असे मानण्यास जागा नाही. मग दक्षिणेकडील राज्यात राजकीय पक्षांचे स्थान कसे असणार ? दक्षिण–उत्तर अशा राजकीय विभागणीमुळे तामीळनाडूत द्रविड मुन्नेत्र कळघमच्या दोन पक्षांपैकी एकाचा प्रभाव तामीळनाडूवर राहील. तर केरळमध्ये उजवे कम्युनिस्ट, डावे कम्युनिस्ट वा कांग्रेस हे एकमेकाला थोडया-फार फरकाने तुल्यबळ राहतील. कर्नाटकात देवराज अरस यांची कांग्रेस मूळ धरून राहील. स्थूलमानाने दक्षिणेकडे अ. भा. पक्ष अतिशय कमी जागा मिळवन अस्तित्व टिकवून राहतील. कोणताही एक अ. भा. पक्ष दक्षिणेकडील राज्यात सत्तेवर येईल अशी परिस्थिती राहणार नाही. अ. भा. पक्षांच्या नेतृत्वाचा तसेच पक्ष कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाचा भाग म्हणून दक्षिणेकडे अ. भा. पक्षांना स्थान मिळणार नाही. त्याशिवाय स्थानिक पक्ष प्रादेशिक भावनेचे प्रश्न हातात घेऊन उभे राहतील. त्यामुळेही द्रमुकसारख्या पक्षांचे प्राबल्य वाढीस लागेल. स्वातंत्र्यचळवळीचे कांग्रेस साधन, प्रतीक बनली होती. महात्मा गांधींनी कांग्रेसला सामान्य माणसात स्थान मिळवून दिले होते म्हणून कांग्रेस देशभर पोचली व स्वातंत्र्यानंतर तोच अ. भा. पक्ष राहिला होता. कांग्रेस सत्तेवर होती तोपर्यंत त्या पक्षाचे अस्तित्व देशभर कायम होते. सत्तेतून कांग्रेस बाजूला फेकली गेली व कांग्रेसचे तुकडे होत गेलेही. त्यामुळे अ. भा. राहिली नाही किंवा कांग्रेसची जागा घेणारा दुसरा अ. भा. पक्ष नाही.

आणीबाणीतील अत्याचारांमुळे जनता पक्षाला विजय मिळाला. या पक्षाची पाळेमुळे खोलवर रुजून तो पक्ष निर्माण झाला नाही. अधर वेलीसारखा जनता पक्ष आहे. अधर वेल झाडाच्या शेंड्यावर जन्म पावते व नंतर ती जमिनीच्या दिशेने खाली उलटी वाढत जाते; पण तिची मुळे जमिनीमध्ये कधीच जात नाहीत. जनता पक्षाच्या व अधर वेलीच्या स्वरूपात कोणताच फरक नाही. केंद्रात जनता पक्ष सत्तेवर आला व त्यानंतर उत्तर भारतातील काही राज्यात त्याला सत्ता मिळाली; पण हा पक्ष जनतेच्या मनात रुजलेला नाही. उत्तर भारतातही सर्वच राज्यांत जनता पक्षाला सत्ता मिळालेली नाही. काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सकडे, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, हरियाना, ओरिसा, जनता पक्षाकडे तर पंजाब–प. बंगाल अकाली व मार्क्स–कम्युनिस्ट पक्षाकडे आहे. आसाम जमेस धरता जनता पक्षाची सरकारे असलेली राज्ये ७–८ च होतात. सत्तेच्या दृष्टीनेही जनता अ. भा. पक्ष मानता येणार नाही. लोकसभा निवडणुकीनंतर लगेच उत्तरेत विधानसभा निवडणुका झाल्यामुळे राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या उत्तरप्रदेश व बिहार या राज्यांत जनता पक्षाला बहुमत मिळाले. उत्तर प्रदेश व बिहार ही देशाच्या राजकीय नाड्या आपल्या हातात ठेवणारी राज्ये आहेत. या राज्यांत जनता पक्षाविरुद्ध जनमत जाऊ लागले आहे. आझमगडची निवडणूक हे त्याचे उदाहरण आहे. बिहारमध्ये जयप्रकाश नारायण व त्यांच्या चळवळीचा दबदबा संपला आहे. लोकनायक जयप्रकाश झिंदाबाद ' या घोषणांना उत्तर म्हणून तेथेच 'खलनायक जयप्रकाश मुर्दाबाद ' अशा घोषणा पाटण्यामध्येच दिल्या जात आहेत. जयप्रकाश नारायण यांच्याबाबत हा अनुभव तर जनता पक्षाच्या नेतृत्वाविषयी बिहारमध्ये काय भावना असेल हे लक्षात येईलच.

हरिजन–मागासवर्गीय यांना नोकऱ्या राखून ठेवण्याच्या प्रश्नावर उच्च जाती व मागासलेले असे दोन तट पडले असून जनता पक्षाची विभागणी या दोन तटांत झाली आहे, तर सामान्य जनता जनता पक्षापासून दूर होऊ लागली आहे. बिहारचे दुसरे नेते जगजीवनराम जनता पक्षातील नेत्यांविषयी, जनता पक्षाच्या धोरणांबाबत जाहीरपणे टीका करीत आहेत. त्यामुळे जनतेमध्ये जनता पक्षाची प्रतिमा कशी होत चालली आहे किंवा होईल हे विचारात घेण्यासारखे आहे.

## उत्तरप्रदेशातील विघटन

उत्तरप्रदेश हे सर्वांत महत्त्वाचे राज्य ! बिहारप्रमाणेच या राज्यालाही समर्थ नेतृत्व राहिलेले नाही चरणसिंग उत्तरप्रदेशचे असले तरी त्यांना उत्तरप्रदेशचे नेते मानले जात नाही. उत्तरप्रदेशच्या एका भागातील नेते असाच चरणसिंग यांच्यावर शिक्का मारला जातो. सरदार पटेलांनंतरचा पोलादी पुरुष असे चरणसिंगांचे वर्णन करण्यात येत असले तरी त्यांच्याबाबतीत ती वस्तुस्थिती नाही. चरणसिंग यांच्या राजकारणाची क्षमता पाहिली की, ती संपूर्ण देशाचे राजकारण करणारी नाही हे लक्षात येते. एका राज्यापुरतीच त्यांच्या राजकारणाची झेप आहे. उत्तरप्रदेशचे दुसरे नेते हेमवतीनंदन बहुगुणा. ते कार्यक्षम मंत्री व राजकारण्याला लागणारे 'गुण' त्यांच्या अंगी आहेत. त्यांच्या या गुणामुळेच बहुगुणांऐवजी काहीजण विनोदाने बहुगुंडा असे त्यांना म्हणतात. बहुगुणा 'बहु'गुणी असले तरी सर्व उत्तरप्रदेश त्यांना आपल्याबरोबर ठेवता आलेला नाही. देशाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेल्या राज्यातही एक नेता राहिलेला नाही. जेवढे नेते तेवढे गट पडून गटांचे राजकारण उत्तरप्रदेशमध्ये वाढणार आहे. उत्तरप्रदेश जनता पक्षातील भांडणे ही कशाची द्योतक आहेत ? अंतर्गत लाथाळ्यांनी उत्तर प्रदेश जनता पक्षाची ताकद खच्ची होत आहे. मध्यप्रदेशात जनतामधील जनसंघ व समाजवादी यांच्यात सतत चकमकी झडत आहेत. मुख्यमंत्री सकलेचा यांनी आपल्याकडे महत्त्वाची ८–१० खाती ठेवली आहेत. अंदाजपत्रकाच्या ७५ टक्के रक्कम सकलेचा यांच्या हातात आहे. ओरिसामध्ये कोणताच एक पक्ष बहुमतात येत नाही हा आजवरचा अनुभव आहे. तेथे डाव्या विचारांच्या लोकांचाही प्रभाव आहे. हा गट निवडणुकीत लक्षणीय यश मिळवीत आला आहे.

उत्तर भारतात सर्वांत मोठ्या असलेल्या जनता पक्षाचे चित्र काय आहे हे यावरून स्पष्ट होण्यास मदत होईल. याच पक्षात वरील राज्यांत असणारी भांडणे, जनता-राजवटीचा भ्रमनिरास व हरिजन व मागासलेले मुसलमान या गटांचे जनता पक्षापासून दूर जाणे या सर्वांचा परिणाम म्हणून आगामी निवडणुकांत किंवा मध्यावधी निवडणुका झाल्यास त्यामध्ये जनता पक्ष मार्च १९७७ प्रमाणे विजयी होईल असे मानता येणार नाही. ज्या राज्यांच्या जोरावर जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आला त्या पायावरच आघात होणार आहे. राज्याराज्यांमध्ये जनता पक्षाची ताकद विभागली जाऊन जनता पक्षाला उत्तर भारतातील राज्यांत एकमुखी पाठिंबा राहणार नाही. बिहार, ओरिसा व उत्तर प्रदेश यांपैकी एखाददुसऱ्या राज्यात जनता पक्ष आपले अस्तित्व खंबीरपणे टिकवून धरील तर अन्य राज्यांत त्या पक्षाच्या हातून सत्ता गेलेली असेल किंवा आज महाराष्ट्रात जनता पक्ष विधानसभेतील मोठा पक्ष आहे तसा मोठा पक्ष म्हणून राहील. कांग्रेसप्रमाणे जनता पक्षाला राज्यात सत्तेची मक्तेदारी निर्माण करता येणार नाही. पश्चिम बंगालमध्ये मार्क्स. कम्युनिस्ट आपले अस्तित्व कायम टिकवून आहे. या पक्षाचे वैचारिक

स्वरूप 'आंतरराष्ट्रीय' आहे. अ. भा. पक्ष म्हणून तो मानला जातो. त्याच्या शाखा भारतभर असतीलही; पण पक्षाला बंगालपुरते मर्यादित स्थान मिळाले आहे. अशीच परिस्थिती जनता पक्षाची होईल. फार तर फरक एवढाच होईल की, मार्क्स. कम्युनिस्ट एका बंगालपुरता मर्यादित आहे तर जनता पक्ष एकापेक्षा दोन–अडीच राज्यांत राहील.

दक्षिणेत जसे पक्ष एकेका राज्यात आपले अस्तित्व कायम टिकवितील त्याचप्रमाणे उत्तर भारतात होऊन उत्तर भारतातील राज्यात वेगवेगळे पक्ष सत्तेवर टिकून राहतील. त्यामुळे राजकीय पक्षांना आपोआपच भौगोलिक मर्यादा पडतील. ज्या राज्यांतून जनता पक्षाच्या हातातून सत्ता जाईल त्या राज्यात कोणता पक्ष पोकळी भरून काढील हा त्यानंतरचा प्रश्न आहे. इंदिरा कॉंग्रेसला उत्तरेत एखाद्या राज्यात बहुमत मिळणारच नाही असे म्हणता येणार नाही.

□

निरनिराळ्या राज्यांत वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली तर केंद्रात कोणत्या पक्षाचे सरकार येईल हा प्रश्न महत्त्वाचा आहे. उत्तर प्रदेशात जनता पक्षाचे सरकार कायम राहिले तरी त्या पक्षाला लोकसभेच्या निवडणुकीत मार्च १९७७ सारखे यश मिळणार नाही. ही परिस्थिती सर्वच राज्यांत राहणार आहे. त्यामुळेच केंद्रात सरकार स्थापण्याएवढे बहुमत जनता पक्षाला मिळेल याची खात्री आज चालणाऱ्या राजकारणावरून दिसत नाही. अतिशय काठावरचे बहुमत किंवा लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष असे स्वरूप जनता पक्षाला १९८२ च्या निवडणुकीत येईल.

□

जनता पक्षाच्या ज्या जागा जातील त्या जागा इंदिरा कॉंग्रेसच जिंकील असेही म्हणता येणार नाही. वेगवेगळे गट जनता पक्षाच्या जागा जिंकतील. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर येतील का असा प्रश्न चर्चिला जात असून आझमगडच्या निवडणुकीतील विजयामुळे गांधी पुन्हा सत्तेवर येतील असे मानणारा एक मोठा गट तयार होत आहे. असे वाटण्याचे प्रमुख कारण म्हणजे गांधींच्या सभांना होणारी गर्दी! त्यांचे उत्तर भारतात जे स्वागत होते ते व प्रचाराची धडाडी, गांधींची 'जुगारी प्रवृत्ती' यामुळे लोक त्यांच्या मागे जाऊ लागले असले तरी पुन्हा सत्तेवर येण्याइतका पाठिंबा त्यांना मिळणार नाही. आणीबाणीत गांधींच्या राजवटीत झालेले अत्याचार लोक पाच वर्षांत विसरतील असेही मानता येणार नाही. गांधींच्या बरोबर पूर्वीचीच चौकडी आजही आहे व पुढेही ती राहणार आहे याची जाणीव असल्यामुळे सत्ता हातात देण्याइतका पाठिंबा त्यांना मिळणार नाही. श्रीमती गांधी पुन्हा सत्तेवर येऊ नयेत म्हणून जनता सरकारही त्यांना अशा एखाद्या गुन्ह्यात अडकवून टाकील की त्यामुळे गांधींना निवडणुकीचे मार्गच खुले राहणार नाहीत! अशा वेगवेगळ्या कारणांमुळे इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर येतील हे संभवनीय नाही. इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसचे अस्तित्वही गांधींच्या हयातीपुरते मर्यादित राहणार आहे. व्यक्तीला मानणारा पक्ष त्या व्यक्तीच्या अस्तित्वापर्यंतच राहतो. गांधींच्या नंतर हुकुमशाही, एकाधिकारशाही गाजविणारी व्यक्ती-नेता राहिलेला नाही, असे सांगून दोन्ही कॉंग्रेस एकत्र येऊन अ. भा. पक्षाचे स्थान परत मिळविण्याचा प्रयत्न करील की देशाला स्थिरता देण्यासाठी देशाच्या सर्व भागातील नेते एकत्र बसून वैचारिक स्पष्टता असणारा नवाच अ. भा. पक्ष स्थापन करण्याच्या मागे लागतील? अथवा स्थिरतेच्या प्रश्नाने चिंतित झालेले नेते राष्ट्रीय सरकारचा विचार करतील? या प्रश्नांची उत्तरे येत्या पाच सात वर्षांच्या राजकारणातच सापडतील! मात्र इंदिरा गांधी यांची कॉंग्रेस केंद्रांत सत्तेवर येणार नाही. त्याचप्रमाणे जनता पक्षालाही आजच्यासारखा पाठिंबा मिळणार नसल्यामुळे आजच्या राज्यकारणात असलेले पक्ष एखाद – दुसऱ्या राज्यापुरतेच आपले स्थान टिकवून धरतील असे वाटते. अशी राजकीय परिस्थिती पाहून डावे-उजवे कम्युनिस्ट डावा पर्यायी पक्ष देण्याचा प्रयत्न करतील का, हेही पाहावे लागेल! आजची परिस्थिती राजकीय प्रश्नचिन्ह उभे करणारीच आहे. जनता पक्षाने चार वर्षांत आपली प्रतिमा पक्षसंघटनेच्या व सरकारी पातळीवर सुधारली तर पुढच्या पाच वर्षांत जनता पक्ष सत्तेवर राहील; परंतु भविष्यकाळात देश आपल्या ताब्यात ठेवण्याच्या हेतूने जनता पक्षातील गट आपापले मोर्चे बांधून दहा वर्षांच्या राजकारणाची योजना आखून पक्ष बळकावण्याचा प्रयत्न करतील तर जनता पक्षाची चोरफाड लौकरच झालेली दिसेल! □

---

## महाराणी बाग, कोठी नं. २ : पृष्ठ १३ वरून

'हो, ते खरे आहे,' बख्त म्हणाले, 'हल्ली मी तर मुशायऱ्यांना जाणेच बंद केले आहे. कारण हे सर्व जनता पक्षाला नावे ठेवतात व मंत्री ही एक अशी औलाद आहे की, जिला राग नसतो. शिवाय मोरारजी देसाईंच्या स्वमूत्रप्राशनाचा प्रयोग हा त्यांच्या विनोदी कवितांचा आत्मा असतो. म्हणून मी मुशायऱ्यांना जातच नाही?'

'अहो, ते चरणसिंग व मोरारजी उर्दूविरोधक आहेत असे म्हणतात' मी.

'त्यांची माहिती चुकीची आहे,' बख्त म्हणाले.

'आपण त्यांना योग्य माहिती का देत नाही?'

'त्यांना माहिती आहे; पण त्यांनी सर्व जाणूनबुजून चालविले आहे!'

'याचा अर्थ ते जनता सरकारपासून दूर चालले आहेत.' मी म्हणालो.

'ही वस्तुस्थिती आहे. आणीबाणीत एवढे अत्याचार घडले, गोळीबारात शेकडो मुसलमानांचा बळी पडला. जनता सरकारने निवडून आल्यावर अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाकरिता आयोग नेमला, अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचे अस्तित्व मान्य केले. कॉंग्रेसने तीस वर्षांत केले नाही एवढे आम्ही एका वर्षात केले. तरीही विरोधात जात असतील तर जाऊ देत बिचाऱ्यांना! एवढे करूनही if they choose Indira Gov., they deserve it, और क्या?'

शाही इमामांना ते बरेच बोलले. ते सर्व कागदावर उतरविणे सभ्यतेला धरून होणार नाही.

□

मुंबईला उतरल्यावर रस्त्यांत विचार आला, याच तालकटोरा बागेच्या मैदानात, जेथे आमचे ए. आय. सी. सी. चे अधिवेशन झाले, तेथे पानिपताच्या युद्धाआधी मराठी सैन्याचा तळ पडला होता. नंतर पानिपत झाले. इतिहासाची पुनरावृत्ती होते की काय? कारण त्या वेळी सूरजमल जाटाचा सल्ला मराठी सेनानींनी मानला नव्हता. आता कदाचित चरणसिंग जाटाचा सल्ला मानला तर इतिहासाची पुनरावृत्ती टळेल!!! □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ आझमगढचा किल्ला असा लढविला

दोन दोन वेळा फोन करूनही कमलापती न भेटल्यानें बुटासिंग काहीसे अस्वस्थ झाले होते. उत्तरप्रदेशामधील आझमगढ पोटनिवडणुकीबाबत इंदिराजींच्या घरी खलबते सुरू होती. इंदिराजींनी स्वत:च ही निवडणूक लढवावी असा अनेकांचा आग्रह होता; परंतु इंदिराजी निवडणूक लढविण्यास राजी नव्हत्या. आजच्या बैठकीमध्ये इंदिराजी उमेदवार घोषित करणार होत्या आणि ज्या उत्तरप्रदेशामध्ये ही चुरशीची पोटनिवडणूक लढवायची त्या उत्तरप्रदेशातील इंदिरा कांग्रेसचे एक प्रमुख नेते-कमलापती त्रिपाठी अजून आलेले नव्हते. बुटासिंग पुन्हा फोन लावण्याच्या प्रयत्नात असतानाच कोणी तरी येऊन सांगितले-कमलापतिजी आले आहेत.

खरी कांग्रेस कोणती याचा कौल महाराष्ट्र आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळीच मिळालेला आहे. बैठकीस प्रारंभ होताच इंदिराजींनी बोलण्यास प्रारंभ केला. त्या म्हणाल्या, 'कोणाच्या मनात काही शंका असतील तर त्यांचा पूर्ण निचरा करण्याची ही निवडणूक म्हणजे एक नामी संधी आहे. निवडणूक-पराभवातून सहसा शक्ती प्राप्त होत नाही; पण कर्नालने दिशा दाखविली आहे. आता आपण पूर्ण सामर्थ्यानिशी किल्ला लढविला तर यश आपले आहे! केवळ एक पोटनिवडणूक म्हणून या निवडणुकीकडे पाहू नका! या निवडणूक-निकालाचे परिणाम दूरगामी स्वरूपाचे होणार आहेत'.

तब्बेत बरी नसतानाही चौधरी चरणसिंग लखनौमध्ये दाखल झाले होते. जनता पक्षाच्या नव्हे भारतीय लोकदलाच्या निवडक कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात चौधरी बोलत होते. कार्यकर्त्यांना ते जीव तोडून नेमके हेच सांगत होते, 'ही निवडणूक आपण जिंकलीच पाहिजे!' उमेदवार जनता पक्षाचा, पण जमलेली मंडळी पक्षापेक्षा चौधरी चरणसिंग यांच्याशी एकनिष्ठ असलेली! म्हणजे निवडणूक-प्रचाराचे तोंड फुटण्यापूर्वीच निवडणूक-मोहिमेला तडा गेला होता. राम नरेश यादव यांचेही याच सभेत भाषण झाले. त्यांनी स्वच्छ सांगून टाकले की, या निवडणुकनिकालाचा आणि लखनौमधील त्यांच्या स्थानाचा फार जवळचा संबंध आहे. हरियाना पोटनिवडणुकीच्या वेळी देवीलाल यांना जो अधिकार पक्षाने दिला होता तोच अधिकार उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना दिला होता. त्यातही विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वत: राम नरेश यादव याच आझमगढमधून वर्षाभरापूर्वीच एक लाख अडतीसहजार मतांनी निवडून आले होते आणि राज्याची धुरा संभाळण्यासाठी से लखनौला आल्याने ही पोटनिवडणूक होत होती. एवढया प्रचंड बहुमताने जिंकलेली ही जागा आपण टिकवू शकू की नाही? आपला उमेदवार यश मिळवू शकेल की नाही याबद्दल ते स्वत:च साशंक होते. असे का व्हावे? आणीबाणीचा कोळसा उगाळून-उगाळून पूर्ण झिजून गेला होता. त्यामुळे ते जुने पुराण उपयोगी पडण्यासारखे नव्हते आणि अभिमानाने सांगावे असे राम नरेशजींनी काही केलेच नव्हते आणि जे होते ते लोकांपर्यंत पोचत नव्हते. कारण पक्षयंत्रणाच आतून पूर्ण पोखरली गेली होती. मातीचे ढिकूळ पाण्यात जितक्या सहजपणे विरघळून जाईल तितक्या सहजतेने जनता पक्षाचे घटकपक्ष विरघळून जातील अशी लोकांची अपेक्षा नव्हती. या प्रक्रियेला वेळ लागेल हेही लोकांना समजण्यासारखे होते; पण लोकांच्या मनात जे होते ते घडतच नव्हते. एकात्मतेची प्रक्रिया आकाराला येताना दिसती तर गोष्ट वेगळी; पण कानी येत होते, पेपरात दिसत होते ते नेमके विरुद्ध स्वरूपाचे होते. मतभेद आणि ताणाताणी यांच्या बातम्यांना ऊत आला होता. जनता पक्षाच्या मातब्बर नेत्यांनी नऊ राज्यांतील विधानसभा-निवडणुकीची जी पहिली फेरी झाली त्या वेळी जीव तोडून सांगितले-'आम्हाला बहुमत द्या!' त्या वेळी अटलजी म्हणाले, केंद्रात आमची सत्ता आणलीत, धोती मिळाली. आता राज्यात आमची सत्ता आणून कुडताही द्या!' लोकांनी मतांचा पाऊस पाडून चांगला ढळढळीत कुडता दिला. तरीही यांच्याच करणीने त्या कुडत्याची शिवण उसवू लागली त्याला लोक काय करणार? जनता पक्षाला सात राज्यांत निर्विवाद बहुमत मिळाले. वाटले, आता सारे सुरळीत चालणार; पण कुजक्या बातम्यांचे पेव थांबेचना. देवीलाल रहाणार का जाणार? राम नरेश हलले तर त्यांच्या जागी कोण येणार? चरणसिंग पक्षातील सत्तास्थानांचा राजिनामा देणार की नाही? आपसातील मतभेद दूर करण्यासाठी जनता पक्षाच्या श्रेष्ठींची बैठक. बहुमत असले तरी बोंब आणि नसले तरी बोंब! लोक जाम वैतागले. जनता पक्षाबद्दलच्या या वांझोट्या बातम्यांनी त्यांचा घोर अपेक्षाभंग केला आणि या असल्या वातावरणात एक पोटनिवडणूक तोंडासमोर येऊन उभी होती. राम नरेशजींना जे उमगले ते उमेदवार म्हणून उभे असलेल्या राम बच्चन यादव यांना उमगले नाही! आपण निवडणूक जिंकणारच असा घोषा त्यांनी या पहिल्याच बैठकीमध्ये लावला तरी, त्यांच्या निवडणुकीचे तारू ज्यांना पैलतीरी लावायचे होते त्या चौधरी चरणसिंगांची आणि मुख्यमंत्रिपदाची डगमगती खुर्ची संभाळणाऱ्या राम नरेश यादव यांची मने मात्र धास्तावलेलीच होती.

इतरांच्या प्रयत्नांनी हुकुमशाही तुटेपर्यंत एखाद्या वफादार सेवकाप्रमाणे हुकुमशाही राबविणाऱ्या आणि स्वत:ला खरी कांग्रेस म्हणविणाऱ्या मंडळींनी चंद्रजित यादव यांना पुन्हा तोफेच्या तोंडी दिले! दोन यादवांच्या या टकरीतुन वाट काढायची तर उमेदवार

कोण असावा ? असा प्रश्न इंदिराजींसमोर होता आणि कोणाशीही सल्लामसलत न करता त्यांनी निर्णय घेऊन टाकला की आपल्या पक्षातर्फे ही निवडणूक मोहसिना किडवाई लढवितील ! त्याच बैठकीमध्ये त्यांनी पुढे हेही स्पष्ट केले की आपल्या आग्रहाखातर किडवाई यांनीही निवडणूक लढविण्याचे ठरविले असले तरी आपण स्वत: या निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे आहोत असे समजून या निवडणूकमोहिमेचे स्वतः सूत्रसंचालन करू !

उत्तरप्रदेशाचे सारे राजकारण जातीय विचार करून खेळविले जाते. बिहारपेक्षा येथील परिस्थिती बरी असली तरी निवडणुकांचे उमेदवार ठरविताना त्याची जात आणि त्याचा मतदारसंघ याचा विचार केल्याखेरीज कोणत्याही राजकीय पक्षाला पुढे जाणेच शक्य नाही. आता या आझमगढ पोट-निवडणुकीचेच पहा ना. आझमगढ मतदारसंघामधील सहा लाख मतदारांपैकी सुमारे २६ टक्के मतदार यादव जमातीचे. त्यामुळे यादव उमेदवाराला येथे नेहमीच प्राधान्य मिळाले. या निवडणुकीमध्ये जबर पराभूत झालेले चंद्रजित यादव याच मतदार संघातून पूर्वी दोन वेळा निवडून आले आहेत. पुन्हा उमेदवार निवडण्याची जेव्हा त्यांच्या पक्षावर वेळ आली तेव्हा त्यांना पराभूत यादव यांनाच पुन्हा टेकू लावणे भाग पडले. कारण त्या पक्षाजवळ उपलब्ध असलेल्या उमेदवारांमध्ये त्यातल्या त्यात प्रबळ यादव उमेदवार चंद्रजित ! तेव्हा द्या त्याला तिकिट ! राम नरेश यादव यांनी ज्यांची जनता पक्षातर्फे निवड केली ते राम बच्चनजी पण यादवच ! मुख्यमंत्र्यांच्या विश्वासातले शिवाय नात्यातले. तेव्हा राम नरेशजींनी त्यांच्या नावाची शिफारस केली आणि ती मान्य करण्यात आली. हे राम बच्चनजी उत्तरप्रदेशच्या राजकारणात चांगलेच मुरलेले आहेत. गेली वीस वर्षे त्यांनी उत्तरप्रदेश विधानसभेची आमदारकी अगदी व्यवस्थितपणे संभाळली आहे; पण जनता पक्षाच्या घसरत्या लोकप्रियतेचा सुगावा त्यांना लागला नाही. समाजवादी आणि जनसंघी मंडळी आपणापासून दूर दूर आहेत हे त्यांना जाणवले; पण भालोदची शक्ती आणि मुख्यमंत्र्यांचे सामर्थ्य आपल्या पाठीशी आहे तेव्हा आपण निवडणूक रेटून नेऊ असा त्यांचा अंदाज होता. निवडणूक काळजीपूर्वक लढवावी असा सूर ज्या वेळी ज्येष्ठ नेत्यांकडून लावला जात होता त्या वेळी ते जितक्या आत्मविश्वासाने ही निवडणूक मी जिंकोनच असे सांगत होते तितक्याच आत्मविश्वासाने त्यांनी निवडणूक लढविली. जातीय राजकारणाचे हिशेब त्यांच्या डोक्यात इतके घट्ट बसलेले की त्यापुढे जाऊन ते फारसा विचार करण्यास तयार नव्हते. चंद्रजित यादवची संधिसाधू म्हणून ते हेटाळणी करीत आणि किडवाईबाईंचा तर त्यांनी जवळजवळ शेवटपर्यंत गंभीरपणे विचारही केला नाही. इंदिराजींच्या प्रचारसभांनी ज्या वेळी मतदारसंघ ढवळून निघाला त्या वेळी त्यांना इंदिरा कॉंग्रेसच्या सामर्थ्याची पहिली जाणीव झाली. एका पत्रकाराने त्यांना निवडणुकीबद्दल अंदाज विचारला असता, 'मी अदाज बांधत नसतो तर जिंकण्यासाठी निवडणूक लढवीत असतो' अशी फुशारकी मारून त्यांनी मतदारसंघाच्या जातीय वर्गवारीचे भेंडोळ त्याच्या समोर उलगडले. यादव किती, ब्राह्मण किती, ठाकूर किती याची आकडेवारी सांगून ते म्हणाले, 'माझा विजय निश्चित आहे ! ' अनवॉन्टेड यादव असा त्यांनी चंद्रजित यादव यांचा उल्लेख केला, तर लखनौजवळील बाराबंकीहून आलेल्या मोहसिनाबाईंना यश मिळण्याची शक्यताच नाही. कारण त्या बाहेरच्या उमेदवार आहेत. निवडणुकीला साधारणपणे दहा दिवस असताना त्यांनी हे हिशेब दिले; परंतु निवडणूकमोहीम ज्या वेळी अखेरच्या टप्प्यात आली त्या वेळी आपले हिशेब पुन्हा तपासून पहाण्याची वेळ त्यांच्यावर आली. निवडणूकमोहिमेच्या प्रचाराच्या पहिल्या फेरीत अधिकृत कॉंग्रेसचे चंद्रजित यादव आघाडीवर होते. मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात राम बच्चन यादव यांचे पारडे जड होते. जनता पक्षाचे ते अधिकृत उमेदवार असले तरी त्यांना जनता पक्षाचा एकमुखी पाठिंबा नव्हता. तो पाठिंबा मिळविण्यात जर त्यांना यश आले असते तर निवडणूकनिकालावर परिणाम झाला नसता. फार तर त्यांची आणखी दहा एक हजार मते वाढली असती.

निवडणूक जिंकायचीच अशा धोरणाने इंदिराजी आपल्या पक्षाचे काम करीत होत्या. या मतदारसंघामध्ये त्यांनी घेतलेल्या सभांची संख्या १८० च्या आसपास आहे हे सांगितल्यावर या निवडणुकीमध्ये त्यांनी किती रस घेतला असला पाहिजे हे सहज लक्षात येते. पक्षामधील सारी जबाबदार मंडळी त्यांनी स्वत: ही निवडणूक लढवावी म्हणून आग्रह धरून बसली असताना इंदिराजींनी नकार दिला. त्यांचा नकार कठोर नसला तरी इतक्या लवकर त्यांना निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरण्याची इच्छा नव्हती. उमेदवाराचा कसून शोध चालू होता. यादव उमेदवार त्यांना नको असला तरी जातीय राजकारणाच्या खेळीमेळीमध्ये मात करील असा उमेदवार त्या शोधीत होत्या. मीर कासिम यांना विचारण्यात आले आणि त्यांनी नकार दिल्यावर इंदिराजींनी मोहसिनाबाईंना आग्रह केला. उत्तरप्रदेश इंदिरा कॉंग्रेसचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या मोहसिनाबाईंचा प्रथम होकार घेतल्यावर इंदिराजींनी त्यांची उमेदवारी घोषित केली. त्यांच्या उमेदवारीची चेष्टा करताना राम बच्चन यादव म्हणाले होते की, माझ्या मतदार संघातील एखाद्या मतदाराला परदेशी जायचे असले आणि त्याच्या पासपोर्ट-पेपरवर जर त्याला या खासदारबाईंची सही हवी असली तर बाईंच्या गावी जाण्यासाठी त्याला शंभर रुपये भाडेखर्च करावा लागेल. व्वा ! काय पण प्रतिक्रिया ! जणु काही आझमगढहून रोज शेपन्नास माणसे इंग्लंड-अमेरिकेकडे निघत होती ! अर्थात रामबच्चनजींची ही उपरोधिक प्रतिक्रियाही अगदी प्रारंभीच्या काळातली; पण इंदिराजींच्या धावत्या दौऱ्याचा प्रभाव वाढू लागून निवडणूक अखेरच्या टप्प्यात आली त्या वेळी मात्र-राम बच्चनजींचा पहिला आत्मविश्वास राहिला नव्हता. तिहेरी सामन्याची भाषा केव्हाच मागे पडली होती. निवडणूक दुहेरी आहे हे स्पष्ट झाले होते. निवडणूक या टप्प्यावर आल्यावर मात्र त्यांनी मोठी मार्मिक प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, प्रारंभी माझी अशी कल्पना होती की, इंदिरा कॉंग्रेस पक्ष ही निवडणूक लढवीत असून मोहसिना किडवाई नावाच्या बाई या पक्षाच्या उमेदवार आहेत; पण नाही. आता माझ्या असे लक्षात आले आहे की, येथे पक्षही नाही आणि किडवाईबाईही नाहीत ! इंदिराबाईच ही निवडणूक लढवीत आहेत आणि या बाई डमी उमेदवार आहेत. इंदिराबाईंच्या तडाखेबंद प्रचारावर इतकी चांगली कॉमेन्ट अन्य कोणी केली नसेल !

या निवडणुकीची उमेदवारी निश्चित करण्यापासून ते प्रचाराच्या अखेरच्या दिवसापर्यंत इंदिराजींचा सर्वत्र पुढाकार होता. वारे आपल्याला अनुकूल आहे आणि ही निवडणूक जिंकायचीच हे त्यांनी मनोमन ठरविले होते. मोहसिनाबाईंची उमेदवारी निश्चित करून त्यांनी यादवी झुंजीला एक नवीन कलाटणी दिली. मतदारसंघामध्ये २६ टक्के यादव असले तरी शेतीवाडी आणि दूधदुभत्याचा धंदा करणाऱ्या या जातीबद्दल अन्य जातीजमातींमध्ये फारसे प्रेम नाही. असला तर दुस्वास आहे हे त्यांनी पुरेपूर ओळखले होते. यादव उमेदवार नको हे जसे त्यांनी नक्की केले तसेच मुसलमान उमेदवार हवाच हेही निश्चित केले. अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करणारा पक्ष म्हणून इंदिरा पक्षाची आणि व्यक्तिशः इंदिराजींची भरपूर टिमकी वाजविण्यात आली. त्याचे परिणामही आंध्र-कर्नाटकामध्ये दिसून आले. आंध्रमध्ये, आझमगढमध्ये मुसलमान उमेदवार उभा केला तर १६ टक्के मुसलमानांची मते गृहीत धरून पुढे जाता येणे शक्य होते. खेरीज अन्य अल्पसंख्याकांचीही मोठी सहानुभूती मिळणार होती आणि यादवांची मते विभागली जाऊन उमेदवार निवडून येण्याची शक्यता वाढणार होती. हे सर्व हिशेब लक्षात घेऊन उमेदवारी घोषित करण्यात आली आणि बाई दुसऱ्या दिवसापासून कामाला लागल्या. निवडणुकीला केवळ तीन दिवस कमी असताना त्यांनी पक्षकार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये सांगितले, ही निवडणूक आता आवाक्यात आली आहे; पण या एखाद्या विजयाने असे सुस्तावून जाऊ नका! वातावरण आपल्याला अनुकूल आहे तेव्हा आक्रमक धोरण स्वीकारा. ७ मे १९७८ हा निवडणुकीचा दिवस जवळ येत होता. निवडणुकीच्या रिंगणात एकूण २१ उमेदवार असले तरी स्वत: रामबच्चनजींनी सांगितल्याप्रमाणे ही निवडणूक जनता पक्ष विरुद्ध इंदिरा गांधी अशा पद्धतीने इंदिराजींकडून लढविली जात होती. प्रचाराची सारी साधने त्या हिरीरीने वापरीत होत्या. लोकांना आपल्याबद्दल सहानुभूती आहे हे त्यांनी केव्हाच ओळखले होते. त्यांच्या १८० भाषणांची चाळणी केली तर त्याच्यात इतर काय मुद्दे असतील ते असोत; पण दोन-तीन गोष्टी हमखास असायच्या—मी बाईमाणूस; पण हे जनता सरकार माझ्या मागे कसे हात धुऊन लागले आहे पहा! या सरकारला जनतेच्या हिताची कळकळ नाही. जनकल्याणाचा कार्यक्रम नाही. कोणत्याही परिस्थितीत मला त्रास देणे एवढा एकच उद्योग हे सरकार करते! त्यासाठी कमिशन नेमून जनतेच्या लक्षावधी रुपयांचा चुराडा करते. मला भाषणांसाठी परदेशी बोलावणे आले तरी जाऊ दिले जात नाही. या मुद्द्यांच्या आधारे पार्श्वभूमी तयार केली की, उत्तर प्रदेश सरकारच्या गलथान कारभारावर त्या तुटून पडत असत. अल्पसंख्यांकांना चुचकारीत असत. त्यांच्या प्रत्येक सभेला तुफान गर्दी असे आणि श्रोत्यांची अनुकूल दादही मिळत असे. वर्षाभरापूर्वीचा उपहास कोठच्या कोठे नाहीसा झाला होता. प्रचारयंत्रणेचे स्वरूप इंदिराजींनी अशा प्रकारे आखले होते की, जवळजवळ प्रत्येक मतदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधला जावा. सभांची मोठी जबाबदारी त्यांनी उचलली. त्यांच्या १०० सभांपैकी जेमतेम पन्नास सभांना प्रत्यक्ष उमेदवार हजर होता. उमेदवार असलेल्या किडवाईबाईंचा भर प्रत्यक्ष जनसंपर्कावर जास्त असे. त्या घरोघरी जाऊन प्रचार करीत असत. कित्येक मतदारांचा तर असा समज झाला होता की, मोहसिनाबाई इंदिराजींच्या जवळच्या नातेवाईक आहेत. त्या आल्या की, लोक आपसात कुजबुजतही—इंदिराजींची पुतणी वगैरे तर नव्हे! मोहसिनाबाईंनी हा गैरसमज कधीही दूर केला नाही. प्रचार करीत असताना त्यांनी प्रमुख महिलामतदारांवर आणि अल्पसंख्यांकांवर आपले लक्ष केंद्रित करावे असा आदेश त्यांना देण्यात आला होता आणि त्यांनी त्याचे तंतोतंत पालन केले. घरामध्ये गेल्यावर त्या प्रथम गृहिणींची आपुलकीने विचारपूस करीत असत आणि मग हळुवारपणे मताची याचना करीत असत. या मतदारसंघामध्ये सुशिक्षितांचे प्रमाण तसे अल्प आहे. या मंडळींच्या वाटेला जाऊ नये किंवा त्यांच्याशी वादविवादही करू नये असे स्वतः इंदिराजींनी बजावले होते. प्रचारासाठी सुमारे ३५० कार्यकर्ते बाहेरून आणण्यात आले होते. निवडणूक जिंकण्याच्या ईर्षेने काम करणारा एकमेव पक्ष होता इंदिरा काँग्रेस आणि पक्षीय यंत्रणेची सारी सूत्रे होती दस्तुरखुद्द इंदिराजींच्या हाती!

मतदानाचा दिवस येण्यापूर्वीच चंद्रजित यादव निवडणूक हरले असले तरी त्यांचा एवढा दारुण पराभव होईल असे वाटले नव्हते. ४८ वर्षांचे चंद्रजित आझमगढमध्ये आपले डिपॉझिट गमवून बसले. त्यांच्याबद्दल चांगले बोलणारी माणसे शोधावी लागतात. सर्वसामान्य *माणसाची प्रतिक्रिया अशी की, या माणसाने आमचे आठ*-दहा वर्षे प्रतिनिधित्व करूनही स्वतःचे हित साधण्यापलीकडे काही केले नाही. त्यांची स्वतःची भव्य वास्तू आझमगढमध्ये उभी आहे. मंत्री झाल्यानंतर त्यांचे वैभव वाढले असे उघड बोलले जाते. त्यांच्याबद्दल आणि युवक काँग्रेसच्या एके काळच्या अध्यक्षा अंबिका सोनी यांच्या स्नेहसंबंधांच्या वार्ताही आझमगढमध्ये येऊन पोचल्या आहेत. काही काळचा व्यवहारामध्ये त्यांचे हात गुंतलेले आहेत असाही बोलवा असल्याने इंदिरा काँग्रेसचे कार्यकर्ते त्यांचा उल्लेख आझमगढचा 'हाजी मस्तान' असाच करीत असत. तर हे हाजी *मस्तान पराभूत झाल्यातच जमा* होते.

निवडणूकप्रचाराची धुळवड जेव्हा थांबली त्या वेळी वातावरण इंदिरा काँग्रेसला अनुकूल आहे हे स्पष्ट झाले होते. तथापि इतका मोठा आणि निर्विवाद विजय मोहसिनाबाईंना मिळेल असे मात्र वाटले नव्हते. साधारणपणे आठ ते दहा हजारांनी बाई आघाडीवर राहतील असा अंदाज होता. अंदाजाची दिशा बरोबर होती; परंतु वेग अनपेक्षित होता. या विजयाने अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या. साऱ्या विरोधी शक्ती एकत्र आल्या तरी इंदिराजी प्रबळ झुंज देऊन प्रतिपक्षाला नामोहरम करण्याइतक्या अजूनही समर्थ आहेत हे स्पष्ट झाले; *पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विजयाने जनता पक्षासमोर* एक मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. लोकशाहीमध्ये बदलत्या लोकमताची कदर ठेवली गेलीच पाहिजे हे सूत्र मानले तर प्रतिदिनी मिळणारी ही लोकमान्यता इंदिराजींचे पारडे जड करीत आहे. या संदर्भात १० सप्टेंबर ७७ च्या माणूस रायबरेली विशेष अंकामधील 'इंदिराजीकी वापसी' या माझ्या लेखामधील काही भागाची आठवण येते. त्या लेखात मी म्हटले होते, 'मते मिळविण्याच्या आपल्या शक्तीचा प्रत्यय बाईंनी आणून दिला तर कोणीही त्यांची वाटचाल रोखू शकणार नाही आणि जनतेने दिलेल्या विश्वासातून असे सामर्थ्य

त्यांना पुन्हा पैदा झाले तर आता दूर असणारे नेतेही बाईंच्या मागील रांगेतील खुर्च्यांवर मुकाट जाऊन बसतील ! म्हणजेच इंदिराजींनी पुन्हा राजकारणात यायचे की नाही याचे उत्तर जनतेच्या हाती आहे आणि आपले उत्तर देण्यापूर्वी जनता जनता पक्षाच्या हालचालींची नोंद घेणार आहे. जनता पक्षाला आणीबाणीमधील अत्याचारांचे नकारात्मक राजकारण दीर्घकाळ खेळता येणार नाही. जनता पक्षाने आर्थिक प्रश्न, बेकारी आणि अल्पसंख्याकांचे प्रश्न याबाबत काही ठोस कार्यक्रम दिला नाही, तर बाईंचे पुनरागमन नाकारता येत नाही.' आज वरील गोष्टींचा प्रत्यय बरोबर येताना दिसतो. वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आदि मंडळी बाईंच्या मागे जाऊन उभी राहण्यास उत्सुक आहेत. जनता पक्ष काही भरीव कार्यक्रम देऊ शकला नाही. उलट पक्षांतर्गत फाटाफुटीच्या वार्तांनी जनता हैराण झाली आणि जनतेने एक छोटा धडा या पक्षाला शिकविला ! उत्तर हिंदुस्थानातून आपला उमेदवार निवडून आणण्यात बाईंनी यश मिळविल्यामुळे त्यांना नवीन तेज प्राप्त झाले. आझमगढची पोटनिवडणूक ही केवळ एक सर्वसाधारण पोटनिवडणूक नव्हती. या निवडणूकनिकालाचे राजकीय परिणाम अपरिहार्य आहेत. निवडणूकनिकालाने संतुष्ट झालेल्या बाई जनतापक्षाला खिजविण्यासाठी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहामध्ये येतात आणि पत्रकारांना मुलाखती देतात आणि जनता पक्षाचे श्रेष्ठी जेथे त्यांना प्रचंड बहुमत आहे त्या हरियाना आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाचे वाद खेळत बसतात आणि तीन्ही प्रमुख नेते आपल्या गटाचे घोडे थोडे पुढे दामटताना दिसतात. एका विजयाने बाईंचा पक्ष प्रस्थापित सरकार-विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणतो आणि बाईंच्या विरुद्ध येऊ घातलेल्या कायदेशीर कारवाईला खो घालण्याची योजना आखतो याचे कारण या विजयाने लोकमान्यतेची मोहोर त्यांच्या हाती आलेली असते. त्यात हा विजयही असाधारण परिस्थितीमध्ये मिळविलेला ! वर्षभरापूर्वीचे एक लाख अडतीस हजार मतांचे ओझे उतरवून वर पस्तीस हजार नोंदविणे हा काही तसा साधा विक्रम नव्हे ! तोही एका पराभूत बाईने करून दाखविला ! याच बाईने आज अर्धा हिंदुस्थान सर केला आहेच. लोकसभा निवडणुकीतही हीच दिशा कायम राहिली तर कोणी सांगावे चार वर्षांनी काय होईल ते ?... आता दरम्यान इंदिराजींविरुद्ध काही कायदेशीर कारवाई झाली अथवा त्यांचा मतदानाचा अधिकार रद्द झाला तर मात्र परिस्थिती कोणते वळण घेईल ते सांगणे कठीण आहे. □

---


# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

**किंमत : वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

आणीबाणीचं आसुरी आव्हान ओळखणारं,
त्या आव्हानानं अस्वस्थ होऊन पेटून उठणारं आणि
विकासशील वैचारिक निष्ठेनं या जुलमाला
प्रकटपणे हटकणारं.......विनयचं
संवेदनाक्षम, चिकित्सक, रसरशीत मन....

या मनाची
अन् या मनात पडलेल्या असंख्य, अथांग प्रतिबिंबांची
ही मार्मिक आणि मर्मभेदक कहाणी....

या लेखनाला कादंबरी म्हणावं की आत्मकथन ?
की आपलं कहाणीच ?
म्हणावं काहीही, एक खरं...
प्रांजळ मनानं वाचणाऱ्याला ही कहाणी मनोमन बोलकं करील,
अंतर्मुख करील, प्रत्येकापुढे निर्लेप आरसा धरील—
जबाबदारीनं, सहानुभूतीनं....आणि
आपुलकीच्या कडव्या उत्कटतेनं.

दुर्मिळ असे अस्सल बावनकशी क्षण विनय जगला.
ते वाया गेले नाहीत.
या कहाणीत त्या क्षणांना तितकंच अस्सल,
तितकंच बावनकशी रूप लाभलं आहे.

—प्रा. स. शि. भावे

# जनता पक्ष

## हे हत्यार गंजू देऊ नका !

वा. दा. रानडे

गेल्या चार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आझमगढमधील जनता पराभवाचे आणि इंदिरा काँग्रेसच्या विजयाचे विश्लेषण गेल्या अंकात केले. येथे आझमगढनंतर जनता पक्षाच्या धोरणात, कार्यक्रमात व कार्यपद्धतीत कोणता बदल व्हावयास हवा आणि तो होण्याची कितपत शक्यता आहे यासंबंधी काही विचार मांडीत आहे; पण या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी जनता पक्षावर केल्या जाणाऱ्या एका टीकेची दखल घ्यावयास हवी. एखाद्या पक्षाबद्दल भलत्या अपेक्षा बाळगणाऱ्याच्या आणि त्या पुऱ्या झाल्या नाहीत म्हणजे आमची निराशा झाली असे म्हणणाऱ्याचे यात चूक त्या पक्षाची नसून भलत्या अपेक्षा बाळगणारांची आहे. जनता पक्ष विशेष काही बदल घडवून आणू शकणार नाही असेच आम्ही म्हणत होतो आणि तसेच घडले असे या टीकाकारांचे म्हणणे.

जनता पक्षाच्या आणि जनता सरकारच्या कारभाराबद्दल केवळ विरोधी पक्षच नव्हते, तर जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्तेही असमाधान आणि निराशा व्यक्त करीत आहेत. पक्ष कोठे कमी पडला याचे उत्तर शोधताना पक्षस्थापनेपासून विचार करायला हवा. काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी संपविण्याचे सामर्थ्य कोणत्याही एका विरोधी पक्षात नाही. सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी एकत्र येऊन केवळ संयुक्त आघाडी नव्हे तर एक पक्ष स्थापला पाहिजे. आपापल्या पक्षांचे स्वतंत्र अस्तित्व विसर्जित केले पाहिजे असा विचार काही नेत्यांच्या मनात आणीबाणीपूर्वीच आला होता व त्या दिशेने प्रयत्नही सुरू होते; पण जून ७५ मधील गुजरात विधानसभा निवडणुकांपर्यंत मोरारजीभाई देसाई एक पक्षाला तर नाहीच; पण एक निवडणूकचिन्ह घेण्यालाही तयार नव्हते. गुजरातच्या निवडणुका संयुक्त मोर्चा म्हणून लढविण्यात आल्या. विरोधी पक्षांना खरे एकत्र आणले ते आणीबाणीने. श्रीमती इंदिरा गांधींनी निवडणुकांची घोषणा केली आणि जयप्रकाशजींच्या आग्रहाने थोडाही वेळ न घालविता जनता पक्ष स्थापन झाला.

जनसंघ, समाजवादी यांसारख्या एकमेकांविरुद्ध तोंडे असलेल्या पक्षांचे एकत्र जमणार कसे? एक धोरण, एक कार्यक्रम ते काय देऊ शकणार? तसेच या नव्या पक्षात जनसंघ, भारतीय लोकदल, संघटना काँग्रेस हे तीन उजवे पक्ष आणि फक्त समाजवादी हा डावा पक्ष. तेव्हा पक्षाच्या धोरणावर व कार्यक्रमावर उजव्या गटांचीच पकड राहणार अशा शंका पक्षस्थापनेच्या वेळीच व्यक्त करण्यात आल्या होत्या व त्या अगदीच अनाठायी नव्हत्या असे गेल्या चौदा महिन्यांच्या अनुभवाने दिसून आले आहे. घटक पक्ष आपले वेगळे अस्तित्व विसरले नाहीत. जनसंघ आणि भालोद यांनी एकजूट करून उत्तरेकडील राज्यात मुख्यमंत्रिपदांचे आपापसात वाटप केले. घटकांमधील संघर्ष त्यातून वाढत गेले. देशापुढील निकडीचे प्रश्न सोडविण्याचा कार्यक्रम धडाडीने हाती घेण्याऐवजी हे संघर्ष मिटविण्यातच पक्षनेत्यांचा वेळ जाऊ लागला. रीतसर सभासदनोंदणी करून पक्षबांधणी करण्याकडे दुर्लक्ष झाले. काँग्रेसमधील संधिसाधूंना पक्षात मुक्त प्रवेश देण्यात आला. जनता पक्षाची प्रतिमा डागळली. दक्षिणेतील जनता पराभवाचे ते एक प्रमुख कारण होते. दलितांवरील अत्याचारांचे भांडवल इंदिरा काँग्रेसने केले. त्यात प्रचारच अधिक होता हे खरे; पण वस्तुस्थिती काय आहे याची जनतेला खात्री पटविण्यात जनता पक्ष अपुरा पडला.

जनता पक्षाने लोकशाहीची व नागरी स्वातंत्र्याची पुनःप्रस्थापना केली हे खरे; पण समाजपरिवर्तनाचा कार्यक्रम धडाडीने हाती घेत असल्याचे दिसले नाही. दारिद्र्यनिवारण, बेकारी-निवारण, दलितांवरील अन्याय-निवारण हे देशापुढील निकडीचे प्रश्न ते एकदम सोडविणे शक्य नाही. उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण, जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळवून देणाऱ्या उद्योगांना प्राधान्य, भूमिहीनांना जमीनवाटप या गोष्टींना जनता पक्षाच्या आर्थिक कार्यक्रमात प्राधान्य देण्यात आले आहे; पण खरी कसोटी अंमलबजावणीवर आहे. जमीनसुधारणांच्या अंमलबजावणीचा वेग पाहिला तर काँग्रेस पक्षापेक्षा जनता पक्ष त्यात अधिक वेग आणू शकलेला नाही. शेतीमंत्री बर्नाळा यांनी ऑगस्ट १९७७ मध्ये राज्यांना, मुख्यमंत्र्यांना व शेतीमंत्र्यांना एक पत्र पाठविले होते. सरकारने ताब्यात घेतलेल्या जमिनींचे फेरवाटप २ ऑक्टोबर १९७७ पर्यंत पुरे झाले पाहिजे अशी मुदत त्यात घालून दिली होती. पुढे ही मुदत ३१ डिसेंबर १९७७ पर्यंत वाढवून देण्यात आली, तरीही अंमलबजावणीचा वेग मंदच राहिला. वर्षअखेर ४२.५ लाख एकर अतिरिक्त जमिनीपैकी फक्त २२.२ लाख म्हणजे निम्म्यापेक्षा थोडी जास्त जमीन सरकारने ताब्यात घेतली होती आणि त्यापैकी १३.७४ लाख एकर जमिनीचे वाटप करण्यात आले. नुकत्याच झालेल्या जनता-मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत आता हा कार्यक्रम पुरा करण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. या कार्यक्रमाला वेग का येत नाही? दोषाचे खापर केवळ नोकरशाहीवर फोडून मंत्री व कार्यकर्ते आपल्या जबाबदारीतून सुटू शकत नाहीत. अधिकाऱ्यांच्या मागे लागून कार्यकर्त्यांनी ही कामे त्वरित करून घेतली पाहिजेत. पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी या कार्यालाच वाहून घेतले पाहिजे. आपल्या भागात अतिरिक्त जमीन किती, त्यापैकी किती जमिनीबद्दल कोर्टात दावे आहेत, प्रत्यक्ष वाटपाचे काम कोठे अडले आहे ही सर्व माहिती कार्यकर्त्यांजवळ तयार हवी आणि नोकरशाहीमागे नेट लावून फेरवाटणीचे काम त्वरित पुरे करण्याकडे त्यांचे लक्ष हवे. या कार्यक्रमाला वेग येणार नसेल तर जनता पक्षाचे हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत, तो पक्ष बड्या सधन शेतकऱ्यांचा पाठिराखा आहे असा जनतेचा ग्रह होईल. भूमिहीनांना जमिनीचे फेरवाटप हे एक उदाहरण झाले. इतर कार्यक्रमांबद्दलही असेच म्हणता येईल. जनता पक्षातील काही गट वरिष्ठ वर्गाचे पाठिराखे आहेत काय? आणि जनहिताचा कार्यक्रम अंमलात आणण्यात ते अडथळे आणीत आहेत काय हे त्यावरून स्पष्ट होईल. खंबीर धोरण स्वीकारून अशा मंडळींना इशारा द्यायला हवा आणि त्यांनी धोरण न बदलल्यास त्यांना पक्षाबाहेर घालवायला हवे.

जनता पक्ष हे जनतेने निर्माण केलेले हत्यार आहे. हे हत्यार गंजू द्यावयाचे नाही ही जबाबदारी तुम्हा-आम्हा सर्वांची आहे. सर्वसामान्य सभासदाला अधिक जागरूक व क्रियाशील करण्यानेच या हत्याराला धार येईल. नेत्यांना व कार्यकर्त्यांना योग्य मार्गावर ठेवण्याचे कार्य या जागरूक सभासदांनीच करावयाचे आहे. □

# एक हुकुमशाहीविरोधी लढा

## ग्रामस्वराज्य समिती, शहादे
## वार्षिक आढावा ( १९७७ )

शहादे भागामध्ये ग्रामस्वराज्य समितीच्या वतीने अनेक वर्षांपासून आदिवासी शेतमजुरांत काम चालू आहे. कै. अंबरसिंग सुरतवंती यांनी त्या कामाची सुरुवात केली. त्यापूर्वी ते सर्वोदय मंडळाचे वतीने सातपुड्यात काम करीत होते. शहादे भागात शेतमजुरांवर होणारे अन्याय, अत्याचार पाहून त्यांनी त्या भागात कामाला सुरुवात केली. शेतमजूर व गरिबांवर अनेक प्रकारचे अन्याय-अत्याचार होत असत. मजुरी कमी मिळत होती, जमिनी गेल्या होत्या, सर्व प्रकारची लुबाडणूक होत होती, त्यांचे जीवन अत्यंत कष्टमय होते. अशा सगळ्या लोकांना त्यांनी संघटित व्हायला शिकविले. अन्यायाविरुद्ध उभे रहायला शिकविले. सर्वोदयातील अनेक कार्यकर्ते त्यांच्या मदतीला आले. श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, रा. कृ. पाटील, एस्. एम्. जोशी, बाबा आमटे, प्रा. बंग हे आले. श्री. गोविंदराव शिंदे व दामोदरदास मुंदडा त्या भागातच कामाला लागले. 'माणूस'कार माजगावकर यांनी येथील परिस्थिती महाराष्ट्राचे वेशीवर मांडली. या कामामध्ये मुंबई-पुण्याची काही तरुण मंडळीही नंतर सामील झाली होती. अनेकजण आले, गेले. अंबरसिंगांनी कामाची शिस्त घालून दिली होती, कामाची पथ्ये ठरवून दिली होती. दुर्दैवाने अंबरसिंगांचे अकाली निधन झाले. बाहेरचे जे तरुण आले होते त्यांना आता ही चळवळ आपल्या हातात आली असे वाटायला लागले आणि त्यांनी आपल्या पद्धतीने कामाला सुरुवात केली. 'आम्ही मार्क्सवादी आहोत' असे हे तरुण म्हणू लागले. लाल झेंड्याच्या घोषणा देऊ लागले. मध्यंतरी आणीबाणी आली. कै. अंबरसिंगांच्या पत्नी श्रीमती छायाताई सुरतवंती व इतर कार्यकर्ते तुरुंगात गेले. गावोगावचे कार्यकर्ते या काळात लोकांचे धैर्य टिकवून होते व ते शांतपणे काम करीत होते. अंबरसिंग गेल्यानंतर आलेल्या आणीबाणीच्या काळात काही बाहेरील तरुणांचे जे वागणे होते, कामाची जी पद्धत होती ती पाहिल्यानंतर सर्वच कार्यकर्त्यांना ही चळवळ वेगळ्या दिशेला चालली आहे असे वाटू लागले. म्हणून १९७७ च्या २५ फेब्रुवारीला अंबरसिंगांच्या पुण्यतिथीच्या दिवशी कार्यकर्त्यांनी अंबरसिंगमहाराजांनी दाखवून दिलेल्या मार्गाने-जो मार्ग शांततेचा होता, सत्याचा होता-पुढे जायचा संकल्प केला व ग्रामस्वराज्य समितीचे काम मोठ्या नेटाने पुढे चालवायचे ठरविले. तेव्हा या तरुणांनी अलग काम करायचा निर्णय घेतला व 'श्रमिक संघटना' म्हणून ते अलग काम करू लागले. ग्रामस्वराज्य समितीचे काम मोकळेपणाने, खुल्या वातावरणात होऊ लागले. गावागावांत सभा होऊ लागल्या. त्या वेळी सालदारांचे नवीन वर्षाचे साल ठरायचे होते. त्यासाठी गावागावांत करार होऊ लागले. मेमध्ये सेवादलाच्या वतीने एक तरुणांचे शिबिर शहादे येथे घेण्यात आले. चाळीस तरुण त्या शिबिराला उपस्थित होते. शेतमजूर व शेतकरी यांच्या अडचणी व प्रश्न समजावून घेण्याकरता एक बैठक शहादा येथे घेण्यात आली. शेतमजुरांना किमान वेतन मिळाले पाहिजे, ते त्यांना मिळेल असा प्रयत्न व्हावा व त्यांना जोडधंदा मिळेल अशी योजना बनवावी, त्यांची मुले शाळेत जातील हे पहावे, अशा प्रकारचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या सभेला अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मार्गदर्शन केले. शिबिराला अण्णासाहेब सहस्रबुद्धे, लताताई पाटणकर, वसंतराव पळशीकर, शरद पाटील आदींनी मार्गदर्शन केले.

### मामोदे येथील पाणीपरिषद

सातपुड्याच्या पायथ्याशी जी आदिवासी गावे आहेत तेथे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. एप्रिल-मेमध्ये पिण्याच्या पाण्याची फारच गैरसोय असते. दोन-दोन मैल त्या लोकांना पाण्यासाठी भटकावे लागते. त्या भागामध्ये पाच-सहा (छोट्या) धरणांची योजना लोकांनी सरकारला सुचविली आहे. ही धरणे लवकर व्हायला पाहिजेत असे लोकांचे म्हणणे आहे. पाण्याचा प्रश्न सुटावा व त्या भागातील आदिवासींच्या शेतीला पाणी मिळावे म्हणून एक 'पाणी परिषद' आमोदे या गावी घेण्यात आली. अण्णासाहेब सहस्रबुद्धे या परिषदेचे अध्यक्ष होते. एस्. एम्. जोशी व प्रमुख नेत्यांची या सभेत भाषणे झाली. जंगलजमिनीचा प्रश्न नित्याचा प्रश्न म्हणूनच या भागामध्ये आहे. जंगलअधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार नेहमी लक्षात येतो. वर्षानुवर्षे ते या जंगल-जमिनीत शेती करीत आहेत; परंतु ही जमीन अजून त्यांना मिळालेली नाही. ती त्यांना कायमची मिळावी, जंगलतोड थांबवावी, जंगलसंवर्धनातून त्या भागातील लोकांना काम मिळावे असा सतत प्रयत्न करण्यात येतो. मेमध्ये महाराष्ट्र सरकारने या जंगलामध्ये शेती करणाऱ्या लोकांना हुसकावून टाकण्याचा प्रयत्न केला. काही लोकांच्या झोपड्या जाळल्या. त्यासाठी लोकांना संघटित करावे लागले. मुख्यमंत्र्यांपर्यंत जावे लागले व त्यांना काढून टाकण्याचे आदेश स्थगित करून घ्यावे लागले.

आदिवासी विभागात सरकारी रेशनदुकान कुणी तरी व्यक्ती

चालवते आणि स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करते. त्या दुकानातून लोकांना रेशन धड कधीच मिळत नाही. साखरही त्यांना मिळू शकत नाही. अनेक ठिकाणच्या तक्रारी आल्यानंतर त्या त्या भागामध्ये सभा घेऊन, लोकांची गाऱ्हाणी समजावून घेऊन रेशनदुकानदार व सरकारी अधिकाऱ्यांना त्याची जाणीव देण्यात आली. तालुक्याच्या ठिकाणी हे रेशनदुकानदार आपले धान्य व साखर विकून टाकतात, त्यामुळे लोकांना ते मिळत नाही. या सभांमुळे या प्रकारांना आता आळा बसला. असेच विकलेले धान्य काही ठिकाणी पकडावे लागले व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास या गोष्टी आणाव्या लागल्या.

म्हसावद हे शहादे तालुक्यातील मोठे गाव.भिल्लवस्ती मोठी आहे, परंतु त्यांची स्थिती शोचनीय आहे. भिलाटीत कुणीही यावे, काहीही काम सांगावे, त्यांना मारझोड करावी, असे प्रकार सर्रास चालले होते. जमिनी त्यांच्या लुबाडलेल्या होत्या. या भागातील पोलिसही खोटया केसेस लोकांच्यावर करीत असत. पुढारी त्यांना सतत त्रास देत असत. फिफटया पुढारी म्हणून लोक त्यांना समजू लागले. हे लोक पोलिसांच्या मदतीने लोकांच्यावरती खोटया केसेस करीत असत. लोकांच्याकडून पैसे घेऊन ते पोलिसांना देत असत व आपल्याला घेत, म्हणून त्यांना फिफटया म्हणत असत. लोक त्रस्त झाले असल्यामुळे ते संघटित झाले. आदिवासींव्यतिरिक्त या प्रश्नाची कळकळ असणाऱ्या लोकांनी या कामात सहाय्य केले. लोक संघटित झाल्यामुळे पोलिसांचे व पुढाऱ्यांचे काही चालले नाही. त्यांच्यावर जे अन्याय–अत्याचार केले होते त्यासंबंधीच्या केसेस लोकांनी उघडपणे योग्य अधिकाऱ्यांकडे दाखल केल्या व त्यांची चौकशी सुरू झाली. पोलिसांच्या बदल्या झाल्या व दोषी पुढाऱ्यांना गावात रहाणे अशक्य झाले. लोकांनी आपल्या गेलेल्या जमिनी परत मिळविल्या, चांगले वातावरण निर्माण झाले. या म्हसावद गावात बेघरांना एकशेवीस प्लॉट्स देण्यात आले. फक्त तीन भूमिहीनांना यापैकी प्लॉट मिळाले. बाकी सर्व घरे असलेल्यांना, माजी आमदार व मोठ्या लोकांना मिळाले. हे प्रकरणही योग्य अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात आले. गावचे प्रश्न सोडविण्याकरिता लोकसमितीची स्थापना झाली.

एखादी चळवळ चालवायची तर त्यामध्ये कार्यकर्त्यांचे प्रशिक्षणही व्हायला पाहिजे. नासिकला महाराष्ट्रातील शेतमजुरात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे एक प्रशिक्षणशिबिर झाले. त्यात नऊ कार्यकर्ते गेले होते. ते परत येऊन उत्साहाने कामाला लागले.

आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींकडे गेल्या होत्या. त्या त्यांना परत मिळाव्यात म्हणून महाराष्ट्र सरकारने दोन कायदे केले; परंतु त्या कायद्यांची अंमलबजावणी होऊ नये म्हणून स्टे आणला व त्यावर पुन्हा काही हालचाल झाली नव्हती. हा स्टे उठावा व आदिवासींना जमिनी परत मिळाव्यात म्हणून ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी आदिवासींचा मोर्चा शहादा तहसील कचेरीवर काढण्यात आला. सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते श्री. वसंतराव नारगोलकर यांचे या मोर्चेवाल्यांपुढे भाषण झाले.

## पाटीलवाडी सत्याग्रह

१९७१ साली पाटीलवाडी केस निर्माण झाली. त्या वेळी एका भिल्लाचा खून झाला व शंभर आदिवासी पकडले गेले व त्यांच्यावर केसेस भरल्या. जिल्हा कोर्टामध्ये एकोणीस आदिवासींना शिक्षा झाली, बाकीचे निर्दोष सुटले. हायकोर्टामध्ये अपील करावे लागले. बॅ. मोहन पुंगलिया यांनी केस लढविली. त्यामध्ये सर्व आदिवासी निर्दोष सुटले. त्यांचा सत्कार पाडळदा येथे करण्यात आला. जो आदिवासी मारला गेला होता त्याचे दिवसही करायचे राहिले होते. तेही त्याच्या लक्कडकोटच्या ग्रामस्थांनी केले. त्याची पत्नी आहे ती आंधळी आहे. तिला गावचे लोक मदत करतात. तिचे जीवन चाललेले आहे. बॅ. मोहन पुंगलिया यांनी परिश्रम करून केस चालविली; परंतु त्यांनी जो खर्च केला तोही देता आला नव्हता. त्यासाठी पू. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी काही लोकांना पत्रे लिहून मदत मागविली. असे निरनिराळ्या लोकांच्याकडून जमलेले साडेतीन हजार रुपये खर्चाचे म्हणून बॅ. मोहन पुंगलिया यांना देण्यात आले.

पाटीलवाडीची केस झाली त्या पाटीलवाडीची पाचशे एकर जमीन आहे. श्री. विश्राम हरी पाटील यांना ती सरकारने आदिवासींची शेती सुधारणा, गोपालन आदी कामासाठी दिली होती. ते ती आता स्वतःच बळकावून बसले आहेत. सिलिंगमध्ये ती येऊ नये म्हणून आपल्या नातेवाइकांमध्ये ती वाटून टाकली आहे. ती त्यांना जर त्या वेळी मिळाली नसती तर येथील आदिवासी भूमिहीन शेतमजुरांना ती मिळू शकली असती. म्हणून त्यांच्याकडे इतकी जमीन राहू नये, भूमिहीन शेतमजुरांना ती वाटावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली. शासनाने याबाबत विचार करून त्यांच्याकडून तीनशे एकर जमीन काढून घ्यावी असे ठरविले. त्यावर श्री. पाटील कोर्टात गेले व त्यांना स्टे आणला. हा स्टे उठविण्याबाबत सरकारने दिरंगाई केली. ही जमीन लोकांना लवकर वाटली जावी म्हणून पाटीलवाडी येथे या जमिनीवर सत्याग्रह करण्यात आला. श्री. दामोदरदास मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली पुरुषांच्या एका तुकडीने सत्याग्रह केला व श्रीमती छायाताई सुरतवंती यांच्या नेतृत्वाखाली भगिनींनी सत्याग्रह केला. पंचाहत्तर लोकांनी सत्याग्रहात भाग घेतला.

पाटीलवाडीच्या केसमधील ( १९७१ ) मुख्य आरोपी श्री. गणपत भिल्ल सुटून आल्यानंतर पुन्हा कामाला लागला आहे. अंबरसिंग असल्यापासून तो काम करीत होता. अंबरसिंग गेल्यानंतर आपली जबाबदारी वाढली आहे हे लक्षात घेऊन तो आता खूप काम करीत आहे. आदिवासींची आपसातील भांडणे मिटविण्याचे काम तो प्रामुख्याने करतो. अशाच कामासाठी तो पिंपरी या गावी गेला असताना त्याच्यावर सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी हल्ला केला व त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तो मारला गेला असे समजून त्याला तेथे टाकून ते निघून गेले. लोकांनी त्याला पोलिसांच्या मदतीने हॉस्पिटलमध्ये पोचविले. धुळ्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्याला ठेवावे लागले. दोन महिन्यांनंतर तो बरा झाला; परंतु या प्रकरणामुळे त्याचा एक डोळा साफ निकामी झाला. अशाही परिस्थितीत तो आज काम करीत आहे. गावागावात तरुण मंडळांचे काम चाललेले आहे. लहान मुलांसाठी कथामालेचे काम ठिकठिकाणी सुरू करण्यात आले आहे. या निमित्ताने मुंबईला आदिवासी मुलांचे जे शिबीर झाले त्या शिबिरामध्ये एकशेपंचवीस मुले निरनिराळ्या भागांतून पाठविण्यात आली. शहादा व धडगाव येथे कथामालेचो

शिबिरे झाली. मोलगी, धडगावं, शहादे, तळोदे, अक्कलकुवा, खापर, वडाळी, प्रकाशे, लोणखेडे, पाडळदा आदी ठिकाणी मुलांचे मेळावे या निमित्ताने घेण्यात आले. श्री. राजा मंगळवेढेकर यांनी या मेळाव्यांना मार्गदर्शन केले. कथामालेचे संस्थापक श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांनी शहादा, मोलगी, धडगाव, प्रकाशा, तळोदा येथील मेळाव्यांना मार्गदर्शन केले. धडगावला एक शिबीर कथाकथन अॅकेडमीतर्फे झाले.

आदिवासींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांकडे विशेष तऱ्हेने लक्ष दिले पाहिजे. त्यांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजेत, जंगल-जमीन त्यांना मिळाली पाहिजे, इतर त्यांचे प्रश्न आहेत ते सुटले पाहिजेत, यासाठी धुळे या जिल्ह्याच्या ठिकाणी एक महामोर्चा आयोजित करण्याचे ठरले. त्यासाठी शहादे, तळोदे, अक्कलकुवा, धडगाव आदी भागांतून दोन हजारांवर लोक गेले होते. शहादे भागातून साठ-सत्तर मैल पायी चालत लोक पोचले. एखाद्या गावात जायचे, रात्री मुक्काम करायचा, भजन करायचे, पुढे पहाटे उठून दुसऱ्या गावाला चालायला लागायचे. गावचे लोक उत्साहाने मोर्चाचे स्वागत करीत. मोठ्या उत्साहाने सर्व मंडळी महामोर्चाने धुळ्याला पोचली. मोर्चामध्ये वृद्ध होते, तरुण होते, बायाही होत्या. आपल्या लहान मुलांना कडेवर घेऊन त्या मोर्चामध्ये सामील झाल्या होत्या. आपल्या हक्कांसाठी आपण झगडले पाहिजे, सर्व श्रमिक एक झाले पाहिजेत, ही जाणीव मोर्चामुळे झाली.

ग्रामस्वराज्यसमितीच्या वतीने जसे धुळे जिल्ह्यात काम चाललेले आहे तसे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनेक संस्था काम करीत आहेत. हे गरिबातील, दलितातील काम वाढावे, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचारांना योग्य न्याय मिळावा यासाठी निरनिराळे प्रयत्न करणारे लोक आहेत. त्यांची एक सभा मुंबईला गांधी सेवा मंदिरात, ठाणे जिल्ह्यामध्ये काम करणाऱ्या भूमिसेनेने बोलाविली. अशा सर्व लोकांची बैठक झाली. एकमेकांचे अनुभव लोकांनी सांगितले व हे काम महाराष्ट्रभर व्यापक करावे असा निर्णय घेण्यात आला. ठाणे, धुळे, कुलाबा, नासिक, जळगाव, अमरावती, चंद्रपूर, सोलापूर या जिल्ह्यांत काम करणारे कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

शेतमजुरांचे प्रश्न सतत लोकांच्या पुढे ठेवण्यात येतात. सतत काम करणारे जे अनेक लोक आहेत त्यांना रात्रंदिवस काम करावे लागते. त्यांना पन्नास किंवा साठ रुपये दरमहा मिळतात. त्यांना शंभर रुपये मिळावेत अशी मागणी करण्यात आली व ती काही ठिकाणी मान्य झाली. सालदार नवीन वर्षाला नेमायच्या वेळी ज्या चिठ्ठ्या पाठवितात त्या बंद करण्याचा आग्रह धरण्यात आला. ब्राह्मणपुरी, म्हसावद, पिंपरी, सुलतानपूर, कुडावद, चिखली, सुलवाडे, पिपळोद, बोरद आदी गावांत शेतमजूर व शेतकरी यांच्यात करार झाले व ते पाळले गेले. काही ठिकाणी संप करावे लागले व ते समजुतीने मिटले. किमान वेतनापेक्षा जास्त मजुरी काही ठिकाणी शेतमजुरांना मिळाली.

अंबरसिंगमहाराजांनी गणपतीउत्सव सुरू केला. त्या निमित्ताने आदिवासी एकत्र येतात. आपल्या अडीअडचणींची चर्चा करतात व काही संकल्प करून परत जातात. आणीबाणी होती त्यामुळे गणपती-उत्सव फार अल्पप्रमाणात झाला. आणीबाणीनंतर प्रबोधनाचे जे काम आहे ते चांगल्या प्रकारे पार पडले. ठाणे जिल्ह्यात तलासरी येथे कार्यकर्त्यांचे शिबिर झाले, त्याला पाच कार्यकर्ते गेले. वाराणसी येथे एक महिन्याचा कॅम्प झाला. त्यालाही एक कार्यकर्ता गेला. शेतमजुरांचे तीन दिवसांचे शिबीर म्हसावद येथे झाले. त्याला चार तालुक्यांतील साठ शेतमजूर कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलीस गरिबांची कधी दाद घेत नाहीत. पोलिसस्टेशनवर आदिवासींना कधी चांगली वागणूक मिळत नाही. पैसे घेण्याचे काम सर्रास चालू असते. ते एकदा जाहीर करावे म्हणून १३ डिसेंबर रोजी एक मोर्चा शहादे पोलिसस्टेशनवर नेण्याला आला. असे विविध प्रकारचे काम गेल्या वर्षभरात झाले.

विधानसभेच्या निवडणुका झाल्या. शक्ती असूनही ग्रामस्वराज्यसमितीने या निवडणुकांत प्रत्यक्ष भाग घ्यायचा नाही असे ठरविले. मात्र हुकुमशाही विचाराच्या लोकांना मते देऊ नयेत अशी भूमिका ग्रामस्वराज्यसमितीने घेतली व तिचा पाठपुरावा केला.

## अंबरसिंगांची पुण्यतिथी

२५ फेब्रुवारीला अंबरसिंगांची पुण्यतिथी. त्या दिवशीच निवडणुका होत्या म्हणून दुपारी सभा न घेता सायंकाळपर्यंत मतदान करून सर्वांनी पाडळद्याला जमावे असे जाहीर पत्रक ग्रामस्वराज्यसमितीने काढले होते. सायंकाळी पाचच्या सुमारास छायाताई (अंबरसिंगांच्या पत्नी) व दामोदरदास मुंदडा हे दोघे पाडळद्याला पोचले; परंतु त्यांना गावांत प्रवेश करू देण्यात आला नाही. मारहाण करण्यात आली. दामोदरदासजी तर या मारहाणीत रस्त्यावर पडले! लोकांनीच त्यांना उचलून एका घरी नेले. संध्याकाळी गावोगावचे लोक जमले. त्यांना या घटनेबद्दल आश्चर्य वाटले. लोक जमल्यानंतर मिरवणुकीने अंबरसिंगमहाराजांच्या समाधीकडे जाऊ लागले. त्यांना समाधीकडे अडविण्यात आले. अचकट–विचकट शिव्या देण्यात आल्या. दुर्दैव असे की, अंबरसिंगांच्या घरची मंडळी यात सामील होती व त्यांच्या घरीच श्रमिक संघटनेचे कार्यकर्ते बसले होते. रात्रभर लोकांनी भजन केले. आपल्याला समाधीजवळ जाता येईपर्यंत आपण येथून जाणार नाही अशी भूमिका लोकांनी घेतली. दुसऱ्या दिवशी तुम्हाला जाता येईल, कुणीही अडविणार नाही असे सांगितले गेले. त्या वेळी पुन्हा मिरवणूक काढून सर्वांनी समाधीचे दर्शन घेतले. श्रमिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सभा घेण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रमुख कार्यकर्ते तेथे आले होते. त्यांचे वागणे, लोकांना शिव्या द्यायला सांगणे, लाल झेंड्याचा प्रचार करणे हे सर्व चालू होते. आपले तेच चालू ठेवायचे, लोकांचे काही ऐकायचे नाही असे त्यांचे नेहमीचे तंत्र सुरू होते. निवडणुकीमध्ये त्यांनी दोन उमेदवार उभे केले होते. त्यांचे अपयश दिसत असल्यामुळे ते चिडले असावेत आणि त्यांनी पाडळद्याची घटना घडवून आणली असावी, असे लोक बोलतात. त्यांना काय करायचे ते करू द्या. त्यांना आपल्या मार्गाने जाऊ द्या. लोकांनी त्यांना भिऊ नये व ग्रामस्वराज्यसमितीच्या कार्यकर्त्यांना विरोध करू नये. त्यांनी काही सांगितले, लिहिले तर तेवढा खुलासा करावा अशीच ग्रामस्वराज्यसमितीची पहिल्यापासूनची भूमिका आहे हे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. असे

असूनही त्यांनी कार्यकर्त्यांच्या विरोधी पत्रके काढायला सुरुवात केली. ऑफिसची जागाही ते सोडण्यास तयार नव्हते. त्यासाठी मुंबईला त्यांनीच एक सभा बोलाविली. त्या बैठकीला चळवळीला मदत करणारे व सहानुभूतिदार जमले होते. त्यांच्या पुढे सर्व बाजू ठेवण्यात आल्यानंतर त्यांनी ऑफिस सोडून जावे असे सर्वांनी स्पष्टपणे सांगितले. सातपुडा सर्वोदय मंडळाचे सामान आहे–जे ग्रामस्वराज्य समितीने वापरण्यासाठी घेतले आहे, ते व जुन्या फाइल्स त्यांनी नेऊ नयेत असे ठरले होते; परंतु एक दिवस ते सर्व सामान घेऊन गेले. जो शब्द द्यायचा तो पाळायचा नाही असे त्यांनी धोरण ठरविलेले दिसते. लोकांना त्यांच्या वागण्याची आता माहिती झालेली आहे. ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांविषयी घृणास्पद प्रचार करीत रहायचे, तो समोर भेटला तर त्याच्याशी बोलायचे नाही, इतर कुणी बोलले तर त्याची अडवणूक करायची असे सतत चाललेले असते. कॉम्रेड शरद पाटील यांनी श्रमिक संघटनेच्या विरोधी चार लेख लिहिले. त्याला उत्तर देताना ग्रामस्वराज्यसमितीच्या कार्यकर्त्यांवर व खुद्द अंबरसिंगमहाराजांच्यावर खोटे आक्षेप त्यांनी घेतले. तेवढ्या पुरते उत्तर देणारे निवेदन ज्या वर्तमानपत्रात त्यांचे लेख आले होते त्या वर्तमानपत्रात देण्यात आले; परंतु त्यांनी छापायचे सौजन्य दाखविले नाही. म्हणून दुसरे दैनिक तेथून निघते त्यांच्याकडे ते पाठविण्यात आले; परंतु त्यांनीही ते अजून प्रसिद्ध केले नाही. म्हणून त्यांनी त्या लेखात केलेला गैरसमज वाचकांच्या मनात कायम असण्याची शक्यता आहे.

मालदार, सावकार, पोलीस, जंगलअधिकारी यांचा अन्याय, अत्याचार थांबविणे, त्यासाठी लोकसमित्या स्थापन करणे, जमिनी परत मिळविणे, गावात तरुण मंडळे चालविणे, लोकांना अन्याय, अत्याचाराविरुद्ध उभे करण्याचे काम सतत चालू ठेवणे; त्याबरोबरच त्यांच्या शेतीला मदत होईल, त्यांचे दारूचे व्यसन सुटेल, मुलांचे शिक्षण होईल, त्यांचे अज्ञान दूर होईल अशा प्रकारचे प्रयत्न सतत चालू ठेवायचे आहेत. प्रौढ शिक्षणाची व्यवस्था ग्रामस्वराज्य समितीने सुरू करावी असे ठरविण्यात आले आहे. सघन कामासाठी दहा गावे निवडण्यात आली आहेत. सर्व कामांतून लोक संघटित होतील व तेच आपले प्रश्न सोडवितील असा प्रयत्न असतो.

ग्रामस्वराज्यसमितीने नवीन वर्षासाठी तोरणमाळ भागात काम सुरू केलेले आहे. धुळे जिल्ह्यातील हा परिसर सातपुड्यामध्ये वसलेला आहे. अक्राणी तालुक्यात हा भाग येतो. आठ महिने हा भाग सबंध जगापासून तुटलेला असतो. चार महिने फक्त तोरणमाळपर्यंत एसटी बस जाते. या भागात पंचवीस गावे आहेत. गेले सहा महिने ग्रामस्वराज्यसमितीचे दोन कार्यकर्ते या भागात हिंडून काय परिस्थिती आहे ते पहात आहेत. अशा सर्व गावच्या लोकांची एक परिषद नुकतीच घेण्यात आली. जंगलअधिकाऱ्यांचा त्रास, औषधोपचारव्यवस्थेचा अभाव, शाळा नाही, रेशनदुकान नाही, वाघअस्वलांशी नेहमी सामना द्यावा लागतो, अशा सर्व अडचणी गावोगावच्या लोकांनी सभेत सांगितल्या.

श्रीमती छायाताई सुरतवंती, भटू पाटील, गणपत भिल, प्रभाकर विरारी, गिरधर पाडवी, वेडू पावरा, सोमा पवार, ताराचंद साळवे, रतिलाल वळवी, वीरसिंग पाडवी, व्रिजलाल पवार, नानूभाऊ अंबोरे, वाघबाबा हे कार्यकर्ते आपला बहुतांश वेळ या कामासाठी देतात. त्यामुळे काम उभे राहिले आहे व ते पुढे जात आहे. कामाला सहाय्य अनेकांचे मिळते. प्रा. लताताई पाटणकर, वसंतराव पळशीकर, प्रभुभाई संघवी व सर्वोदयाच्या अनेक कार्यकर्त्यांनी या कामात मदत केली म्हणून काम पुढे जात आहे; पण निदान आणखी आज आहेत तेवढे तरी कार्यकर्ते हवेत. जसजसे मित्रांकडून आर्थिक सहाय्य वाढत्या प्रमाणात मिळत जाईल तसतसे काम व्यापक होत जाईल. त्यासाठी भूमिका चांगली तयार आहे.

—भटू पाटील,
कार्यवाह, ग्रामस्वराज्यसमिती

---


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

## आझमगढच्या विजयानंतर

# संजयच्या राजकीय पुनर्जन्मासाठी आसुसलेल्या इंदिराजी

आझमगढ येथल्या पोटनिवडणुकीत पराभव झाल्यानंतर तरी उत्तरप्रदेशातील जनता पक्षीय नेते शहाणपण शिकतील अशी जी अपेक्षा होती ती फोल ठरली आहे. गटबाजींच्या संकुचित आणि स्वार्थी राजकारणातून बाहेर पडण्याची त्यांना अजूनही बुद्धी होत नाही हेच दिल्लीतील गेल्या आठवड्यामधील घटनांवरून दिसून आलेले आहे. सत्यप्रकाश मालवीय यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्यात आपली चूक झाली अशी कबुली द्यायला मुख्यमंत्री रामनरेश यादव तयार नाहीत तर त्यांच्या विरोधात उभा ठाकलेला गट मुख्यमंत्र्यांच्या राजिनाम्याची मागणी सोडायला कबूल होऊ शकला नाही. अटलबिहारी वाजपेयी आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी रामनरेश यादव, सत्यप्रकाश मालवीय आणि राज्य जनता पक्षाचे अध्यक्ष अब्बासअली यांना पुन्हा एकदा दिल्लीला बोलावून घेतले आणि हा वाद चिघळू नये यासाठी दोन्ही गटांत सामोपचाराची भूमिका घ्यावी असे आवाहन केले; परंतु यादव आणि मालवीय आपापल्या पहिल्या भूमिकांना घट्ट चिकटून राहिल्यामुळे यादव यांच्या नेतेपदाचा वाद फर्नांडिस आणि वाजपेयी यांनी उत्तरप्रदेश विधिमंडळ जनता पक्षाकडे सोपवून दिला आहे. त्यानुसार लवकरच पक्षाची लखनौ येथे बैठक भरून तीत यादव आणि मालवीय गट आपापल्या सामर्थ्याचे मोजमाप करून घेतील.

मालवीय यांना अवघ्या ३२ सदस्यांचा पाठिंबा आहे. त्यामुळे रामनरेश यादव यांचे नेतेपद हिरावून घेण्याचा त्यांचा मनसुबा सिद्धीस जाणार नाही. अशा रीतीने आपले मुख्यमंत्रिपद टिकविण्यात यादव यांना यश लाभले तरी जोपर्यंत त्यांना कार्यक्षम आणि स्वच्छ प्रशासनयंत्रणा निर्माण करता येत नाही तोपर्यंत बंडखोर गट त्यांना बदनाम करण्याची एवढी सुद्धा संधी सोडणार नाही. या अंतर्गत कलहाचा परिणाम एकदम जरी नाही तरी हळूहळू जनता पक्षाच्या सामर्थ्यावर होत जाईल हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

या संभाव्य परिणामाचे दर्शन आझमगढबरोबरच घडलेले आहे. उत्तरप्रदेश जनता पक्षाने केवळ लोकसभेची एक जागा गमावली आहे असे नव्हे तर माणकपूर आणि सोरोव या विधानसभेच्या दोन पोटनिवडणुकीतही जनता पक्षाला हार खावी लागली आहे. पोटनिवडणुका साधारणतः सत्ताधारी पक्षाला प्रतिकूल जातात असे सांगून जर रामनरेश यादव स्वतःचे समाधान करून घेणार असतील तर गोष्ट वेगळी. एरवी आपण आपल्या वर्तनाने इंदिरा कांग्रेसला बळ प्राप्त करून देत आहोत हा गंभीर विचार त्यांना दृष्टिआड करून चालणार नाही. भारतीय राजकारणाच्या दृष्टीने उत्तरप्रदेश हे एक अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. दिल्लीलगत असलेल्या या विशालकाय राज्यात जे काही घडले त्याचे पडसाद लगेच दिल्लीत उमटतात. आझमगढ येथील पोटनिवडणूक जिंकताच इंदिरा कांग्रेसकडून लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीची मागणी पुढे यावी हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

आझमगढमध्ये यादवांची बहुसंख्या असल्याने आपण कोणताही यादव उभा केला तरी तो हमखास निवडून येईल हा मुख्यमंत्र्यांचा कयास चुकीचा आहे हे परवाच्या पोटनिवडणुकीने दाखवून दिले आहे. एखाद्या मतदारसंघात जेव्हा अनेक उमेदवार उभे राहतात तेव्हा हे गणित बरोबर ठरते. त्या बळावरच कांग्रेसचे चंद्रजित यादव आझमगढमधून निवडून येत होते. गेल्या वर्षीच्या मार्चमध्ये उफाळून आलेल्या जनता लाटेने चंद्रजित यादव यांना भिरकावून दिले आणि तोपर्यंत जवळजवळ अज्ञात असलेले रामनरेश यादव विजयी झाले! आझमगढचे तिकिट रामनरेश यादव यांना मिळावे यासाठी त्या वेळी रामबचन यादव यांनी चरणसिंगांना गळ घातली होती. आपल्यावर रामबचन यांनी केलेल्या मेहेरबानीची परतफेड करण्यासाठी आपल्या राजीनाम्यामुळे रिकामी झालेली आझमगढची जागा त्यांना दिली जावी असे रामनरेशांनी या वेळी चरणसिंगांना सुचविले. रामबचन यादव हे अतिशय प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्ते आहेत; परंतु त्यांचे आता वय झालेले आहे. ऐंशीच्या घरात गेलेल्या या वृद्धाला मध्यंतरी अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना हात जोडून नमस्कार करायलाही कष्ट पडतात. या शारीरिक दौर्बल्यामुळे रामबचन यादव यांच्या प्रचारावर स्वाभाविकच मर्यादा पडल्या.

आझमगढ हा जनता पक्षाच्या दृष्टीने निर्धास्त मतदारसंघ नाही हे रामनरेश यादव यांना माहीत असतानाही त्यांनी रामबचन यांची शिफारस करावी यावरून जातीय विचाराच्या पलीकडे जाण्याची त्यांची तयारी नाही हेच दिसून आले. गेल्या वर्षीच्या जूनमध्ये आझमगढमधील विधानसभेच्या पाच जागांपैकी तीनच जागा जनता पक्षाने जिंकल्या होत्या. तेथून जनता पक्षाचे जे तीन आमदार निवडून आले त्यांपैकी दोघेजण रामनरेश यादव यांच्या विरोधी गटात आहेत. रामधर राय हे तर रामनरेश यादव यांच्यावर टीका करण्याची एवढीसुद्धा संधी दवडत नाही. रामबचन यादव हे रामनरेश यादव यांचे पाठीराखे असल्यामुळे ते पराभूत व्हावेत असाच रामधर राय यांनी प्रयत्न केला. ते निदान उघडपणे तरी मोहसिना किडवाई यांच्या बाजूने उभे राहिले नव्हते. जनता पक्षाचे त्या भागातील

दुसरे आमदार अदिफ महंमदखान् यांनी तेवढीही लाज बाळगली नाही. ते जाहीरपणे मोहसिना किडवाई यांचा प्रचार करीत हिंडत होते !

रामबचन यादव यांच्या उमेदवारीचा चरणसिंग यांनी पुरस्कार केलेला असल्यामुळे भारतीय लोकदलाचे कार्यकर्ते त्या भागात प्रचारासाठी हिंडत होते. जनता पक्षातील इतर चार घटकांनी प्रचारमोहिमेवर जवळजवळ बहिष्कारच टाकला होता. जगजीवनराम आणि हेमवतीनंदन बहुगुणा हे केंद्रीय मंत्री या निवडणुकीपासून अलिप्त राहिले, यामागे चरणसिंगांसंबंधीचा राग हेच कारण होते. जनसंघाचे कार्यकर्तेही प्रचारमोहिमेत हिरीरीने सहभागी झाले नाहीत.

मोहसिना किडवाई या आझमगढच्या रहिवासी नसतानाही त्यांना तेथून उभे करण्यामागचा इंदिरा गांधींचा विचार स्पष्ट होता. आझमगढमध्ये यादवांच्या खालोखाल मुसलमानांची संख्या आहे. त्यामुळे तेथील निवडणुकीला यादव विरुद्ध यादवेतर असे स्वरूप प्राप्त करून दिले की, मोहसिना किडवाई हमखास निवडून येतील हा इंदिरा गांधींचा कयास होता आणि तो खराही ठरला. मुसलमानांची मते रामबचन यादव यांना मिळावीत यासाठी उत्तरप्रदेश जनता पक्षाचे अध्यक्ष अब्बास अली यांनी आपल्या परीने प्रयत्न करून पाहिला; परंतु इंदिरा गांधींच्या प्रचारतंत्रापुढे अब्बास अलींसारख्या अननुभवी वृद्धाची केविलवाणी अवस्था झाली. चंद्रशेखर शेवटपर्यंत आझमगढमध्ये मुक्काम करून राहिले असते तर कदाचित यादवेतर समाजाची काही मते रामबचन यादव यांच्याकडे वळवून घेणे शक्य झाले असते; परंतु आजारपणामुळे चंद्रशेखर यांना आपली प्रचारमोहीम अर्धवटच सोडून द्यावी लागली. जनता पक्षाच्या इतर केंद्रीय नेत्यांनी आझमगढमध्ये आपली हजेरी लावली हे खरे असले तरी त्यांच्यापैकी फारसे कोणी ग्रामीण भागात गेले नाही. मोठमोठ्या गावांतच त्यांनी सभा घेतल्या.

## अंतर्गत बेदिली

याउलट इंदिरा गांधी पाच दिवस ग्रामीण भागातून हिंडत होत्या. त्यांनी एकूण सव्वीस सभा घेतल्या आणि त्या सर्व सभांना हरिजन, मुसलमान आणि स्त्रिया यांची भरपूर गर्दी झालेली होती. दंगली आणि अत्याचार यांमुळे मुसलमान आणि हरिजन समाज जनता पक्षावर रुष्ट झालेले आहेत. इंदिरा गांधींच्या भाषणात त्याच गोष्टींवर भर देण्यात येत होता. जनता पक्ष अधिकारावर आल्यापासून अल्पसंख्याकांवरील अत्याचारांना जोर चढला आहे अशी वस्तुस्थिती नाही काँग्रेसच्या राजवटीतही बहुजनसमाजाची ग्रामीण भागातील गुंडगिरी मागासवर्गीयांना सहन करावी लागत होती; परंतु खोटे आरोप करण्याबाबत इंदिरा गांधींनी जेवढे प्राविण्य संपादन केले आहे तेवढी धमक जनता पक्षीय नेत्यांपाशी नसल्यामुळे, इंदिरा गांधींच्या अपप्रचारातील फोलपणा दाखवून देणे त्यांना जमले नाही. जनता पक्ष आपल्या सर्व सामर्थ्यानिशी या निवडणुकीत उतरला असता तर त्याला इंदिरा काँग्रेसवर विजय मिळविणे मुळीच अवघड गेले नसते; परंतु निवडणूक तोंडावर आली असतानाच, जनता पक्षातील भांडणांना ऊत आला. रामनरेश यादव यांची अरेरावीच त्या भांडणांना कारणीभूत ठरली आहे. 'राखावी बहुतांची अंतरे' ही कला रामनरेशांना अपरिचित आहे. चरणसिंगांच्या पाठिंब्यावर आपण सर्व काही निभावून नेऊ शकू या गुर्मीमध्ये ते असल्यामुळे त्यांना अंतर्गत विरोधाची दखल घ्यावीशी वाटत नाही. आझमगढमधील पराभवाला आपण जबाबदार नाही असे सांगून ते आपली जबाबदारी झटकून टाकीत आहेत. आझमगढमधील पराभवाला दिल्लीतील चरणसिंग–जगजीवनराम–विसंवाद जेवढ्या प्रमाणावर कारणीभूत ठरला तेवढाच वाटा रामनरेश यादव यांच्या बेदरकार वृत्तीचाही आहे. शत्रूच्या सामर्थ्यापेक्षा अंतर्गत बेदिलीमुळेच जनता पक्षाला आझमगढमध्ये हार खावी लागली.

एवढे होऊनही शहाणपणा शिकण्याची रामनरेश यादव यांना गरज वाटत नाही. सत्यप्रकाश मालवीय यांना बत्तीस सदस्यांचा पाठिंबा आहे तर दुसरे जनता पक्षीय आमदार एच्. के. श्रीवास्तव यांच्या पाठीशी शंभर सभासद उभे राहिले असून त्यांनी चंद्रशेखर यांच्याकडे 'मुख्यमंत्री बदला' असे निवेदन दिले आहे. उत्तरप्रदेश विधानसभेच्या ४२५ सभासदांपैकी ३५० सभासद जनता पक्षाचे आहेत. यांपैकी जवळजवळ दोनशे सभासदांचा रामनरेश यादव यांना विरोध आहे असे श्रीवास्तव सांगतात. त्यांच्या या विधानात कितपत तथ्य आहे हे विधिमंडळ पक्षाच्या बैठकीच्या वेळी दिसून येईलच; परंतु एक गोष्ट मात्र खरी आहे की, रामनरेश यादव यांना यामुळे वाढत्या विरोधाला तोंड द्यावे लागणार आहे.

हरयानातील वादळ शमते न शमते तोच उत्तरप्रदेशात त्याचा आविष्कार व्हावा यावरून सत्तालालसेच्या विंचवाने जनता पक्षाला केवढा डंख केलेला आहे याची कल्पना येते. रामनरेश यादव यांच्यापेक्षा हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल हे किती तरी कणखर आणि हिकमती राजकारणी आहेत. प्रतिस्पर्धी गटातील सात आमदार फोडून आपले मुख्यमंत्रिपद अबाधित ठेवण्यात देवीलाल यांना यश लाभल्यावरही बलदेवसिंग तामल आणि गजराज बहादुर नागर या दोघा बंडखोरांना मंत्रिमंडळात घ्यावेच लागले. आपण बंडखोरांशी कोणतीही तडजोड करणार नाही असा आज जरी रामनरेश यादव आव आणीत असले तरी त्यांना देवीलाल यांच्या मार्गानेच जावे लागणार आहे. या सर्व उलथापालथीमध्ये यादव मुख्यमंत्रिपदावर टिकून राहतात की नाही हा प्रश्न मुळीच महत्त्वाचा नाही. जनता पक्षाच्या या लठ्ठालठ्ठीचा फायदा घ्यायला इंदिरा गांधी टपून बसलेल्या आहेत. आपल्याला आता पंतप्रधानपदाची आस नाही असे त्या म्हणत असल्या तरी त्यांची एक महत्त्वाकांक्षा अद्याप अपुरी राहिलेली आहे. संजय पंतप्रधान व्हावा यासाठी त्यांचे मातृहृदय तळमळत आहे. त्यांच्या या मनोगताला त्यांच्या पक्षातील इतरेजनांचाच विरोध आहे हे खरे असले तरी हा विरोध आपण योग्य वेळ येताच दडपून टाकू शकू असे इंदिरा गांधींना वाटते. आझमगढमधल्या आपल्या विजयाचे कारण सांगताना त्या असे म्हणाल्या की,संजयच्या अटकेमुळे लोक किती संतप्त झालेले आहेत हेच त्या पोटनिवडणुकीने दाखवून दिले आहे. एवढे म्हणूनच त्या थांबल्या नाहीत. सध्या तिहार-जेलची हवा खात असलेल्या संजयलाही त्यांनी आश्वासन दिले आहे, 'या अटकेमुळे तुझा पुनर्जन्म होणार आहे!'

□

## अनेकांचे धन येथे, एके ठायी आले
## अनेकांच्या सेवेसाठी, येथे आतुर थांबले

आपल्यापैकीच काहींनी बचत केली, करत आहेत आणि करतीलही. तोच पैसा संचित झाला आहे आणि योग्य तो विनियोग व्हावा यासाठी, खरं तर हा पैसा देखील आतुर आहे. 'विलोपले मधु मीलनात या' म्हणणाऱ्या नवयुवतीप्रमाणे —

स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपण त्याचा उपयोग करून घ्यावा हीच अपेक्षा आहे. तुम्ही कॉलेजच्या बाहेर पडलेले उमेदीचे पदवीधर असा, किंवा विणकामाचा व्यवसाय सुरू करण्यास उत्सुक असा, वाकबगार चर्मकार असा.... तुमच्या उमेदीला पैशांची साथ द्यावयाला आम्ही आतुर आहोत.

# बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा उपक्रम )

**मुख्य कचेरी : ११७७, बुधवार पेठ,**
**पुणे ४११ ००२**

तो चित्रसृष्टीत येण्यापूर्वीही नायक - नायिका
पडद्यावर एकत्र नाचत, गाणी म्हणत, प्रेम करीत
पण तो आला आणि
प्रणयी युगुल म्हणजे काय हे त्याने
प्रेक्षकांना दाखवले-- समजावले.

तो येण्यापूर्वीही चित्र संगीत होतेच
पण एकाच चाकोरीतून वाहणाऱ्या
त्या दर्दभऱ्या संगीताला
मादक प्रणयाची छान डूब देऊन त्याने
चित्रसंगीताला नवी वाट मोकळी करून दिली.

एका हातात झुकती कमान टाकलेली प्रेयसी
आणि दुसऱ्या हातात प्रणयी झंकार छेडणारे
व्हायोलिन घेऊन त्याने चित्र - निर्मितीची
' बरसात ' केली !

आज पंचवीस वर्षांनंतर कलाकार म्हणून
त्याची कारकीर्द एका नव्या वळणावर
येऊन थांबली असली तरी निर्माता – दिग्दर्शक
म्हणून आजही तो पहिल्या झळाळीनेच उभा आहे.

' सत्यम् शिवम् सुन्दरम् ' हे त्याचे चित्र
वितरित होत असतानाच त्याच्या
खळखळत्या जीवनाचा आलेख....

# माणूस : ' बरसात ' विशेषांक

सादरकर्ते – शरद गोखले

प्रसिद्धी : जून । किंमत : सुमारे दोन रुपये

। आकर्षक सजावट । भरपूर छायाचित्रे ।

। विक्रेत्यांनी मागणी त्वरित नोंदवावी ।

साचे मोडायचे, नवे बनवायचे.
साचेबंदपणा हा शत्रू क्रमांक एक.
—इति 'माणूस'

यापुढील आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या
माणूस वर्षारंभ अंकाचा एक वेगळाच साचा....
एकलेखकी अंकाचा

# लेखक ?

अर्थात तोही नवीनच.

पाच वर्षे हा इराणमध्ये होता.
तत्पूर्वी बँकॉक–जाकर्ता झालेच होते.
दक्षिण व्हिएटनाममध्ये हा खूप भटकला.
कोरिया ते मध्यपूर्व हे याचे कार्यक्षेत्र.
आजवर याने टी. व्ही. कॅमेऱ्याने
विविध अनुभव चित्रांकित केले.
यापुढील वर्षारंभ अंकी
निवडक अनुभवांचे याचे शब्दांकन....

# माणूस

# एकलेखकी वर्षारंभ विशेषांक

प्रसिद्धी : ३ जून
किंमत : सव्वा रुपया